ऑगस्ट २०२५
वीरनिर्वाणसंवत् २५५१
वर्ष ७६वे, पुष्प १ले
श्रावण-भाद्रपद शके १९४७
www.sanmatimasik.com

UGC-CARE Listed
Research Journal
(Since-Jun2019)

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07

बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

मूल्य - २५ रु.



## चारित्रचक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागरजी महाराज यांच्या बाहुबली-कुंभोज येथील चातुर्मासाचे शताब्दी वर्ष




चारित्रचक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागरजी महाराज व संघ

जवळ बसलेले- मुनिश्री वीरसागरजी व मुनिश्री नेमिसागरजी
खाली बसलेले- ब्र.ठोकरदासजी, ऐलक पायसागरजी, ऐलक चंद्रसागरजी, मुनिश्री नेमिसागरजी, मुनिश्री अनंतसागरजी, ऐलक पायसागरजी, मुनिश्री आदिसागरजी अंकलीकर.
जवळ उभे असलेले- ब्र. दादा घोदे, ब्र. जिनदासजी

आचार्य पदारोहणानंतरचा पहिला चातुर्मास कुंभोज येथे झाला.
दि. २२/१०/१९२५ रोजी हे छायाचित्र काढण्यात आले होते.

# शाखांतर्गत अध्यापक मार्गदर्शन कार्यशाळा..... छायाचित्रे...

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४४वर)



श्री. दीपक मेंगाणे,
गटशिक्षणाधिकारी, राधानगरी



डॉ. कृष्णा पाटील,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



श्री. देवदत्त कुंभार,
इचलकरंजी



डॉ. दिलीप कुलकर्णी,
कुरुंदवाड



श्री. इंद्रजीत देशमुख,
निवृत्त सनदी अधिकारी



डॉ. विश्वास सुतार,
गटशिक्षणाधिकारी, शाहुवाडी



श्री. किरण पाटील,
जयसिंगपूर



श्री. नामदेव माळी,
सांगली



पहिल्या दिवशीच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर व
सर्व शाखांचे मुख्याध्यापक




दुसऱ्या दिवशीच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर व
सर्व पदाधिकारी



दुसऱ्या दिवशीच्या उद्बोधनप्रसंगी उपस्थित मान्यवर व संस्थेचे आणि शाखांचे सर्व पदाधिकारी

सत्प्रेरणा-शुभाशीर्वाद




प.पू. गुरुदेव १०८ श्री
समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन-४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक-संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## ऑगस्ट २०२५

❍ वर्ष: ७६ वे ❍ पुष्प १ले

❑ वार्षिक वर्गणी :२५०/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/-

❍ संपादक मंडळ ❍

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

**बँक खात्याचे विवरण -**

Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388

* Shri Bahubali Vidyapeeth - A/C No- 638801700001 (80G **करपात्र सवलतीकरिता**)

* Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)

**(सन्मती मासिकातून प्रकाशित होणारे सर्व शोधप्रबंध व लेख हे संशोधक आणि लेखकांचे व्यक्तिगत विचार आहेत. त्याची प्रामाणिकता व योग्यता याविषयी तेच सर्वस्वी जबाबदार आहेत. प्रकाशक किंवा संपादक हे केवळ संवाहक आहेत.)**

## ⊙ अनुक्रमणिका ⊙

| | | |
|---|---|---|
| ✻ संपादकीय..आचार्यश्री शांतिसागर महाराज... | -डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली | ०४ |
| ✻ WE AND THE NATURE | - Sanatkumar Arwade, Sangali | ०८ |
| ✻ दशलक्षणपर्व आणि समाज स्वास्थ्य | -डॉ. सरिता कोठारिया, सोलापूर | १० |
| ✻ वीर शासन जयंती | -सौ. हर्षा वेखंडे | १३ |
| ✻ ज्ञान - विलास | -ब्रह्मचारी नन्दलाल महाराज | १५ |
| ✻ प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (भाग १३७) | -आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी | १६ |
| ✻ योगसार चिंतन (०७) | - प्रियदर्शन जैन, नागपूर | २१ |
| ✻ पट्टमहादेवी-शब्दांपलिकडील अन्वयार्थ (२३) | -विपुल खेडकर, नागपूर | २३ |
| ✻ 'सोलहकारण भावना भाय....!'(११) | - हर्षा वेखंडे, नागपूर | २९ |
| ✻ रामायण आणि महाभारत : तौलनिक विवेचन-४ | -डॉ. सौ. लीना चवरे, कारंजा-लाड | ३२ |
| ✻ वानर बनले गणधर | - पं. श्री. प्रदीप धोतरे (शास्त्री), बाहुबली | ३४ |
| ✻ आत्मा का स्वरूप- जैन दर्शन के परिप्रेक्ष्य में | -डॉ. मोनीदीपा घोष | ३६ |
| ✻ रिटर्न गिफ्ट | -दादासो सरडे, दुधगाव | ३९ |
| ✻ जीवन गौरव पुरस्कार सन्मानपत्र -विदुषी विजयाताई भीसीकर | | ४१ |
| ✻ मैं मात्र परमपारिणामिक भाव स्वरूप हूँ | -शिरीष रायबागकर, अहिल्यानगर | ४३ |
| ✻ विशेष वार्ता | | ४४ |

## संपादकीय....

# श्री क्षेत्र बाहुबली : आचार्यश्री शांतिसागर महाराज यांचे श्रद्धास्थान

डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली

श्री अतिशय क्षेत्र बाहुबली हे एक सर्व धर्मीय लोकांचे आस्थाकेंद्र आहे. हजारो वर्षापासून या ठिकाणी अनेक त्यागी, मुनी, तपस्वी लोकांनी तपश्चर्या केली आहे. सज्जन, साधू, महापुरुषांच्या सान्निध्याने क्षेत्र देखील पवित्र बनत असतात. म्हणूनच क्षत्रचूडामणी या ग्रंथात आचार्य वादीभसिंहसूरी असे म्हणतात की **पावनानि हि जायन्ते स्थानान्यपि सदाश्रयात् ।** म्हणजेच पवित्र महापुरुषांच्या सान्निध्यामुळे क्षेत्र देखील पवित्र बनत असते. इसवी सन ११५६ साली या ठिकाणी आठ फूट उंचीची भगवान बाहुबलींची भव्य दिव्य मूर्ती मुनिश्री श्रुतसागर महाराज यांनी प्रतिष्ठापित करविली. त्यानंतर प्रभाचंद्र, कमलाकर, निर्वाण बाबा बाहुबली महाराज अशा अनेक लोकांनी तपश्चर्या केली. अलीकडच्या काळात म्हणजे १९०५ साली सिद्धसागर महाराज यांनी या ठिकाणी सल्लेखना साधली. ते कर्नाटकातील असून श्रवणबेळगोळ येथील भट्टारक पीठाचे एक प्रमुख मार्गदर्शक व धर्मगुरु होते. सिद्धाप्पा महाराज या नावाने प्रसिद्ध असणाऱ्या या महाराजांनी खऱ्या अर्थाने विसाव्या शतकातील जैन समाजाच्या इतिहासातील ही एक पहिली सल्लेखना साधली होय. अशाप्रकारे या पवित्र तीर्थक्षेत्रावरील अणू-रेणू मध्ये अहिंसा, सत्य, प्रेम, मृदुता व शांती भरलेली आहे. त्यामुळे सहाजिकच भव्य जीवांचे मन या क्षेत्राकडे आपोआप आकर्षित होते. अशा या क्षेत्रासंबंधी परमपूज्य चारित्रचक्रवर्ती आचार्य श्री शांतिसागर महाराज यांच्या मनामध्ये आस्था नसेल ? असे कसे शक्य होईल. म्हणून त्यांनी या ठिकाणी तीन चातुर्मास केले. त्यापैकी **आचार्य पदारोहणानंतरचा पहिला चातुर्मास हा बाहुबली व कुंभोज या नगरीमध्ये केला होता. त्यास आता शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या शताब्दी महोत्सवी चातुर्मासानिमित्त हा लेखप्रपंच** सादर केला जात आहे. तसेच त्या चातुर्मासकालीन विशेष घटना पुढील प्रमाणे आहेत.

**१) आचार्यश्रींचा बाहुबलीतील पहिला चातुर्मास (इ.स. १९१६)**

चारित्रचक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागर महाराजांनी शुक्रवार दि २५ जून १९१५ रोजी उत्तूर (कर्नाटक) येथे मुनिश्री देवेंद्रकीर्ती यांच्या शुभहस्ते क्षुल्लकपदाची दीक्षा घेतली आणि दि. १८-०९-१९५५ रोजी कुंथलगिरी येथे समाधी साधली. या संपूर्ण ४१ वर्षाच्या कालखंडात केवळ कोगनोळी, फलटण, बाहुबली (कुंभोज) आणि कुंथलगिरी या चार ठिकाणी त्यांचे तीन-तीन चातुर्मास झाले. अन्यत्र केवळ एक किंवा दोनवेळचा चातुर्मास संपन्न केला. यावरून असे दिसते की बाहुबली (कुंभोज) आणि कुंथलगिरी ह्या दोन क्षेत्राविषयी त्यांच्या मनात विशेष आकर्षण दिसून येते. सहज ओढा असण्याचे कारण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१९१६ साली क्षुल्लक अवस्थेतील चातुर्मास बाहुबली-पहाडावर व नजिक असलेल्या कुंभोज येथे त्यांनी आत्मसाधनेत घालविला. त्यावेळी पं. श्री. कल्लाप्पा निटवे (शास्त्री) यांनी बाहुबलीच्या पहाडावर १९१४ मध्ये दुमजली चिरेबंदी दगडी धर्मशाळेचा पाया घातला होता. त्याकाळी त्यास सुमारे रु. ५० हजार इतका खर्च आला होता. ह्या कार्यास सत्प्रेरणा लाभावी ही त्यांची मनोभूमिका असावी.

**२) आचार्यश्रींची गिरनारयात्रा व ऐलकदीक्षा (इ.स. १९१९)**

बाहुबली डोंगरावर त्यावेळी महाराज विहार

करीत आले होते. नित्य स्वाध्याय, सामायिक, जपजाप्य इत्यादि कार्यात महाराजांचा वेळ जात होता. उरलेल्या वेळेत जमलेल्या श्रावक मंडळींना सदुपदेश देण्याचे कार्य ते करीत. लवकरच आजूबाजूला महाराजांची कीर्ती पोहोचली. एकदिवस एक कुष्ठ रोगी त्यांच्याकडे आला. नामांकित डॉक्टरांच्या औषधानेही बरा न झालेल्या रोगामुळे संत्रस्त होऊन त्या जीवाने महाराजांच्या पायावर अनन्यगतिक होऊन लोटांगण घातले. महाराजांनी त्यास आशीर्वाद दिला. व्रत नियम पाळण्यास सांगितले. 'दिलेली व्रते तू श्रद्धेपूर्वक पाळशील तर तुझा रोग खात्रीने बरा होईल' असे आश्वासनही त्यांनी दिले. एकदोन महिन्यांतच गुरुवचनांतील सत्यता प्रगट झाली. तो गृहस्थ रोगमुक्त झाला. **'वितथे मुनिवाक्येऽपि प्रामाण्यं वचने कुत:।'** हे वादीभसिंहसूरिंचे वचन सार्थ झाले. पुढे त्यास महाराजांनी ब्रह्मचर्य व्रत दिले. त्याप्रमाणे तो गृहस्थ 'जिनदास' या नावाने जिनधर्माचा प्रसार करीत हिंडू लागला. हेच ते समडोळीचे जिनदास ब्रह्मचारी.

१९१९ साली आचार्यश्री नसलापूर (जि. बेळगांव) येथे चातुर्मास संपन्न करून श्री बाहुबली क्षेत्रावर नुकतेच आले होते. सामायिक, ध्यान, जप आदि शुभकार्यात मग्न होते. त्याकाळची ही उपर्युक्त घटना होय. त्यावेळी समडोळी व परिसरातील काही तीर्थभक्त गिरनार सिद्धक्षेत्राच्या दर्शनास जात होते. ते सर्व आचार्यश्रींना म्हणाले, 'आपण ही आमच्या सोबत तीर्थाटनास आल्यास बरे होईल. त्यांच्या खास आग्रहास्तव क्षुल्लक अवस्थेतील आचार्यश्री सिद्धक्षेत्र गिरनारच्या दर्शनास गेले आणि तेथे बुधवार, दि. १५ जानेवारी १९१९ रोजी ऐलकपदाची दीक्षा घेतली.

**३) आचार्यश्रींचा दुसरा चातुर्मास (इ.स. १९२५)**

प. पू. आचार्यश्री शांतिसागर महाराज इ. स. १९२४ साली समडोळी येथे चातुर्मासाकरिता होते. त्याच्या उत्तरार्धात बुधवार, दि. ८ ऑक्टोबर १९२४ रोजी त्यांना चतुर्विध संघाकडून 'आचार्य' ही पदवी देण्यात आली. **आचार्यपदारोहणानंतर त्यांनी १९२५ साली बाहुबली व कुंभोज येथे पहिला चातुर्मास केला.** या चातुर्मासाच्या कालखंडात त्यांनी 'कवलचान्द्रायण' हे व्रत पार पाडले. त्यावेळी सोलापूरहून धर्मवीर श्री रावजी सखाराम दोशी हे देखील उपस्थित होते. (कवलचांद्रायण व्रत म्हणजे चंद्राच्या कलेप्रमाणे आहाराचे घास घेणे. अर्थात शुक्लपक्षात प्रतिदिवस एक-एक घास वढवित जाऊन पौर्णिमेस १५ घास आहार घेणे आणि कृष्णपक्षात एक-एक घास कमी करत अमावस्येस निराहार राहणे होय.)

तसेच कार्तिक वद्य ४, दि. ४ नोव्हेंबर १९२५ रोजी कुंभोज येथे **''श्री शांतिसागर दिगंबर जैन पाठशाळेची '' स्थापना केली. आज या पाठशाळेस १०० वर्षे पूर्ण होत आहेत.** सर्वात प्राचीन अशी ही एकमेव पाठशाळा दिसते. उद्घाटनप्रसंगी श्रीमान शेठ मदनचंद पांड्या यांनी सलग १० वर्षे रू. ३०० इतकी दानराशी पाठशाळेस देण्याचे घोषित केले. त्यानंतर आचार्यश्रींनी सांगली येथे विहार केला असता दि. २५ नोव्हेंबर १९२५ रोजी श्री. अनंत भाऊ औरवाडे यांनी देखील कुंभोजच्या पाठशाळेस देणगी दिली.

दि. २४/११/१९२६ रोजी कुंभोज येथील पाठशाळेचा प्रथम वार्षिकोत्सव साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी कारंजाहून ब्र. ककुंमावशी, सोलापूरचे श्री. रावजी सखाराम दोशी हे अतिथी म्हणून आले होते. त्यांनी रू. १०१ दान दिले. अध्यक्षस्थानी पं. श्री. कल्लाप्पा भरमाप्पा निटवे शास्त्री हे होते.

**आचार्यश्रींची चातुर्मासिक धर्माराधना -**

चारित्रचक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागर महाराज यांचा पावन वर्षायोग श्री अतिशय क्षेत्र बाहुबलीच्या पहाडावर व पायथ्याशी असलेल्या सुंदर गुंफेमध्ये सुरू होता. सुमारे एक महिना पं. श्री. खूबचंद्रजी शास्त्री येथे राहिले होते. प्रतिदिवस पंचाध्यायी, आलापपद्धती, जैनसिद्धान्तदर्पण इत्यादी ग्रंथावर

पण्डितजींचे प्रवचन होत असत. पर्युषण पर्वात तत्त्वार्थसूत्र या ग्रंथाच्या प्रथम अध्यायावर पण्डितजींचे खूप सुंदर व हृदयग्राही प्रवचन झाले. विशेषकरून 'स्याद्‌वाद आणि सप्तभंगी' हा विषय खूप सुंदरपणे समजावून सांगितला होता. म्हणून आचार्यश्रींनी समस्त मुनिसंघ व श्रावकांच्या उपस्थितीत भाद्रपद शुक्ल १५ या दिवशी पं. श्री. खूबचंद्रजींना 'स्याद्‌वाद वाचस्पती' ही उपाधी दिली. सर्वांनी पंडितजींचा सन्मान केला. पण्डितजींनी जिनशास्त्रसमुद्रासमोर आपली लघुता प्रदर्शित केली आणि लोकांच्या प्रसन्नतेकरिता पदवी स्वीकारली.

येथील लोकांना आचार्यश्रींच्या संघाचा खूप लाभ होत होता. प्रतिदिवस कोणत्यातरी त्यागींचे नित्य प्रवचन होत होते. भाद्रपद शु. १४ या दिवशी आचार्यश्रींनी दोन तास उपदेश दिला. दान, अहिंसा, चारित्र, उपवास इ. खूप महत्त्वपूर्ण आहेत असे सांगून सर्वांना धर्माराधनेची प्रेरणा दिली. सर्व त्यागी त्यांच्या आज्ञेचे पालन करण्यास तत्पर असतात. आचार्यश्री देखील आपल्या पदानुकुल शास्त्रानुसार आपली नित्यक्रिया करीत असतात. पर्युषण पर्वाच्या काळात 'केशरबाईजी' फलटणनिवासी यांनी भाद्रपद शु. १२ रोजी (उत्तम त्यागधर्माच्या दिवशी) आचार्यश्रीकडून अकरा प्रतिमायुक्त क्षुल्लिकेची दीक्षा विधिपूर्वक घेतली. '**क्षु. चंद्रमती**' असे त्यांचे नामकरण करण्यात आले. भाद्रपद शु. १३ (उत्तम आकिंचन्य धर्माच्या दिवशी) रोजी आग्रा निवासी 'लाला शालिग्रामजी जैन' यांनी श्रावकांची सातवी ब्रह्मचर्य प्रतिमा, सौ. हीरूबाई नेमचंदजी, सोलापूर आणि सौ. चतुरबाई शिवलाल गांधी, पंढरपूर यांनी श्रावकांची पाचवी प्रतिमा घेतली. तसेच श्रीमती कस्तुरचंद तलकचंद, नातेपुते, पंडिता चंदाबाई आणि अनूपमाला, आरा (बिहार) यांनी श्रावकांची दुसरी प्रतिमा घेतली.

ज्यावेळी पंडिता चंदाबाई यांचेकडे आचार्यश्रींचा आहार झाला त्यावेळी त्यांनी अनाथ छात्राश्रम, शेडबाळ यास रू. १०१ इतकी दानराशी दिली. पुष्कळ लोकांनी पाच अणुव्रते, अनेकांनी अष्ट मूलगुण आणि शेकडो लोकांनी मिथ्यात्वाचा त्याग केला. साक्षात् गुरुंच्या उपदेशामुळे जी प्रभावना होते, भव्य जीव आपले कल्याण करतात, त्याप्रकारचे महान कार्य अन्य कोणत्याही कारणांनी होत नाही. गुरुंचा उपदेश व सत्संगती यांचा चांगला प्रभाव पडतो.

### ४) आचार्यश्रींचा तिसरा चातुर्मास व शिखरजीकडे विहार (इ.स. १९२७)

१९२७ साली आचार्यश्री शांतिसागर महाराज चातुर्मासकाळी बाहुबलीच्या पहाडावर आले होते. क्षेत्रावरील चातुमासिक योगसाधनेच्या भद्रपरिणामामुळे त्यांना सिद्धक्षेत्र सम्मेद शिखरजीचे दर्शन करण्याचे भाव जागृत झाले आणि त्यानिमित्त संपूर्ण भारतभर विहार करून जिनधर्माची व श्रमण परंपरेला पुनरुज्जीवित करण्याचे भाव बनले. त्यानुसार कार्तिक कृष्ण प्रतिपदा वीरसंवत् २४५३, सन १९२७ रोजी पुढीलप्रमाणे समाचार प्रसिद्ध करण्यात आला.

**संघविहार (शिखरजीची यात्रा)**

संपूर्ण दिगंबर जैन समाजास सांगताना अत्यंत हर्ष होत आहे की आम्ही कार्तिक अष्टान्हिका पर्व संपल्यानंतर मुनी, आर्यिका, श्रावक व श्राविका अशा चतुर्विध संघाचे प्रवर्तन करणार आहोत. हा संघ कुंभोज (बाहुबली क्षेत्र) कोल्हापूर दक्षिण येथून निघेल आणि शिखरजीच्या यात्रेसाठी प्रस्थान करेल. श्री रत्नत्रयपूत परमशांत दशलाक्षणिक धर्मविभूषित १०८ श्री आचार्य शांतिसागर महाराज या मुनिसंघासोबत विहार करतील. या संघात तीन-चार मुनी, तीन ऐलक, एक क्षुल्लक, पाच-सहा ब्रह्मचारी आणि एक-तीन आर्यिका यांनी विहार करण्याचा निश्चय केला आहे. याशिवाय आणखी काही मुनी, ऐलक, ब्रह्मचारी हे ह्या मुनिसंघासोबत विहार करणार आहेत. असा अंदाज आहे. चतुर्थकाळात मुनिराजांचे ज्याप्रमाणे स्वरूप होते त्याप्रमाणेच परमशांत आचार्य श्री १०८ शांतिसागर महाराज यांचे देखील स्वरूप-आचरण दिसून येते. आजपर्यंत हा

संघ दक्षिणेतच विहार करीत होता. परंतु भव्यजीवांच्या पुण्योदयाने आता हा संघ उत्तर-भारतात देखील विहार करणार आहे. यामुळे संपूर्ण समाजास धर्मलाभ होईल.

१. हा संघ दक्षिण महाराष्ट्र ते शिखरजीपर्यंत पायी रस्त्याने विहार करेल.

२. संघासोबत येणाऱ्या सर्व धर्मबांधवांची सर्व प्रकारची व्यवस्था केली जाईल. कोणासही कोणत्याही प्रकारचे कष्ट होणार नाहीत. अशी व्यवस्था केली जाईल.

३. संघरक्षणाकरिता सोबत पोलिस बंदोबस्त घेत आहोत.

४. संघासोबत श्री जिनेंद्र भगवंतांची प्रतिमा सोबत असेल.

५. संघामध्ये धर्मोपदेश व धर्मचर्चा होत राहो, या करिता विद्वान पंडितांना देखील सोबत घेतले जाणार आहे.

६. संघात औषधीद्वारा रोग-चिकित्सेची व्यवस्था करण्यात येणार आहे.

७. संघात भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे की ज्यामुळे सर्वांना शुद्ध भोजन मिळेल.

८. संघात ज्याला जितके दिवस रहावेसे वाटतात त्याने तितके दिवस रहावे. जे यात्रा पूर्ण करू इच्छितात त्यांची खास व्यवस्था केली जाईल. गरीब बांधवाकरिता सर्वप्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे.

सर्व धर्मबांधवांना विनंती आहे की, पुन्हा असा अपूर्व अवसर मिळणे दुर्मिळ आहे. संघासह यात्रा करणाऱ्यांना धर्मोपदेश, सुपात्रदान, तीर्थवंदना इत्यादींचा अपूर्व लाभ मिळेल. त्यागी, ब्रह्मचारी लोकांना विशेष सूचना आहे की त्यांनी संघात येऊन सहभागी व्हावे, ज्यामुळे संघाची शोभा वाढेल. हीच आमची प्रार्थना आहे.

-समाजसेवक पूनमचंद घासीलाल जोहरी,
जोहरी बाजार मुंबई

संघविहाराचे संघपती मुंबईचे श्रीमान सेठ पूनमचंद घासीलालजी हे होते. प्रारंभी सुमारे दोनशे श्रावक-श्राविका यात सहभागी झाले होते. आचार्यश्री शांतिसागर महाराज, मुनिश्री नेमिसागरजी, मुनिश्री वीरसागर, मुनिश्री अनंतकीर्ती हे निर्ग्रन्थ मुद्राधारी साधुगण होते. ऐलक श्री पायसागर (ऐनापुर), ऐलकश्री पायसागर (गोकाक), ऐलकश्री पायसागर (शियापूर) हे तीन ऐलक पद व नावाने ही सारखेच होते. क्षुल्लक मल्लिसागर (गळतगा), क्षु. पायसागर (जळगाव) क्षु. अनंतकीर्ती (शियापूर) असे एकूण तीन क्षुल्लक होते. क्षुल्लिका शांतिमती, ब्र. क्षु. चंद्रमती आणि क्षु. अनंतमती नावाच्या तीन क्षुल्लिका होत्या. एक ब्रह्मचारिणी होत्या. तसेच ब्र. दादा घोदे (सांगली), ब्र. आण्णाप्पा लिगाडे, ब्र. म्हैसाळकर, ब्र. परिसाप्पा घोदे, ब्र. पायसागर (उगार), ब्र. देवप्पा, देवलात (ग्वालेर), ब्र. हजारीलाल (एटा), ब्र. फतेहचंद (नागपूर), पं नंदलाल वैद्य, पं. उल्फतराम (रोहतक), कीर्तनकर श्री. जिनगोंडा पाटील, श्री. गंगाराम अरवाडे, सांगली इत्यादी प्रमुख महानुभाव या संघात होते.

या संघाने दि. १० नोव्हेंबर १९२७ रोजी सम्मेदशिखरजीकडे बाहुबली येथून विहार केला.

जिनवाणीवरील श्रद्धा-सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आचार्यश्रींची जिनवाणीवर श्रद्धा होती. आचार्य भद्रबाहूंनी मुनिधर्माचे निरतिचार पालन करण्याकरिता दक्षिणेकडे विहार केला होता. शास्त्रात सांगितले आहे की जैनधर्म दक्षिणेकडेच टिकणार आहे.

अशाप्रकारच्या या उपर्युक्त कारणास्तव श्री अतिशय क्षेत्र बाहुबली हे आचार्यश्रींचे एक आस्थाकेंद्र होते.



**वर्गणीदारांना विनंती...**

**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

# WE AND THE NATURE

**Sanatkumar Arwade,**
President,
Shri Bahubali Brahmacharyashram, Bahubali.

XXXII Rotary Dist. 317 Conference Kolhapur.
VI[th] Plenary Session
Sat. 2[nd] Feb. 1991
**Key note Speaker**
**Smt. Sharayu Daftari**
**Moderator : Sanatkumar Arwade**

Man, since his origin, has lived in harmony with Nature, holding Nature in awe and reverence. The Vedas, folklore and scriptures of different religions, faiths and beliefs speak of the need for harmony with the Universe, which is the only habitat not only of man but also of all animals, birds, insects, plants and vegetation. The mutually supporting role of all living things is often mentioned as a crucial factor for a balanced social and harmonious existence. Respect for all life is a part of Indian Philosophy. Hinduism, Buddhism and Jainism all preached non-violence and reverence for living creatures. The Jain ecological philosophy is synonymous with this principle. Bhagwan Mahavir proclaimed a profound truth for all times to come when he said :

One who neglects or disregards the existence of earth, air, fire, water and vegetation disregards his own existence which is entwined with them.

Jaina cosmology recognizes the fundamental natural phenomenon of symbiosis or mutual dependence, which forms the basis of the modern day science of ecology. The much quoted edict "परस्परोपग्रहो जीवानाम्" is an exemplication of this philosophy.

In the past, Man has availed of the benevolence of Nature, but in a modest and nearly harmonious manner. However, the same man in the name of a modern life style and civilised living and with tremendous technological accomplishments, increasing industrialization and rapid urbanization, has blatantly exploited environment. This has disturbed the harmony between a Man and Nature, posing a serious problem of environment before mankind.

This has gripped the imagination and thinking of enlightened people, organized groups

and governments in most of the developed and developing countries. However the public in general and local communities in particular, must take a much greater interest in a matter which concerns their future, and the future of their children and their children's children. Here voluntary organizations have a great role to play in educating the common people. Like other voluntary organizations. Rotary has also become aware of this environmental problem. The R.I. Board in its first meeting in 1990-91 in Vancouver, B.C.; Canada considered this global problem and adopted the "Preserve Planet Earth" with emphasis on environmental activities by clubs and districts as a pilot programme for R.I. for 1990-91 through 1992-93. The programme sprang from president Paula Costa. There is good response from Rotarians all over the world to this programme.

So it is but natural that this topic of global importance is included in the conference agenda.

Today we have amongst us as key note speaker Smt. Sharayu Daftari, an eminent industrialist from Maharashtra. I may call her a Philanthropist in the industrial field. Being an industrialist she known the ecological and environmental problems arising out of Industrialization and Urbanization. Added to this she was also one of the signatories to "The Jain Declaration on Nature" submitted in London to Prince Phillip who is the President of World Wildlife Fund for Nature.

May I request you, Madam to present your key note address.

The gist of her speech was as under.

We are living in the final decade of this 20$^{th}$ century. Let us leave good legacy to our children. Let us be the Great Hope of the 21$^{st}$ Century. Therefore let us unite in a mighty challenging effort to Preserve Planet Earth. We are the heirs of the Earth. Our Planet is our home. Let us love it, preserve it and save it.

Jaina ecology recognizes the fundamental phenomenon of symbiosis or mutual dependence. "Parasparo Jeevanam" is an exemplication of the philosophy. Let us follow this philosophy for the good future of 21$^{st}$ century.

सुजाण वाचकांना नम्र निवेदन आहे की, सन्मति मासिकाच्या अंकांतील आपण वाचलेल्या साहित्याविषयी आपले अभिप्राय, सूचना इ. अवश्य कळवावेत. पुढील अंकात त्यांना स्थान देण्यात येईल. अभिप्राय पत्राद्वारे, ई–मेल अथवा मोबाईलच्या (what's app) द्वारे पाठवू शकता. मोबा. नं. ९४२०७७६६३१

E-mail - sanmatimasik@gmail.com

आता **सन्मति मासिक हे ऑनलाईन** वाचण्यास उपलब्ध आहे. एकवेळ खालील वेबसाईटला अवश्य भेट द्या.

**www.sanmatimasik.com**

# दशलक्षणपर्व आणि समाज स्वास्थ्य

**डॉ. सरिता कोठारिया,** सोलापूर
मो. नं. ९८२२३४७१०७

दरवर्षी भाद्रपद महिन्यात येणारे पर्वाधिराज दशलक्षणपर्व म्हणजे जैन धर्मियांसाठी एक अत्यंत श्रध्देचा आणि निष्ठेचा विषय आहे. पर्व म्हणजे पावित्र्याने साजरा केलेला एखादा सण किंवा उत्सव, म्हणून यास धार्मिक उत्सव म्हटले आहे.

आपणा सर्वांना ठाऊकच आहे की दहा दिवसांच्या या पर्वात आत्म्याच्या क्षमा, मार्दव, आर्जव, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्य या सद्‌गुणांची विशेष रितीने आराधना केली जाते. या निमित्ताने प्रत्येक जैनधर्मीय भक्तिभावाने यथाशक्ती व्रत वैकल्याच्या विविध बंधनात राहतो. म्हणून या पर्वास त्यागाचे, संयमाचे पर्व म्हटले आहे.

दशलक्षणपर्व हे अनादिअनंत आहे. या पर्वाच्या अनेक बाजू आहेत आणि विशिष्ट मूल्ये आहेत. भोगभूमीचा काळ संपल्यावर कर्मभूमीचा काळ सुरू झाला. त्यावेळी श्रमणांची जीवनशैली पूर्णपणे बदलली आणि धर्माच्या क्षमादि लक्षणांचे महत्त्व आणि दैनंदिन जीवनातील त्या क्षमादि शाश्वत मूल्यांचे आचरण अधिक अधोरेखित झाले.

भ. ऋषभदेवांनी कर्मभूमीत जन्मलेल्या, वाढलेल्या जनसामान्यांसाठी धर्मप्रवर्तन केले तो दिवस होता भाद्रपद शुध्द पंचमीचा ! (असे संदर्भ मिळतात.) त्या धर्मप्रवर्तनात भ. ऋषभदेवांनी लोकांना समाजहिताच्या काही गोष्टी सांगितल्या. धर्माच्या दहा लक्षणांचे स्वरूप सांगितले. समाजात राहताना एकोप्याने रहा, सलोख्याने रहा, परस्पर नातेसंबंध जपा, परस्पर कल्याणकारी व्हा, परस्पर मैत्र जपा, तरच परस्पर समाजाचे स्वास्थ्य उत्तम राहील. समाजात एकसंधता, सुसंवाद (Harmonious Society) राहील आणि असाच समाज प्रगतीपथावर राहील, समाजाचा विकास साधला जाईल आणि पर्यायाने समाजात शांती नांदेल. समाज एकसंध राहण्यासाठी आणि समाजसौख्य लाभण्यासाठी भगवंतांनी क्षमा, मार्दव आर्जव इत्यादी धर्माच्या दहा लक्षणांचे पालन करण्याचा उपदेश दिला. 'खरा धर्म' म्हणजे काय हे जाणून घ्या, धर्माचे मुलभूत स्वरूप समजण्यासाठी क्षमादि गुणांना आत्मसात करा असे सांगितले.

धर्माची दहा लक्षणे आपल्या स्वभाव प्रकृतीत उतरविताना खरं तर एका व्यक्तिपासून सुरूवात होते. व्यक्ति-व्यक्तिंचे कुटुंब आणि अनेक कुटुंबे म्हणजे समाज. असे म्हटले आहे की, समाजाच्या आरशात प्रत्येक व्यक्तिचे प्रतिबिंब स्वच्छ, नितळ असेल तर समाज मन स्वस्थ राहते. प्रतिबिंब नितळ, आरस्पानी, स्वच्छ रहावे यासाठी क्षमा, मार्दव, आर्जव, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्याची नितांत गरज आहे. उत्तम क्षमा धर्म, उत्तर मार्दवधर्म इत्यादी दार्शनिक शब्द आहेत, त्यासाठी जर पर्यायी शब्द योजले तर उत्तमतेने धारण केलेली शांती, नम्रता, कोमलता, सरलता, निर्लोभी वृत्ती, संतोष, समाधान, प्रामाणिकपणा, स्वयंशिस्त, त्यागी, दानी वृत्ती, परिग्रह परिमाण (अपरिग्रह) आणि सुशील चारित्र अशी यादी करता येईल. या सगळ्या सद्‌गुणांच्या मुळाशी नैतिकता आहे, अहिंसा तत्त्व आहे आणि अनेकान्तवादही आहे.

आपण जाणतोच की जैनधर्म हा विज्ञानाधिष्ठित आहे, तर्कशुध्द आहे, तात्त्विक आहे. या धर्माचे क्षमादि स्वरूप हे खरोखर स्वास्थ्यपूरक आहे. म्हणून समाजाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून प्रत्येक व्यक्तिने धर्माच्या या दहा लक्षणांनी

समृध्द असायला हवे. श्रीमती प्रज्ञाताई डोणगावकर म्हणतात की, तत्त्वज्ञान हे निश्चितच अत्यंत कल्याणकारी असतं, पण ते जीवनात प्रत्यक्ष उतरविल्याशिवाय सर्वांचे कल्याण कसे साधेल ? प्रज्ञाताईंनी क्षमादि धर्मांना सिध्द रसायनांचे कल्याणकारी कलश अशी उपमा दिली आहे. त्या पुढे असं म्हणतात दशलक्षणधर्म ही तत्त्वज्ञानातील केवळ एक संकल्पना नाही तर सर्वमंगल जीवनपध्दती आहे. या क्षमादि लक्षणांना उचितपणे जैनधर्माच्या कंठ्यातील अनमोल रत्ने म्हटले आहे. या विविध लक्षणांचे नित्य आचरण केल्याने पारलौकिक सुख तर मिळतेच पण वर्तमान जीवनाचा मानसिक, शारीरिक, नैतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्तरही उंचावतो.

भ. महावीरांनी दिलेल्या 'जगा आणि जगू द्या' या संदेशात धर्माची दहाही लक्षणे प्रतित होतात. परस्परांचे हित साधा, कल्याण करा, इतरांसाठी सुखकारी व्हा याचाच अर्थ समाजस्वास्थ्यासाठी क्षमाभावाने शांतता प्रतिपादित करा, मन-वचन-कायेने कुणाला दुखवू नका, दलित, पीडीत वंचित घटकांसाठी दयाधन व्हा (दया धर्मका मूल है असे म्हटलेच आहे) आणि त्यांना आश्वस्त करा असा गर्भितार्थ आहे. भ. महावीरांनी तत्कालीन समाजातील मतभेद आणि काही धर्मांध लोकांचा दुराग्रह यावर मात करण्यासाठी अनेकांतवादासारखा सिध्दांत मांडला. **'परस्परोपग्रहो जीवानाम्'** या धर्मसूत्रात विश्वातील प्रत्येक घटकाच्या अस्तित्वासाठी मग तो मानव असो, तिर्यंच असो वा वनस्पतीसारखा एकेंद्रिय जीव असो, परस्पर कृतज्ञता भाव ठेवा, दुसऱ्याच्या उपकारांची जाणीव ठेवा, हेच संदेश मिळतात.

समाज सुखी, शांत, स्वस्थ रहावा यासाठी संयमधारणा, निष्परिगृही वृत्ती, निस्पृहता, नि:स्वार्थीपणा आणि नैतिक आचरण अत्यंत आवश्यक आहे. समाजातील सर्व स्तरांतील विषमता दूर व्हावी यासाठी त्याग, दान आणि परिग्रह परिमाण (अपरिग्रह) या गोष्टींचे पालन गरजेचे आहे. इच्छा, लालसा, हाव, लोभ, मोह या विकारी भावांवर मात करण्यासाठी प्रत्येकाने संयमधर्माचे अत्युच्च पालन केले पाहिजे. लालसेने केलेला धनसंचय, अनावश्यक बाह्य परिग्रह विनाशाकडेच नेतो.

विचारात अहिंसावादी, आचारात अनेकान्तवादी आणि समाजात अपरिग्रही वृत्तीने राहिले पाहिजे. समाजात वावरताना हट्ट, दुराग्रह, अंहभाव, कठोरता, रौद्र विचारांचे विसर्जन केलेच पाहिजे. प्रत्येकाने Egofriendly न राहता Ecofriendly झाले पाहिजे. अनेकान्तवादाचे स्वरूप म्हणजे सह आसन (Co-chair), सहचिंतन (Co-contemlation) आणि सहनिर्णय (Co-conclusion). यांच्या माध्यमातून योग्य असा मैत्रीपूर्व समेट व्हायला हवा तर समाजाचे मानसिक स्वास्थ्य उंचावेल आणि समाजाचा विकास होईल. तपधर्मातील अंतर्तपामध्ये ध्यानाचे अपार महत्त्व सांगितले आहे. धर्मध्यान (शुभध्यान) करण्याने आणि आर्तध्यान, रौद्रध्यान न करण्याने आपल्या शरीरातील अंतस्राव अशा प्रकारे स्रवतात की आपल्या मनातील हिंसक, रौद्र विचारांना आपला मेंदू परतवून लावतो आणि मन शांत होऊन विवेकबुध्दी सजग राहते. परस्परांमधील वादविवाद, झगडे, तंटे, भांडणे कमी होतात. विशिष्ट घटकांकडून होणारा दहशतवाद कमी झाल्याने समाजात समानुभूती आणि सुरक्षितता नांदते. भ्रष्टाचार, अनाचार, व्यभिचार अशा वृत्तींना आळा बसतो. समाजातील प्रत्येक नागरीक मन:शान्तिची अनुभूती घेऊ शकतो. 'सकारात्मक परस्परावलंबन' ही संकल्पना सर्वांगीण समाजहितासाठी फार महत्त्वाची आहे.

समाजाच्या नेत्याने अथवा मुखियाने आपले वर्तन आणि आचरण आदर्श ठेवले पाहिजे, तरच त्याची प्रजा त्याचे अनुकरण करेल. समाजमन फार संवेदनशील असते. त्यामुळे छोट्या छोट्या प्रसंगांनी, घटनांनी समाज अस्थिर होऊ शकतो आणि त्यामुळे अनिष्ट वृत्ती बळावतात आणि समाज

स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता असते. म्हणून अशा संवेदनशील समाज मनास अत्यंत काळजीपूर्वक जपले पाहिजे.

आपल्या भारत देशाचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदीजींना एका सभेत असा प्रश्न विचारला की, 'आपण एवढ्या उच्चपदावर आहोत, जगप्रसिध्द प्रधानमंत्री आहात, तुम्हाला या क्षणी काय वाटते?' मोदीजींनी उत्तर दिले की, "I am totally detached'! या त्यांच्या छोट्याश्या पण मौलिक उत्तरातून त्यांची निष्परिगृही वृत्ती, आकिंचन्य स्वभाव आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडते. प्रत्येक व्यक्ती जर नैतिकतेचे आचरण करेल तर समाजातील विवेकी, विचारवंत, हितचिंतक, कल्याणमित्र, दूरदृष्टीने वागणाऱ्या व्यक्तिंचे प्रमाण वाढेल आणि एका सुघटीत, सुसंवादी समाजाची नवनिर्मिती होईल यात शंका नाही. त्यासाठी दशधर्म हा समाजधर्म आणि देशधर्म झाला पाहिजे.

John Denver म्हणतात की, "Yes, there is still time to turn around and make all ego and hatred cease. Let us give another name to living and we call it as PEACE"

**सर्वे भवन्तु सुखिन: सर्वे सन्तु निरामया :।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दु:खभाग्भवेत्।।**

आपण सर्वजण मिळून समाज-स्वास्थ्यासाठी ही कल्याणकारी प्रार्थना करू या.

---

## भगवान कुलभूषण आणि भगवान देशभूषण यांची निर्वाणभूमी श्री सिद्धक्षेत्र कुंथलगिरी येथे प्राकृत विद्या शिक्षण व धर्म संस्कार शिबिर संपन्न



प्राकृत भाषा विकास फाउंडेशन (रजि.) सागर (मध्य प्रदेश) आणि सन्मती संस्कार मंच संचलित प्राकृत विद्या शिक्षण शिबिर आणि धर्म संस्कार शिबिर दिनांक २९ मे ते १ जून २०२५ पर्यंत श्री. सिद्धक्षेत्र कुंथलगिरी, जि. धाराशिव येथे संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन सन्मती संस्कार मंचचे संस्थापक धर्मानुरागी श्री. सुरेशजी चौगुले यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी परमपूज्य आचार्य श्री १०८ विद्यासागरजी महाराज यांचे परम शिष्य परमपूज्य १०८ मोक्षसागरजी महाराज आणि परमपूज्य १०८ सहजसागरजी महाराज यांनीही शिबिरार्थींना संबोधित केले. यावेळी स्वस्तिश्री भट्टारक पट्टाचार्य जिनसेन महास्वामीजी - नांदणी मठ यांचेही आगमन झाले. त्यांनीही आपल्या आशीर्वचनामध्ये प्राकृत भाषेच्या अध्ययनाचे महत्त्व शिबिरार्थींना सांगितले.

शिबिरामध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटकातून जवळजवळ २७५शिबिरार्थी सहभागी झाले होते. या शिबिरामध्ये सर्वांना समयसार व परमात्मप्रकाश आणि सुनील प्राकृत समग्र या आगम ग्रंथामधील काही निवडक गाथांचे अध्यापन केले. डॉ. सुरेखा नरदे, सांगली श्री. दीपक अथणे (शास्त्री) इचलकरंजी तसेच श्री. अक्षय चव्हाण (शास्त्री) आळते यांनी प्राकृत भाषा व आगमशास्त्राचे (धर्मदर्शनाचे) अध्यापन केले. या शिबिरात सहभागी झालेल्या इयत्ता नववीच्या पुढील विद्यार्थी विद्यार्थिनींना बेसिक प्राकृतचे अध्यापन डॉ. सुरेखा नरदे यांनी केले.

शिबिरामध्ये दि. ३१ मे रोजी श्रुतपंचमी व प्राकृत भाषा दिन साजरा केला. श्रुतपंचमी आणि प्राकृत भाषेचे महत्त्व श्री दीपक अथणे यांनी शिबीरार्थींना सांगितले. शासकीय अधिकारी श्री अश्विन कनाळे यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींना करिअर गायडन्स केले. शिबिराची सांगता प्राकृताचार्यश्री सुनीलसागरजी महाराज लिखित 'जयदु भारदी' या जिनवाणी स्तुतीने झाली. त्यानंतर कुंथलगिरी सिद्धक्षेत्रावर शिबिरार्थींनी वृक्षारोपण संपन्न केले. या प्राकृत विद्या शिक्षण शिबिराचे क्षेत्रीय संयोजन सन्मती संस्कार मंचच्या सहयोगाने डॉ. सुरेखा नरदे, सांगली यांनी केले.

डॉ. जयपाल चौगुले, श्री. सुरेश माणगावे, श्री विजयजी भोकरे, श्री. सुनील पाटील (पत्रकार) आणि सन्मती संस्कार मंचच्या सर्व संघटक व संघटिकांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी सहयोग दिला. तसेच डॉ. आशिषकुमार जैन (बम्होरी)यांनी कुंथलगिरी सिद्धक्षेत्रावर शिबिर घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. - डॉ. सुरेखा संजय नरदे, सांगली.

# वीर शासन जयंती

सौ. हर्षा वेखंडे

संसाराचं दुष्टचक्र..
या चक्रव्यूहाच्या मध्ये उभा असलेला अभिमन्यू!
ज्याला या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा कुठलाच मार्ग मिळत नाही..
अभिमन्यू एकदाच धाराशाही पडला..
पण संसारी जीव नावाचा अभिमन्यू सतत या संसार चक्रावर आपटून आपटून मरतो आहे.. परत जन्मतो आणि परत मरतो आहे...
त्याला सुटकेचा रस्ता नाही कळत..!
तुरुंगाच्या कठोर धारदार कठड्यांवर आपटून नाही का आंधळा मरत...!
काही तर अगदीच ठार वेडे!!
त्यांना कळतच नाही की आपण वेढ्यात सापडलोय..
इथे मुस्कटदाबी होते..
पाठीवर भार लादला जातो..
मानेवर जू येतं...
घाण्याला जुंपलं जातं..
फिरा फिरा मग.
मनुष्य.. तिर्यंच.. नारकी.. मनुष्य... देव..!
क्रम बदलू शकतो पण भ्रमंती नाही सुटत..! एका भवातील कुठलाच जमीन जुमला सोबत घेता येत नाही... अनादीचा प्रवास हा..
कुणा वेड्यांना कळतच नाही... काहींना लक्षात येते परिस्थिती, की हे सारं दुःखद आहे, पण रस्ता नाही उमजत..
बसतो चाचपडत चुकीच्या दिशेने..
पण हो!!
एखादा असा पुरुषार्थी असतो, की त्याला कळतो या चक्रव्यूहाचा भेद!
कारण त्याने शर्थीने शोधला असतो रस्ता, वळण..
कुठून या वेढ्याला फोडलं जाऊ शकतं ती जागा...
आणि सुटला असतो कायमचा या चक्रव्यूहातून!!
श्वास भरला असतो सुखाचा सुखाचा...
अनंत काळापर्यंतचा...
तिथे निश्वासच नाही...
ते सुखाचे कण निसटणं नाही..
आणि मग तो धीर गंभीर वीर पुरुष दिशा दाखवण्यासाठी उभा ठाकतो...!
त्याचे शब्द मैलाचे दगड ठरतात...
अनेक अनेक वर्षांसाठी दिशा देणारे..
नेमकं कसं कसं जायचं.. कुठून सुटण्याचा गुप्त मार्ग आहे ...
ती लपलेली कळ.. सांगतो तो!!
अनादी काळापासून होत आले आहेत असे वीर!
अनेक.. अनंत झालेत!!
पण आम्ही नाही या चक्रातून सुटलो.. फिरतोय.. अनादी काळापासून.. दरदरच्या ठोकरा खात!
कदाचित कुणा वीराने दाखवला ही असेल मार्ग!
पण आडमुठेपणा केला असेल आम्ही... दुर्लक्ष केलं असेल... अहंकाराने मान फिरवली असेल आणि या भवभवांच्या चिखलात पाय रुतवून घेतले असतील पार गळ्यापर्यंत... किंवा कदाचित मिळालेच नसतील अशा श्रेष्ठ पुरुषांचे शब्द आम्हाला कधी ऐकण्यासाठी समजून घेण्यासाठी !

पण आज.. आता.. या भवात लक्षात आलंय एक अजय राज्यकर्ता असा होऊन गेला ज्याने सर्व शत्रूंना जिंकण्याचा अमोघ मार्ग सांगितला... संसाराचा तट कुठून तोडायचा.... घाव कुठे घालायचा. हे स्पष्ट सांगितलं ...पुढे कसं कसं जायचं, सगळे टप्पे स्पष्ट केलेत. सगळं निर्विवाद सत्य!!
कारण तोच रस्ता त्याने चोखंदळला होता!! त्याच वाटेने तो संसारचक्रातून पार झाला होता. अडीच

तीन हजारावर वर्षे झाली असतील पहिल्यांदा ऐकण्यात आले होते त्या श्रेष्ठीचे शब्द! महाश्रमणाचे शब्द!!

सुटकेचा मार्ग दाखवणारे...

तीच आजची तिथी.. वीर शासन जयंती.

ज्या दिवशी भगवान महावीरांची वाणी प्रथमतः खिरली!!

त्यांच्यानंतर कोणा जीवाची अशी योग्यता नव्हती, की मुक्तीचा मार्ग प्रत्यक्ष जाणून तो सर्व जीवांपर्यंत पोहोचवावा!

ज्यांनी त्यांची संपूर्ण वाणी ग्रहण केली ते गौतम स्वामी समवशरणात प्रवेश करते झाले आणि आमचे पहिले गुरु ठरले! त्यांच्या मार्फत गुरुपरंपरा चालली म्हणून आम्ही गुरुपौर्णिमा साजरी करतो. त्यांनी आमच्यापर्यंत जे पोहोचवलं, तो सांगितलेला मार्ग मात्र वीर प्रभूंनी सांगितलेला होता. ते होते दिशादर्शक! त्यांच्या राज्यात आहोत आपण. त्यांच्या शासनात आहोत! तीर्थात आहोत!!

हे तीर्थ ग्रहण करायचं आणि पूर्ण शक्तीनिशी तोडायचा फोडायचा हा संसाराचा वेढा... की परत फिरवायची पाठ त्यांच्या वाणीकडे.. आणि खितपत पडायचं या दुर्दम्य चिखलात!!

निर्णय आमचा आम्ही करायचा!!

धन्य ते चोविसावे तीर्थंकर महावीर!

पार झालेत संसारातून आणि मार्ग दाखवून गेलेत! जेवढे त्यांचे उपकार तेवढेच त्या क्षणांचे..

त्या वाणीचे!

धन्य ते वीर प्रभू!

धन्य वीर शासन जयंती!

जयतु शासनम्।

## सभासदांना विनम्र निवेदन....

सन्मति - मासिकाची अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीकडे यशस्वी वाटचाल झालेली आहे. परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराजांची प्रेरणा, बाहुबली संस्थेकडून मिळालेले सततचे पाठबळ आणि सर्व वाचक सभासदांकडून मिळालेले आत्मीय सहयोग यामुळे गेल्या ७५ वर्षांपासून धर्म प्रभावनेचा हा सन्मति-प्रवाह वाहता आहे. अनेक अडचणींवर मात करीत आणि प्रसंगी तोटा सहन करून सन्मति मासिक जैन साहित्यात योगदान देत आहे. जानेवारी २०१५ पासून मासिकाची वार्षिक वर्गणी रु. १५०/- आणि आजीवन (१५ वर्षाकरिता) १,५००/- रुपये अशाप्रकारे होती. परंतु वाढती महागाई प्रिंटिंग, कागद, डीटीपी व डिझाईन या सर्वच गोष्टींना प्रभावित करीत आहे. त्यामुळे **चालू महिन्यापासून वार्षिक वर्गणी रुपये २५० आणि आजीवन (१५ वर्षाकरिता) रुपये २,५००/-** अशा प्रकारे वाढ करण्यात येत आहे.

आपण सर्वांनी अनेक वर्षापासून या मासिकास जो सहयोग दिला, त्याबद्दल अनेक धन्यवाद ! या मासिकाला दीर्घजीवी बनवण्यासाठी आणि भविष्यातही ते सुचारू पद्धतीने सुरू राहण्यासाठी मासिकावर प्रेम करणारे सर्व वाचक ही अपरिहार्यता समजून घेतील आणि भविष्यातही असाच सहयोग देतील हा विश्वास वाटतो. तेव्हा सर्व सभासदांना विनंती आहे की आपण सर्वांनी लवकरात लवकर वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे.

**-संपादक मंडळ**

# ज्ञान – विलास

ब्र. नन्दलालजी हे मागील शतकात होऊन गेलेले एक श्रेष्ठ अध्यात्म साधक, उत्तम साहित्यकार होते. कारंजा(लाड) येथील दि.जैन सेनगण मंदिरातील तत्कालीन पीठाधीश भट्टारक श्री वीरसेन स्वामी (समाधी –१९४३) यांचे ते पट्टशिष्य होते. भिण्ड (म.प्र.) येथील ब्र. नन्दलाल दिगंबर जैन ग्रंथमाले द्वारा त्यांच्या अनेक आध्यात्मिक रचना प्रकाशित झाल्या आहेत.

सन १९४७ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या एका पुस्तिकेतील दशधर्मावरील ही मार्मिक रचना पर्युषण पर्वानिमित्त येथे प्रस्तुत करीत आहोत.

**क्षमा भाव –** क्षमा वहीं जहां ज्ञान सही है, सम्यक्–स्वाद मिथ्यात्व नहीं ।
ज्ञान–जान ! अज्ञान नहीं है, राग त्याग ! जब क्षमा सही ।।

**मार्दव भाव –** मार्दव–भाव सहज कोमल लख ! दर्पण सम परिणाम विमल ।
ज्ञेय संगतें विविध भाव यदि, तदपि असंग स्वरूप निकल ।।

**आर्जव भाव–** आर्जव–भाव स्वभाव सिद्ध है, स्वल–रूप परिणमन सतत ।
क्रोधादिकसे विरत निरंतर, लख ! स्वभाव नहिं होत असत् ।।

**सत्य भाव–** सत्य, नित्य ही सिद्ध–स्वरूपी, नाद्यनंत सर्वांग अमल ।
मुनिवर ध्याते सुख अति पाते, शुद्ध निरंजन देख अचल ।।

**शौच भाव–** शौच–भाव निज–रूप अमोहक, सम्यक्–लोक छाँड–परमाद ।
उज्वल स्वयं सिद्ध ज्ञायक छवि, स्वयं–देव ?अब लो ! आस्वाद ।।

**संयम भाव–** साम्यभाव समय सुस्थिर नित, बाह्य ममत्त्व विभाव विलास ।
बंधहेतु अज्ञान त्याग दो, शशि सम अनुभव होय विकास ।।

**तप भाव–** ज्ञान तपो–बल इच्छा रुकते, चिदाकार चिद्रूप प्रसार ।
ज्ञानहि आप, आप ज्ञानी हो स्वयं ज्ञान–तप तपो संभार ।।

**त्याग भाव–** त्याग पराश्रितभाव अनात्मिक,ज्ञानाश्रित हो !एक सुझाव।।
ग्रहण त्यागका विकलप नाहीं, अलख–आप लख ! सुलभ उपाव ।।

**अकिंचन्य भाव–** अकिंचन्य–भाव सम–रूपो, निर्विकल्पता निज आवास ।
टंकोत्कीर्ण विश्वरूपात्मक, देख ! अनादी कर विश्वास ।।

**ब्रह्मचर्य भाव–** ब्रह्मज्ञान साध ब्रह्मचारो, ब्रह्म रूपमें करो निवास ।
नित्य–मुक्त–पद लख ! नित्योदित ! नन्द, ब्रह्मका ज्ञान–विलास ।।

**रचयिता – ब्रह्मचारी नन्दलाल महाराज**

# प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

(लेख क्र. १३७)

आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी

आचार्यदेवांनी पहिल्या गाथेमध्ये श्रमण होण्याची प्रेरणा केली. केवळ प्रेरणाच दिली असे नाही तर आधार पण दिला की 'या मार्गावरून जाऊन आम्ही स्वयं स्वस्थपणाला प्राप्त झालो आहोत. तुम्ही संयम धारण करायला भिऊ नका. त्या श्रमणपणाला अंगीकार करण्याचा मार्ग आम्ही अनुभवलेला आहे तो दाखविण्यासाठी आम्ही मार्गावर उभे आहोत.' ज्याप्रमाणे प्रवासाला जाताना जर आपल्याबरोबर मार्ग पाहिलेला पुरुष असेल तर त्या मार्गावर निःशंकपणे प्रवृत्ती होते. वाट चुकण्याची कधी भीती वाटत नाही, त्याप्रमाणे मोक्षाचा मार्ग दाखविण्यासाठीं मार्गद्रष्टा आचार्य आपल्यासमोर उभे आहेत त्यामुळे भव्यजीव मोक्षमार्गावर निःशंकपणे वाटचाल करतात. भीत नाहीत. आपल्या हिताची गोष्ट ऐकून आसन्न भव्यजीव श्रमण होण्याची इच्छा करतो. तो प्रथम काय काय करतो ? यांचा उपदेश करतात. अर्थात श्रमण होण्याची विधी काय आहे ते सांगतात. -

**आपिच्छ बंधुवग्गं विमोचिदो गुरुकलत्तपुत्तेहिं ।**
**आसिज्ज णाणदंसणचरित्ततववीरियायारं ।।२०२।।**

**अन्वयार्थ** - मुनी होण्याचा इच्छुक पुरुष **(बंधुवग्गं आपिच्छ)** कुटुंबियांना विचारून **(गुरुकलत्तपुत्तेहिं विमोचिदो)** माता पिता इत्यादी वडीलमंडळी, स्त्री व पुत्रापासून स्वतःला सोडवितो व **(णाणदंसणचरित्ततववीरियायारं)** ज्ञानाचार, दर्शनाचार, चारित्राचार, तपाचार आणि विर्याचाराला **(आसिज्ज)** प्राप्त करून (अंगीकारून) काय करतो, ते पुढील गाथेत सांगतील.

**तात्पर्य** - मुनी होण्याचा इच्छुक पुरुष कुटुंबियांचा निरोप घेऊन पंचाराचा अंगाकार करतो.

*** बंधुवर्गांचा निरोप -**

दीक्षा घेण्याची इच्छा करणाऱ्या सम्यग्दृष्टी भव्य पुरुषाने सर्वप्रथम भाऊ, बहीण, काका, मामा इत्यादी सर्व कुटुंबी लोकांबद्दल ममत्वाचा त्याग करावा. त्याच्या मनामध्ये कोणतीही आकुलता किंवा कुणाविषयी चिंता राहू नये. नाहीतर दीक्षा घेतल्यानंतर कुणाच्या चिंतेमध्ये राहिला तर निःशल्य साधना होऊ शकणार नाही. म्हणून धनधान्य, घर-शेती ज्याची त्याला देऊन भारमुक्त व्हावे. कोणाचे कर्ज असेल तर ते सुद्धा देऊन टाकावे. आपल्याकडून कोणावर अत्याचार किंवा अन्याय झाला असेल तर त्याची क्षमा मागून निःशल्य व्हावे. कोणाची कोणती वस्तू अनीतीने घेतली असेल तर त्याला परत देऊन टाकावी. जर कोणी निराश्रित असेल तर त्याला दानधर्म करून आपल्या धनाचा सदुपयोग करावा. सर्व कुटुंबाच्या ममत्वातून निवृत्त होण्यासाठी व आपल्याविषयी त्यांची ममता काढून टाकण्यासाठी धर्मरसगर्भित उपदेश देऊन त्यांना करावे. दीक्षार्थी कुटुंबियांना याप्रमाणे संबोधन करतो की 'ह्या बंधुवर्गामध्ये राहणाऱ्या आत्म्यांनो, या पुरुषाचा आत्मा किंचित्मात्रसुद्धा तुमचा नाही. तुमचा संबंध माझ्या या शरीराशी आहे. परन्तु माझ्या आत्म्याशी तुमचा संबंध नाही. म्हणून मी तुमचा निरोप घेतो. आता हा आत्मा आपल्या अनादिप्रभुजवळ जात आहे. आत्मा अनादि-अनन्त आहे. चैतन्य स्वरूप आहे. त्याचा संबंध आपल्या गुणांशी आहे. अनंत गुण हाच आत्म्याचा परिवार आहे. जेथे माझ्या आत्म्याचा संबंध दुसऱ्या आत्म्याशी व त्यांच्या गुणांशी नाही तेथे या आत्म्याचा संबंध शरीराशी व त्या शरीराच्या संबंधी असणाऱ्या आपण बंधुवर्गाबरोबर कसा असू शकतो ? जेव्हा हा जीव या शरीरातून निघून जातो तेव्हा सर्व

बंधुजन त्याला पकडू शकत नाहीत किंवा जाण्यापासून रोखू शकत नाहीत. ज्या शरीरावर जन्मभर प्रेम केले त्या शरीराला निर्जीव समजून जाळून टाकतात. तेव्हा नाविलाज होऊन का होईना सर्वांना संतोष करावा लागतो. एक दिवस माझ्यावर सुद्धा हा प्रसंग येणार आहे. चौघांनी खांद्यावर घेऊन मला घराबाहेर काढण्यापेक्षा मीच दोन पायांनी बाहेर पडणे हिताचे आहे. मी नाशवंत या शरीराच्याद्वारे तपस्या करून रत्नत्रयाची साधना करून मुक्तीचा उपाय करू इच्छितो. वृषभादी तीर्थंकर, भरत, बाहुबली, राम, पांडवादी पुराणपुरुषांनी ज्या मार्गाचा अवलंब केला त्याच मार्गाचे मी अनुकरण करू इच्छितो. म्हणून मला आत्महितासाठी सन्मुख जाणून आपण माझा विषाद करू नये. उलट हर्ष मानावा की हा पुरुष एक उत्तम कार्य करण्यासाठी जात आहे. त्याला आमची अनुमोदना आहे. जर माझ्या आत्म्याशी तुमचे खरे प्रेम असेल तर ज्यामध्ये माझ्या आत्म्याचे हित आहे ते कार्य करण्यासाठी मला उत्साहित करावे. मी मुक्ती सुन्दरीला वरण्यासाठी मुनिदीक्षारूपी घोड्यावर बसून ज्ञान, संयम तपादी वरातींना बरोबर घेऊन जाणार आहे. यावेळी आपण सर्वांनी, या माझ्या आत्म्याच्या विवाहाच्यासमयी मंगलाचरणरूप जिनेन्द्रांचे गुणगान करून मला निरोप द्यावा. आपण ही अनुपम आनन्दासाठी माझ्याबरोबर मुनिव्रत, आर्यिका व्रत, क्षुल्लकादी व्रत धारण करण्याचे भाव करावेत.

**✻ मात्यापित्यापासून स्वतःची सोडवणूक –**

बंधुवर्गाचा केवळ व्यवहार निभावण्यासाठी शेवटी निरोप घेतला जातो. त्यांच्यातून स्वतःला सोडवण्याची गरज नसते. ज्यांच्या ममत्वामुळे हा जीव गृहस्थ अवस्थेत अडकतो. ज्यांची जबाबदारी आपल्यावर आहे असे हा समजतो. अशी तीन प्रकारची नाती आहेत. १) गुरुजण–माता–पिता, २) पति–पत्नी, ३) मुल/मुली. यांच्या ममत्वातून स्वतःला सोडवणे महाकठीण कार्य असते. ज्याच्या अंतरंगामध्ये वैराग्याचा महास्फोट होतो व आपल्या आत्म्याशीच जो आपला संबंध स्थापित करतो असा भेदविज्ञानी महावीर्यवान पुरुषच त्यांच्यातून आपल्याला सोडवून घेतो व आत्महित करण्यासाठी घराबाहेर पडतो. गुरुंच्यामध्ये आदिगुरु आपले आई–वडील आहेत. ज्यांनी हिताच्या अभिप्रायाने महाकष्ट करून या जीवाचे पालन–पोषण केले. या जीवाकडून अनेक आशा ठेवल्या. हाच आपल्याला म्हातारपणी आधार आहे. स्वतः उपाशी राहिले, पण स्वतःच्या अपत्याला पोटभरून खाऊ घातले. स्वतः उघडे राहिले, पण आपल्या मुलाला अंगभर वस्त्र घातले. या आईवडिलांच्या मोहातून हा विरक्त संत स्वतःला सोडवतो. त्यांना संबोधन करतो की 'अहो, या पुरुषाच्या शरीराच्या जनकाचा आत्मा! अहो, या पुरुषाच्या शरीराच्या जननीचा आत्मा! या पुरुषाचा आत्मा तुमच्याकडून उत्पन्न केला गेला नाही. कारण हा आत्मा अजन्मा आहे, अनादी आहे म्हणून या आत्म्याला आपण उत्पन्न केले नाही आपण या अचेतन पुद्‍गलमय शरीराच्या उत्पत्तीमध्ये निमित्तमात्र आहात. असे तुम्ही निश्चयाने जाणा. आजपर्यंत या जीवाच्या शरीरावर मोह करून याचे पालनपोषण केले, मोह करून आपला संसार वाढवला. आता या जीवाचा मोह सोडा. या जीवाची आता भेदविज्ञान ज्योती प्रकट झाली आहे. त्या ज्योतीच्या प्रकाशात सर्व वस्तू भिन्न भिन्न भासित होत आहेत. हा आत्मा आज आपल्या अनादिजनक आत्म्याजवळ चालला आहे. त्याला आनंदाने परवानगी देऊन अनुमोदना करा व आपल्या आत्म्याचे सुद्धा कल्याण करा. तुम्ही सुद्धा निर्मम होऊन मोक्षमार्गावर आरूढ व्हा. कोणी आपले नाही. शुद्ध बुद्ध एकस्वभावी ध्रुव आत्मा तेवढाच आपला आहे. आता त्याच्याशीच आपला संबंध स्थापित करा.'

पुत्राचा मोह सोडणे दुर्निवार आहे. पुत्राच्या वियोगामुळे शोक करून अनेक माता दुर्गतीला प्राप्त झाल्या. सुकुमाल मुनींची माता पुत्र दीक्षा घेऊन गेल्यामुळे आर्तध्यान करून दुर्गतीला प्राप्त झाली. सुकौशल मुनींची माता तर पुत्रवियोगामध्ये अतिशोकाकुल होऊन मरून वाघीण बनली व ज्या

मुलावर जीवापाड प्रेम केले त्याच्या वियोगात आर्तध्यान करून स्वतःची दुर्गती केली. त्याच ध्यानस्थ अवस्थेमध्ये बसलेल्या स्वपुत्राला अज्ञानाने गिळंकृत केले. किती मोहाची विचित्रता आहे. यावरूनच लक्षात येते आईवडिलांना संतुष्ट करून त्यांना आपल्या मोहातून सोडवणे अवघड आहे. शांतिसागर महाराजांना सुद्धा आईवडीलांसाठी गृहस्थ अवस्थेत थांबावे लागले. परंतु ज्याच्या वैराग्याची अंतरंग धारा तीव्रवेगाने प्रवाहित आहे. त्याला कोणी बांध घालू शकत नाही. तो या संसाराचा घाट तोडून बाहेर पडतो.

**✻ दीक्षार्थीची स्त्रीच्या मोहातून सुटका –**

आईवडिलांपासून आपली सोडवणूक करून पत्नी जवळ जातो व तिला आपल्या मोहातून सोडवण्यासाठी संबोधन करतो, 'हे या पुरुषाच्या शरीराला रमविणाऱ्याची आत्मा, तू या पुरुषाच्या आत्म्याला रमवणारी नाहीस. तू माझ्या या शरीराला खाऊ पिऊ घालून रमवतेस. या शरीररावर प्रेम करून मला पण प्रेमात पाडलेस. तुझा माझा संबंध या शरीरामुळे आहे. माझ्या आत्म्याने कोणाशी विवाह केला नाही. त्याची स्त्री ही स्वानुभूती आहे, जी सदैव त्याच्या अंगामध्येच प्रेमाळू होऊन व्यापते. मी त्या स्वानुभूतीरूपी अनादिरमणीजवळ चाललो आहे. आता तू माझा मोह सोड. आता या जीवाची भेदविज्ञान ज्योती प्रकट झाली आहे. तो आपल्या कर्मशत्रूवर विजय प्राप्त करून मुक्तिवधूच्या स्वयंवर मंडपात जैनेश्वरी दीक्षा धारण करण्यासाठी चालला आहे. ज्याप्रमाणे युद्धभूमीवर शत्रूशी लढण्यासाठी जात असता मला हसतमुखाने आरती करून पाठवणी करीत होतीस त्याचप्रमाणे आता कर्मशत्रूवर विजय प्राप्त करून जितेंद्रिय जिन बनण्यासाठी मी प्रस्थान करीत आहे, त्याचा तू हसतमुखाने व सुखाभासता स्वीकार करून निरोप दे. तूसुद्धा संसाराची क्षणभंगुरता, भोगांची असारता जाणून आर्यिका दीक्षा ग्रहण करून स्वतःचे कल्याण करून घे. जे स्वतःचे हित करतात तेच बुद्धिमान् विवेकी पुरुष आहेत. या त्याच्या संबोधनाने स्त्रीच्या हृदयात ही वैराग्याची कणिका जागृत होऊ शकते व ती ही पतीच्या मार्गाचे अनुसरण करते. याची कित्येक उदाहरणे प्रथमानुयोगात उपलब्ध आहेत.

पद्मपुराणात कथा येते की उदयसुन्दराच्या बहिणीचा पती आपल्या स्त्रीच्या मोहामध्ये आसक्त होऊन तिचा विरह सहन करू शकत नसल्यामुळे तिच्याबरोबर माहेरी जायला निघतो. वाटेत जंगलामध्ये मुनीराजांचे दर्शन करताच त्याच्या मनात विरक्तता उत्पन्न झाली. तो एकटक मुनिराजांकडे पाहू लागला. त्याचा मेहुणा उदयसुन्दर चेष्टेने म्हणतो 'काय विचार आहे, तुम्हाला मुनी व्हायचे आहे काय ?' तो म्हणतो, 'हो मुनी बनणार, आम्ही मुनी झालो तर तुम्ही पण मुनी होणार काय ?' तो हसत चेष्टेने म्हणतो, 'हो, तुम्ही मुनी झाला तर आम्ही पण होणार ?' उदयसुन्दरला वांटते हा तर स्त्रीमध्ये एवढा आसक्त आहे, हा काय दीक्षा घेतो ? परंतु जेव्हा आपल्या भाऊजी खरोखरच मुनींच्या चरणाजवळ जाऊन दीक्षा ग्रहण करण्याची विनंती करतात व पंचमुष्टी केशलोच करून साक्षात मुनी बनतात तेव्हा तो प्रसंग पाहून मेहुणा सुद्धा दिलेल्या वचनानुसार विरक्त होऊन मुनी बनतो. त्या दोघांची अद्भुत लीला पाहून स्त्रीसुद्धा विषयांपासून विरक्तत होऊन आर्यिका व्रत धारण करते. धन्य आहे अशा परिवाराचा संग, ज्यांच्या संगतीमुळे, सद्वचनाने दुसऱ्यांचा सुद्धा उद्धार होतो.

हा जीव अनादिकाळापासून आपल्या अनुभूतीमध्ये रमत आला आहे. कधी खोट्या अनुभूतीमध्ये रममाण झाला. कधी चांगल्या अनुभूतीमध्ये रममाण झाला, परंतु हा जीव आपल्या अनुभूतीला सोडून अन्य कोणत्याही पदार्थामध्ये रमू शकत नाही. मी आता आपल्या अनादिरमणीस्वरूप स्वच्या अनुभूतीला प्राप्त होतो. येथे आता ज्ञान जागृत झाले आहे म्हणून स्वतःच्या अनुभूतीमध्ये रमू इच्छितो.

**✻ पुत्रमोहातून निवृत्ती –**

पुत्राला जन्म दिला त्याचवेळी हा जीव स्वयं पिता बनला आणि हे आपले अपत्य आहे असे

मानून त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी आपल्यावर घेतो. आपले सर्व जीवन त्याच्यासाठी समर्पित करतो. आता या साधक जीवात विवेक जागृत झाला आहे. त्यामुळे मोहाची पक्कड ढिली झाली आहे. या सर्व जबाबदारीतून निवृत्त होऊन स्वतंत्र जीवन जगण्यासाठी मुनी होऊ इच्छितो तो आपल्या मुलामुलींना संबोधन करतो. –

'अहो, या पुरुषाच्या शरीराच्या द्वारे जन्मलेल्या पुत्राच्या आत्म्यांनो, या पुरुषाच्या शरीरात राहणाऱ्या माझ्या आत्म्यापासून तुम्ही उत्पन्न झाले नाहीत, आता माझ्याशी असणाऱ्या ममतेची दोरी तोडून टाका. तुमच्या आत्म्याचा मी जन्मदाता नाही. ज्या शरीराच्या निर्मितीमध्ये मी निमित्त बनलो ते शरीर पौद्‌गलिक आहे. तुम्ही स्वयं स्वतन्त्र सत् आहात. स्वतःच्या स्वरूपामध्ये राहणारे आहात. तुम्ही माझ्या अधीन नाही. या माझ्या आत्म्यावर आता मोह करू नका. जर तुम्हाला असे वाटत असेल की वडिलांनी आपल्यावर एवढे उपकार केले आहेत. त्यांचा मीकाय प्रत्युपकार करू ? जर खरोखर प्रत्युपकाराची भावना असेल तर हाच उपकार माझ्यावर करा की माझ्या आत्महितरूप कार्यामध्ये हर्षित होऊन मला उत्साहित करा व आनंदाने माझी विदाई करा. माझी अन्तिम शिकवण हीच आहे की 'धर्मच हा जीवाचा खरा मित्र, माता, पिता व बन्धु आहे. धर्मसाधनेमध्ये प्रमाद करू नका. धर्मच दुर्गतीतून वाचवून स्वर्गमोक्षाला नेणारा आहे. म्हणून तुम्हीसुद्धा माझे अनुकरण करून आत्महित करा. आता मी माझ्या अनादिजन्म आत्म्याजवळ जात आहे. निश्चयाने आत्म्याचा पुत्र स्वयं आत्माच आहे. उपादानभूत आत्मपदार्थ आपल्या परिणामांना उत्पन्न करतो. ते परिणाम आत्माच आहे. म्हणून आत्म्याने निजआत्म्यालाच जन्म दिला आहे.'

'हे सर्व कुटुम्बीजण, तुमच्या सर्वांचे नाते या शरीराशी आहे. माझ्या आत्म्याशी तुमचा काही संबंध नाही. म्हणून या क्षणभंगुर शरीराला तपस्येमध्ये लावलेले पाहून शोक न करता हर्ष मानला पाहिजे. तुम्ही सुद्धा हीच भावना करा की आम्ही सुद्धा या शरीराद्वारे तप करून याला निर्वाणाचे साधन बनवू.'

अशाप्रकारे सर्वांना समजावून सर्वांचे मन शांत करावे. त्यांना समजून सांगून सुद्धा जर ते ममत्व वाढवण्याच्या गोष्टी करू लागले, संसारात अडकविण्याचा प्रयत्न करू लागले तर त्यांच्याकडे लक्ष न देता दीक्षार्थींनी स्वयं ममतेची दोरी तोडून गृहत्याग करून निघून जावे. ते जोपर्यंत ममत्व सोडत नाहीत तोपर्यंत मी गृहवासाचा कसा त्याग करू असा मोहाचा विकल्प कधी करू नये.

ही कुटुंबाला समजावण्याची प्रथा एक व्यवहारमात्र आहे. असा नियम नाही की 'कुटुंबाला समजावल्याशिवाय दीक्षाच घ्यायची नाही. त्यांनी परवानगी दिली नाही तर दीक्षाच घ्यायची नाही असा पण नियम नाही. पुष्कळ वेळा, असा प्रसंग येतो की कुटुम्बी लोक आपल्याजवळ नाहीत, दीक्षा घेण्याची इच्छा उत्पन्न होते तो तेथेच गुरुजवळ दीक्षा ग्रहण करतो. जर कुटुंब जवळ असेल तर त्यांच्या परिणामांना शांत करण्यासाठी उपदेश देणे उचित आहे. जर कुटुंबीजण जवळ नाहीत तर त्यांना समजावण्यासाठी कुटुंबाजवळ जाणे नंतर दीक्षा घेणे अशी काही आवश्यकता नाही. दीक्षार्थींनी आपले मन रागद्वेषाने शून्य करून समता व शांतभावनेने पूर्ण करावे व निःशल्य होऊन श्रामण्याचा स्वीकार करावा.

एकदा श्रीकृष्ण नारायणाच्या सभेमध्ये ही चर्चा चालू होती की बारा वर्षानंतर द्वारकानगरी जळून खाक होणार आहे. भगवान् नेमिनाथांचे वचन असत्य होऊ शकत नाही. ज्याला विरक्त व्हायचे असेल त्यांनी विरक्त व्हा. ज्याला जो उपाय करायचा असेल तो करा. अनेक पुरुष विरक्त झाले. श्रीकष्णाचे पुत्र प्रद्युम्नकुमार पण विरक्त झाले. त्यांनी विचार केला 'या मायामयी संसार जाळ्यात अडकून काही आपले प्रयोजन सिद्ध होणार नाही'. अशी भावना करून ते जाऊ लागले. लोक त्याला समजावून लागले. 'हे पहा बेटा, तू काय करत आहेस ? तुझे अज्जा वसुदेव, तुझे पिता, काका

सर्वजण येथे बसले आहेत. या सर्व वृद्धांच्या समोर अशा गोष्टी तू काय करतोस ?' प्रद्युम्नकुमार म्हणाले, 'माझे अज्जा, वडील आदी या संसाराचे स्तंभ बनून राहण्याची इच्छा करीत असतील त्यांना राहू देत. माझ्यामध्ये आता या संसारात राहण्याची शक्ती नाही. मी आता चाललो' असे म्हणून तेथून निघून जातो व पत्नीला जाऊन म्हणातो, 'मला वैराग्य झाले आहे, मी चाललो आहे, तू मला परवानीग दे.' पत्नी म्हणते, 'तुम्ही पूर्ण विरक्त झाला नाहीत, विरक्त झाला असता तर माझी आठवण तुम्हाला झाली नसती व मला सांगायला आला नसता. तुम्ही जावा अथवा जाऊ नका, मी तर चालले.' असे म्हणून ती दीक्षा घेण्यासाठी निघून जाते.

(क्रमशः)

## डॉ. महावीर अक्कोळे यांना स्व. श्री. बी. ए. चौगुले स्मृती पुरस्कार प्रदान



आजच्या सामाजिक वातावरणामध्ये जाती-धर्मामध्ये तेढ पसरवण्यापेक्षा सहिष्णुता निर्माण करणे गरजेचे आहे. प्राचीन काळामध्ये अनेक धर्म आणि जातीसमूह एकमेकांशी सौहार्द पूर्ण संबंध ठेवत होते. त्यामध्ये जैनसमाजाचे आणि साधू वर्गाचे योगदान महत्त्वाचे होते. अहिंसा आणि सहिष्णुता हाच जैन समाजाचा मूळ पाया आहे. समाजात ईश्वराची मध्यस्थी नको, ईश्वर नाकारणारे जैनतत्त्वज्ञान मानवतेला प्राधान्य देते. मानवतेचे हेच तत्त्वज्ञान लक्षात घेऊन समकाळातही जैन समाजाने सामाजिक सहिष्णुता राखण्यासाठी मध्यस्थी करावी, असे विचार प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी मांडले. डॉ. महावीर अक्कोळे यांना प्राध्यापक बी. ए. चौगुले स्मृती पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाहुबली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष बाबासाहेब पाटील होते तर इचलकरंजीचे धन्वंतरी डॉ. कुबेर मगदूम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. बाहुबली येथील आचार्यश्री शांतिसागर प्रवचन भवन, बाहुबली येथे दि. ७ जून २०२५ रोजीहा पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

डॉ. महावीर अक्कोळे म्हणाले, 'जैन पत्रकारितेचे स्वतंत्र्य अस्तित्व अबाधित राखणे हे निरोगी जैन समाजासाठी आवश्यक आहे. सध्या जैन समाजात घुसलेले राजकारण हे समाजाला घातक असून जैन पत्रकारितेने याविषयी भूमिका घेणे आवश्यक आहे. प्रगति आणि जिनविजयला प्रखर आणि पुरोगामी परंपरा लाभलेली आहे. ती परंपरा पुढे घेऊन गेली तरच जैन समाजातील अनिष्ट प्रथांवर आणि जैन समाजावर येणाऱ्या अरिष्टांवर मात करता येऊ शकते. कर्मकांड आणि राजकारणापासून जैन समाजाने बाजूला राहिले तरच समाजाची प्रगती होऊ शकेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गोमटेश्वर पाटील यांनी केले प्रास्ताविकात श्रमण संस्कृती प्रतिष्ठान व या पुरस्काराची भूमिका त्यांनी मांडली. कार्याध्यक्ष डॉ. नेमिनाथ शास्त्री यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्रमण संस्कृती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती अरुणाताई चौगुले यांनी प्रतिष्ठानची भूमिका आणि पुढचे नियोजनाविषयी मनोगत व्यक्त केले. सुरूवातीला प्रा.बी.ए.चौगुले यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. आभार प्रतिष्ठानचे खजिनदार ॲड. संदीप चौगुले यांनी मानले. सूत्रसंचालन श्री. राजकुमार चौगुले यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. बाळासाहेब शेडबाळे, नीलमताई माणगावे, बाबासाहेब शेडबाळे, जिनेंद्र बुबनाळे, दीपक चौगुले, सौ. वैशाली शेडबाळे, अजित पाटील यांनी केले.

कार्यक्रमास डॉ. सुरेश पाटील, अरविंद मजलेकर, श्री. डी. ए. पाटील, सरोजनी होसकल्ले, सौ. विनोदिनी व डॉ. बी. ए. शिखरे, प्रा. इसराणा, सुभाष चौगुले, रावसाहेब पुजारी, जीवंधर गंगाई आदि मान्यवरांसह मोठ्या संख्येने श्रावक-श्राविका उपस्थित होते.

# योगसार चिंतन

(लेखांक ७)

**प्रियदर्शन जैन, नागपूर**

**अह पुणु अप्पा ण वि मुणहि, पुण्णु वि करहि असेसु।**
**तउ वि ण पावइ सिद्धसुहु,पुणु संसार भमेसु ।।१५।।**

**अप्पादंसण इक्क परु,अण्णु ण किं पि वियाणि ।**
**मोक्खह कारण जोईया,णिच्छहु एहउ जाणि ।।१६।।**

अर्थ- आचार्य देव सांगतात की, 'जर तू आत्म्याला न जाणता फक्त पुण्यकर्मच करीत राहिला तरी, तुला सिद्धत्वाची प्राप्ती होणार नाही व पुनः पुनः संसारातच फिरावे लागेल'।।१५।।

अर्थ- हे योगी! एक आत्मदर्शनच मोक्षाचा मार्ग आहे, अन्य दुसरा कोणताच मोक्षमार्ग नाही, हे तू जाणून घे।।१६।।

आपल्या आत्मस्वरूपाचे ज्ञान व श्रद्धान याशिवाय पुण्य भाव सुद्धा बंधाचेच कारण आहेत. येथे आचार्यदेव सांगू इच्छितात की, 'निज शुद्ध स्वभाव म्हणजेच आपला आत्मस्वभाव, त्याचे श्रद्धान-ज्ञान न करताच केलेले शुभ कर्म मुक्तीसाठी मुळीच कार्यकारी ठरत नाहीत, उलट यामुळे तर चार गतींमधे परिभ्रमणच करावं लागतं आणि मग यामुळे जन्म -मरणाचा अंत होत नाही.

खरं तर.. सुखाचे मूळ तर आपल्या आत्मतत्त्वातच विराजमान आहे आणि दुःखाचे मूळ वस्तुस्वरूपाविषयी आपल्या विपरीत मान्यतेत आहे. विपरीत मान्यता असणारे मिथ्यादृष्टी जीव जेव्हा शुभ क्रिया करतात, तेव्हा फळाच्या रूपात त्यांना इंद्रियभोगरूपी सामुग्री प्राप्त होते. त्याचे उपभोगामुळे त्यांना पुन्हा-पुन्हा पापबंध होतो. या उलट ज्ञानी जीवांना शुभोपयोगामुळे जे संयोग प्राप्त होतात, ते सुद्धा निर्जरेचेच कारण बनतात हे आगम वचन आहे, कारण त्यांचा भोग करताना ते अनासक्त असतात.

जे जीव मिथ्याश्रद्धेने धर्माचे अन्यथा श्रद्धान करतात, मिथ्याबुद्धीने शुभ क्रिया करतात, त्यांना जरी अनेकानेक संयोगांची किंवा स्वर्गादींची प्राप्ती होताना दिसत असली तरी धर्माची प्राप्ती होत नाही आणि मुक्तीकरिता तर धर्मच अनिवार्य आहे, अन्य काहीही नाही.....म्हणूनच त्याचा अर्थ समजावून घेणे जरुरी आहे.

खूप ग्रंथ वाचून, पूजा-पाठ, पठण-पाठन करूनही आत्मानुभूती का होत नाही? याचेही कारण म्हणजे मिथ्या श्रद्धान! अज्ञानी जीव धार्मिकतेची प्रतिष्ठा राखण्याचा प्रयत्न तर खूप करतो, परंतु तो खोटा ठरतो, त्याच्या सर्व क्रिया रूढीमात्रच होतात. याचे कारण वस्तुस्वरूपाविषयीचे त्याचे अज्ञान! ज्याला स्वतःला जाणण्याची कला येत नाही, तो अन्य वस्तूंना कसे जाणणार? या दुर्लभ मनुष्य भवाचा एक एक क्षण अत्यंत अनमोल आहे. म्हणूनच सम्यक् स्वाध्याय करावा. निरन्तर स्वलक्ष्यपूर्वक तत्त्वाभ्यास करावा जो स्वानुभवास पूरक ठरतो..

आचार्य देव सांगतात, 'पापाने संसार वाढतो, हे तर सांगणे न लगे, परंतु पुण्याने सुद्धा संसारच वाढतो या वचनाचा अर्थ समजावून घे..दोन्ही आस्रवाच्याच खात्यात जातात, हे सत्य तर तुला शुभ क्रिया करतानाच स्वीकारावे लागेल! आत्मबोधाशिवाय केलेल्या साऱ्या पुण्य क्रिया निरर्थक असतात....यासाठी शुद्धोपयोगाचीच कास धरणे हाच सत्य मार्ग होय. काही अवस्थेत भूमिकेनुसार हे जरी शक्य नसले तरी, मार्ग तर हाच आहे यावर दृढ श्रद्धा कर! भेदविज्ञानरूपी बुद्धीचा वापर करून आपल्या निजध्रुवात राहण्याचा पुरुषार्थ कर...कारण ही भेदविज्ञानरूपी बुद्धी अशुद्ध उपयोगाला थारा देत नाही.. शुभोपयोगात रमू देत

नाही...ती सतत चैतन्य तत्त्वाचे आणि त्याच्या अनंत गुणरूपी साम्राज्याचे रक्षण करते.हीच भेदविज्ञानरूपी बुद्धी आपल्याला सम्यक् दृष्टी प्रदान करते, ज्याचे द्वारे आपण आहे त्या अवस्थेत स्वतः मध्ये विराजमान अशा सिद्ध स्वरूपाचे दर्शन घेऊ शकतो.'

सहाव्या-सातव्या गुणस्थानात रमणारे संत योगीन्दुदेव सांगतात की, 'निश्चयाने आपल्या आत्म्याचे दर्शन हेच सम्यग्दर्शन होय. यामुळेच मोक्षमार्गाची सुरुवात होते आणि मग होणारा सर्व व्यवहार सम्यक् म्हटला जातो.' किती महत्त्वपूर्ण गोष्ट सांगतायेत आहे आचार्यदेव येथे!

सम्यग्दर्शन म्हणजेच आत्मदर्शन.. हेच धर्माचे मूळ उगमस्थान आहे. आचार्य समंतभद्र सांगतात, 'तिन्ही काळात-तिन्ही लोकांत सम्यग्दर्शनासमान अन्य कोणीच उपकारी नाही आणि मिथ्यात्वासमान कोणीच अपकारी नाही....तेच सर्व प्रकारच्या व्यग्रतेला, आकुलतेला कारणीभूत असते.

येथे आचार्यदेव कोणतेही पूजापाठ जप-तपादि क्रिया करावयास सांगत नाहीत, तर फक्त आपल्या आत्मदेवाला जाणण्याकरिता प्रेरणा देत आहेत. म्हणजेच खरे देव आणि गुरु यांनी ज्या मार्गाचे अवलंबन घेऊन आपल्या आत्म्याला जाणले, त्याचे ज्ञान करून त्यातच रमले आणि मोक्षसुख प्राप्त केले, अगदी तोच मार्ग ज्ञानी जीवांना प्रशस्त असतो. ते सुद्धा आपल्या आत्मदेवाचा आश्रय घेतात. आचार्यदेव येथे सांगू इच्छितात, 'परम शांती आणि आनंद तुला तुझ्या निजात्म्यातूनच प्राप्त होणार आहे. तुझा आत्माच तुझा गुरु आहे, कारण खऱ्या सुखाचा आधार धर्म आहे, धर्माचा आधार ज्ञान आहे आणि ज्ञानाचा आधार आत्मा आहे. म्हणूनच आपले हित साधायचे असेल सर्वप्रथम आत्मदर्शन केले पाहिजे.'

सम्यग्दर्शनाच्या प्राप्तिसोबतच सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्राचा अंश (अनंतानुबंधी कषायांच्या अभावरूप स्वरूपाचरण चारित्राची प्राप्ती) प्रकट होतो. यामुळेच खरा धर्म प्रकट होतो व मोक्षमार्गावर खरे मार्गक्रमण सुरु होऊन जीव मोक्षसुखाची प्राप्ती करून घेतो. त्याला आपल्या पुण्य-पापरहित शुद्ध स्वरूपाची जाण असते. यासाठी कोणत्याही परसन्मुख ज्ञानाची गरज नाही आणि पर पदार्थांच्या श्रद्धेची पण गरज नाही. येथे परमार्थाच्या अपेक्षेने आचार्यदेव एकमेव आपल्या आत्मदेवाच्या ज्ञान-श्रद्धानावर जोर देत आहेत. येथे प्रामुख्याने निश्चयनयाने सम्यग्दर्शनाचे कथन केले आहे. जणू काही ते सांगत आहेत,

'तुझं रक्षण तुझा स्वभावच करू शकतो.. अन्य कोणीही नाही.. त्यामध्येच रुची कर.. त्यामुळे ज्ञायक राहण्याची कला तुला अवगत होईल आणि समतेचा झरा आतून प्रस्फुटित होईल.'

ज्या जीवांना आपल्या आत्म्याचे श्रद्धान झाले त्यांना नियमाने खऱ्या देव-शास्त्र-गुरु आणि यथार्थ वस्तुस्वरूपाचे श्रद्धान असतेच..असे भव्य जीव पुढे जाऊन गुणस्थानातीत अनुपम दशेला प्राप्त करतात. सर्व जीवांना आत्मअनुभवाचा मार्ग आचार्य आपल्या स्वानुभवाने दाखवितात. ते सांगतात, 'हे जीवा! तू आमच्यावर अवलंबून राहू नकोस..आम्ही जसे निजआत्म्याच्या सन्मुख होऊन त्याची प्रतीती केली..श्रद्धा करून त्यातच लीन होऊन खरे सुख प्राप्त केले.. तेच तुला सुद्धा करावे लागेल.. आत्मअनुभवाच्या दृष्टीशिवाय अन्य कोणत्याही वस्तू किंवा पदार्थांचे द्वारा सम्यग्दर्शनाची प्राप्ती होत नाही..अगदी त्यात आम्हीही आलो बरं का..! आत्मदर्शनाशिवाय मुक्तिमार्गात काहीही कार्यकारी नाही.. तेच अनिवार्य आहे..प्रथमात प्रथम तू ते प्राप्त कर..'

आत्मदर्शन/सम्यग्दर्शनामध्ये अर्थात त्याच्या अनुभवामध्ये ज्ञान आणि चारित्र देखील समाविष्ट असतात. सम्यग्दृष्टी जीवाच्या जीवनात चरणानुयोग आपसूकच प्रवेश करतो, म्हणूनच येथे आत्मदर्शनावर आचार्यदेव इतका भर देत आहेत.. आगमात यालाच मुक्ती शिखराचा पाया म्हटले आहे.

(क्रमशः)

# पट्टमहादेवी–शब्दांपलिकडील अन्वयार्थ
## लेखांक (२३)

**–विपुल खेडकर,** नागपूर मोबा.८८८८८५४४३४

यादवपुरीचे हे प्रस्थान पट्टमहादेवींच्या जीवनात कोणते नवीन वादळ निर्माण करते ? अलौकिक मंदिर कलाकृतीत पट्टमहादेवींच्या आणखी कोणकोणत्या कल्पना प्रत्यक्षात येतात?.... बघू या भागात!

**उमलून आल्या भावना**

पट्टमहादेवी शांतलादेवी आणि त्यांची चारही मुले–राजकुमार बल्लाल, दुसरे राजकुमार बिट्टीदेव, राजकुमारी हरियल देवी आणि राजकुमार विनयादित्य तसेच दण्डनायक बिट्टिगा, त्यांची पत्नी सुव्वला, सोबत गुप्तहेर मायण आणि चट्टला, त्यांचे छोटे बाळ बल्लू आदि सर्व मंडळी आवश्यक रक्षक दलासोबत यादवपुरीला येऊन पोहोचले.

यादवपुरी सुंदर सजलेली होती. विजयोत्सवाच्या आनंदात न्हायलेली नगरी बघून सर्वांचीच थकलेली गात्रे प्रफुल्लित झाली. राजमहालाच्या द्वारी राणी बम्मलदेवी सुहास्य मुद्रेने स्वागतास सज्ज होत्या. पट्टमहादेवींशी बऱ्याच कालावधीनंतर भेटून त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे झाले. मुलांना जवळ घेऊन वार्तालाप करतांना उत्साह वाढला. सर्वांचे क्षेमकुशल, अल्पोपाहार होऊन सर्व विश्रांतीला गेले आणि दोघींच्या एकमेकींशी गुजगोष्टी सुरु झाल्या.

‘महासन्निधान यदुगिरीला कधी गेलेत?’ शांतलादेवींनी विचारले.

‘वेलापुरीला दूत रवाना झाल्यानंतर एक दोन दिवसांतच!’ बम्मलदेवी उत्तरल्या.

‘तुम्ही कां नाही गेलात ?’

‘महासन्निधान तेथे युद्धाकरिता थोडेच गेलेत ?’

‘तर केवळ युद्धाकरिताच तुम्ही सोबत असता ?.....’

‘मला तसे नव्हते म्हणायचे......’

‘तर मग युद्धाची गोष्ट कशी आली?’

‘माहित नाही ! आचार्यांच्या दर्शनाची अभिलाषा तर मलासुद्धा होती परंतु महासन्निधानांनी मला सांगितलेच नाही... मला वाटले काही राजकीय कार्य असेल पण......’

‘असेल?......म्हणजे आता नाही असेच ना ?’

‘मी काही सांगू शकत नाही! राजलदेवींना आणायला बंधू उदयादित्यजी गेले आहेत.........’

‘बम्मलदेवी, आज तुमचे बोलणे कोड्यात टाकणारे आहे. तुम्ही अस्वस्थ वाटत आहात.. काही झाले आहे कां?’

‘असं कां होत आहे कुणास ठाऊक ! सन्निधानांनी काही सांगितले नाही. फक्त एवढेच बोलले की,

‘पुढे स्पष्ट होईल. पट्टमहादेवी येईपर्यंत काहीच निश्चित होणार नाही.......’

‘तर पट्टमहादेवींच्या येण्यानेच ज्याची निश्चिती होणार, ती गोष्ट अद्याप तुम्हाला माहिती नाही !’

‘हो ना ! राजलदेवींना बोलविल्यामुळे राजकार्य असावे असे वाटत नाही. दुसरेच काही असावे...परंतु माझे मन मात्र अस्वस्थ होते आहे.’ बम्मलदेवी आपले मन मोकळं करीत होत्या .

‘शहराची सजावट बघून विजयोत्सवाची तयारी असावी असे वाटत आहे.’

‘आपल्याला आलेल्या पत्रात याचा उल्लेख होता कां?’

‘नाही ना ! स्वागताची ही व्यवस्था राजमहालाकडून केली गेली आहे का?’शांतलादेवींनी प्रतिप्रश्न केला.

‘असे कोणतेच आदेश राजमहालाकडून दिलेले नाहीत.’

‘ तर मग आश्चर्यच आहे.....काय असू शकते ?’

‘ सन्निधान आपणालाच काय ते सांगतील.....’ बम्मलदेवी थोड्या निराशेच्या सुरात म्हणाल्या.

‘ महासन्निधानांना येऊ द्या, नंतर सगळा उलगडा होईलच. तोपर्यंत आपण पहाडावर जाऊन येऊ ! माझ्या जीवनातील खूप महत्त्वपूर्ण ठिकाण आहे. चलणार ना ?’

‘ आपण सोबत असतांना चिंता कशाची? मी व्यवस्थेसाठी सांगून येते.’

‘ नको ! व्यवस्थेची आवश्यकता नाही. मायण, चट्टला आणि दोन शिपाई पुरेसे आहेत, येतांना लक्ष्मीनारायण मंदिर बघून येऊ !’

‘ तेथील धर्मदर्शीला(मुख्य पुरोहित) सूचना पाठवू का ?’

‘ तसेच जायची इच्छा आहे.......’

‘ पट्टमहादेवी विना सूचनेच्या गेल्या तर, तेथील लोकांना कदाचित वाईट वाटू शकेल !’

‘सूचना पाठवली की, व्यवस्था आणि औपचारिकता वाढते, कृत्रिमपणा येतो. भगवंताच्या दर्शनाला सहजता हवी.’

थोड्याच वेळात दोघी यादवपुरीला लागूनच असणाऱ्या पहाडांवर पोहोचल्या. तेथे तयार केलेल्या मंडपात बसून प्राकृतिक सौंदर्याचा आस्वाद घेताना मन प्रसन्नतेने भरले. पट्टमहादेवींना आपले लग्नानंतरचे सुरुवातीचे या ठिकाणी घालविलेले दिवस आठवले. मन जुन्या रम्य स्मृतींमधे रमले....त्याच आठवणीत त्या बम्मलदेवींना म्हणाल्या,

‘किती छान होते ते दिवस ! काय काय स्वप्ने रंगविली होती !.....राजपदाची कोणती जबाबदारी नव्हती. पुढे मात्र सगळेच कसे बदलून गेले...मोठे महाराज बल्लालदेव अकाली गेले, महाराजांना राजसिंहासन स्वीकारावे लागले... पाठोपाठ राजेपदाला मुभा असणाऱ्या सर्वच गोष्टी आल्या आणि माझी असणारी आकांक्षा की मी ज्यांच्यावर प्रेम केले, ते आजीवन माझेच राहतील.... ती विरून गेली.....!’

‘ पट्टमहादेवी बनल्यानंतर आपणास विरोध करण्याचे साहस तर कोणात नव्हते... अशा वेळी आपण आमच्या इच्छांना डावलू शकत होतात.... सन्निधानांना आपलेच ठेवणे आपणास शक्य होते ना ?’ बम्मलदेवींनी पट्टमहादेवींच्या अंतरंगात शिरण्याचा प्रयत्न केला.

‘ हो, शक्य होते ना ! किंबहुना असाच आग्रह सगळ्यांकडून झाला....तरीसुद्धा सन्निधानांना तुमच्या सोबत विवाहाकरिता मी आग्रह केला, कारण मला सन्निधान निर्जीव मूर्ती म्हणून बघवले नसते. त्यांचे तुमच्याविषयीचे आकर्षण माझ्या लक्षात आले होते. त्यामुळे खूप विचारांती संसारात राहून संसारातून अलिप्त होण्याचा मार्ग मी निवडला, भगवंत आराधनेचा, आत्मसाधनेचा मोठा मार्ग मला सापडला.’

‘आपल्या विचारांची झेप आमच्या बुद्धी पलीकडची आहे, महादेवी...!’ बम्मलदेवी म्हणाल्या.

**राज्यहिताचीच काळजी**

दिवस सूर्यास्ताकडे झुकून राहिलेला बघून सगळे परत फिरले. वाटेत लक्ष्मीनारायण मंदिरात पोहोचले. तेथे योग्य स्वागत, यथायोग्य आसनव्यवस्था आणि प्रसाद तयार होता. तेथील धर्मदर्शी तिरुवरंगदास यांच्याशी विचारविनिमय सुरु असतांना त्यांच्या कन्येशी, लक्ष्मीशी त्यांनी ओळख करून दिली. मधुर सुरात गाणारी ही धर्मदर्शींची मानसकन्या, लहानपणी त्यांना अनाथ अवस्थेत सापडली होती. त्यांनी लेकीवत् तिचे पालनपोषण केले. मंदिरात भक्ती करणे आणि धर्मदर्शींच्या हाताखाली छोटी-मोठी कामे करणे एवढेच तिचे काम !

पट्टमहादेवींनी विचारले, ‘शहराची सजावट का केली आहे ? काही कल्पना आहे का ?’

‘ उद्याला लक्ष्मीनारायण भगवानांची रथयात्रा आहे, मंगलकार्य आहे.. देवदम्पती नगर परिक्रमा करतील, म्हणून हे आयोजन ! मंदिराचे काम होते म्हणून राजमहालाला कळविले नाही.’ धर्मदर्शी म्हणाले, जे

तुळुकाडूतून नव्यानेच येऊन येथे स्थिरावले होते.

‘ या मंदिराच्या कामकाजाबद्दल राजमहालाला कळविले जात नाही कां ?’

‘ राजमहालाची इच्छा असेल तर कळवू. सध्या आम्ही अशी प्रथा ठेवली नाही. आचार्यांच्या आदेशानुसार आम्ही येथे आलो आहोत...’ धर्मदर्शी थोड्या उद्दाम स्वरात बोलत होते.

‘ म्हणजे आचार्यांचा असा आदेश आहे का की, राजमहालाला येथील बाबी कळविण्याची गरज नाही ?’

‘नाही, नाही ! ते असे कधी म्हणतील? होयसळ राजवंशाबद्दल त्यांना अपार ममता आहे.’ इति धर्मदर्शी !

‘तर मग आचार्यांचा काय आदेश आहे?’ पट्टमहादेवींनी खुलासा मागितला .

‘ या मंदिरात येणाऱ्या हरीभक्तांना त्यांच्या मनाप्रमाणे पूजा-अर्चना करू देणे, तुळुकाडूतील धार्मिक रीतींचा विशेष परिचय देणे, प्रसाद वितरण व्यवस्था बघणे आदि....’

‘ यासाठी आवश्यक धन कसे येते ?’

‘ सचिव नागिदेवण्णाजी राजकोषातून देतात !’

‘ तरी देखील मंदिराकडून होत असलेल्या गोष्टी राजमहालाला कळविल्या जात नाहीत ?’

‘ सन्निधानांची इच्छा असेल तर कळवू !’

‘ राजकोष सचिवांचा स्वतःचा तर नाही ना ?’

‘नाही... तो राजघराण्याचा आहे हे सर्वांना माहित आहे.....’

‘ तो सार्वजनिक आहे, राजकोषामधे तो सांभाळला जातो. त्यामुळे त्या धनाचा विनियोग कसा केला जात आहे, ही गोष्ट राजमहालाला कळविण्याची तसेच नगरजनांना कळिवण्याची जबाबदारी आपली आहे.’ शांतलादेवी स्पष्ट शब्दात बोलत होत्या.

‘ नगरजनांना माहिती आहे.....’

‘ आम्हाला तर माहिती नव्हते, धाकट्या राणींना देखील कल्पना नव्हती.....’

‘या मंदिरात येणाऱ्यांना......’

धर्मदर्शींचे वाक्य मधेच तोडत पट्टमहादेवी म्हणाल्या, ‘येथे येणाऱ्यांचे वस्त्र आणि माथ्यावरील टिळा बघून आदर आणि भेद करण्याची रीत होयसळ राज्यातील कोणत्याच मंदिरात चालत नाही..’

‘ आपली जशी आज्ञा असेल तसे करू, पण एकदा आचार्यांकडून आदेश आला तर बरे होईल....’ धर्मदर्शी आपले म्हणणे पुढे रेटतच होते.

‘ आचार्यांना यात मध्ये का घालता ? मंदिर कसे बांधले ? कोणी आर्थिक मदत केली ? आपणास माहित आहे कां ? ज्या राज्यात आपण राहता तेथील नियमांनुसारच चालावे, हे आपणास आम्ही सांगण्याची गरज नसावी.’ पट्टमहादेवी समज देऊन उठल्या त्यांच्या मागोमाग सर्वच निघाले.

राजमहालात येऊन पोहोचले तर, सूर्य अस्ताला गेला होता. एवढ्यातच जेवण तयार असल्याचा सांगावा आला.

पट्टमहादेवी म्हणाल्या, ‘आपण जाऊन जेवण करा.. माझ्या जेवणाची वेळ टळली. चूक माझीच आहे... पहाडावर गेले आणि मला विसर पडला.’

‘ आपण उपाशी राहाल तर आम्ही कसे जेवण करू ? योग्य होईल कां ?’

‘ माझा धर्म मला मर्यादा सांगतो. आपण आपल्या धर्मानुकूल वागता. यावरून आपण धर्मयुद्ध करायला नको. आपण भोजनास जा, मी आराम करते.’ असे सांगून पट्टमहादेवी आपल्या ध्यानात रममाण झाल्या आणि नंतर निद्राधीन !

**जीवनातील नव्या पर्वाची सुरुवात ?**

दुसऱ्या दिवशी महासन्निधान, सचिव नागिदेवण्णा, आचार्य शिष्य आण्डान आणि इतर मंडळी यदुगिरीहून यादवपुरीला परतली, तर पट्टमहादेवी आणि बम्मलदेवी राजमहालाच्या वाटिकेत फेरफटका मारीत होत्या. पट्टमहादेवींशी भेटण्याच्या आतुरतेने महाराज स्वतःच वाटिकेत पोहोचले. अनेक दिवसांनी पट्टमहादेवींना भेटण्याची ओढ जाणवत होती. महादेवींच्या मागच्या मुक्कामात सुरुवात झालेले हे उद्यान देवींच्या पसंतीस उतरले की नाही, हे देखील महाराजांना जाणून घ्यायचे होते.

मंदहास्याने दोघींनी जणू त्यांचे स्वागत केले. प्रतिहास्याने उत्तर देत सन्निधानांनी विचारले,
‘ कसे वाटले उद्यान ? महाराणींच्या पसंतीस उतरले की नाही ?’
‘ उद्यान तर छानच झाले आहे, पण...थोडे लक्ष घालावे लागेल, थोडी स्वच्छता हवी...परजीवी झाडांची वाढ जास्त प्रमाणात होत आहे... ती थांबवायला हवी..... माळ्यांना समज द्यायला हवी....!', शांतलादेवी वरकरणी साध्या वाटणाऱ्या परंतु सूचक वर्मभेदी शब्दांत बोलत होत्या....!!
बोलत बोलत सर्व महालात परतले, जेवणाची तयारी झालीच होती, सर्वांनीच हात-पाय धुवून भोजनगृहात प्रवेश केला. सगळी सिद्धता होतीच त्यामुळे लगेच पंगत बसली. महाराजांची उपस्थिती असल्याने मुलेदेखील शांततेने जेवत होती.

दुपारच्या विश्रांतीनंतर महाराजांची अस्वस्थता आणि संकोच बघून पट्टमहादेवींनीच विचारले, ‘आम्हाला वाटले, काही सूक्ष्म विषय असावा ज्याकरिता आम्हाला बोलविले गेले.... बम्मलदेवींना सुद्धा माहिती नाही! नवीन राणी बनविण्याचा एखादा प्रस्ताव आहे का? चोल राजकुमारी सोबत विवाह करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे का?....आम्ही आपणास निराश करणार नाही...’
‘असा काही प्रस्ताव असता तर आम्हीच तो नाकारला असता.......’ महाराज वदले.
‘कां? राजनैतिक स्थैर्य लाभणार असेल तर अस्वीकार्य कां?’
‘ चोल वैष्णव द्वेषी आहेत!’
‘ आचार्यांनी तर असे म्हटले नव्हते..!’
‘ त्यांनी म्हटले नाही तरी, वास्तविक स्थितीचा आढावा आम्ही घेतला आहे ना ! त्यामुळे त्यांचा संबंध आम्हास योग्य वाटला नाही.’
‘ तर मग नवीन संबंध कोणाशी ?’
‘ हा धर्माशी संबंधित आहे...’
‘ म्हणजे आचार्यांच्या पंथाची एक राणी हवी अशी सन्निधानांची इच्छा आहे म्हणायची...!’
‘ आमची स्वतःची नाही. असा एक सल्ला आमच्याजवळ आला आहे...’
‘ कोणाकडून ?आचार्यांकडून ?’
‘ सरळ त्यांच्याकडून नाही. परंतु ते विरोधात नाहीत. ते म्हणतात हरीची इच्छा कोण नाकारू शकतो ?’
‘ तर मग निर्णय घेऊन टाकायचा ! आम्हाला बोलविण्याची काय आवश्यकता ?’
‘अशाप्रकारे असंतोष दाखविणार का ?’
‘ राणी बम्मलदेवी आणि राजलदेवींनी वैष्णव धर्म स्वीकारला एवढे पुरेसे नाही कां ?’
‘ मूलतः सगळ्या विषयांना समजणारी, जन्माने वैष्णव असणारी एक राणी हवी असे सगळ्यांचे म्हणणे आहे.....’
‘तर मग माझ्या सल्ल्याची काय गरज ? माझ्या संमतीचा या विषयावर काही फरक पडणार आहे का ? शिवाय आपण स्वतः या नाजुक विषयात किती गुंतले आहात ते सांगा ना !’
‘ तसे नाही... पण आपल्या संमतीशिवाय आम्ही हा निर्णय घेऊ शकत नाही.’
‘ बम्मलदेवी तर सोबतच होत्या.. त्यांनादेखील काहीच कल्पना नव्हती.’
‘ तात्पर्य......’
‘ शुभस्य शीघ्रम् ! धर्म बदलण्याच्या तुमच्या निर्णयात आम्ही काही करू शकलो नाही, तेव्हा आता कां ढवळाढवळ करावी ?’
‘ देवी, आपल्या उदारतेबद्दल धन्यवाद ! विजयप्राप्तीच्या उन्मादात आम्ही वचन देऊन बसलो....तुमच्या या शब्दांनी आता आम्ही वचन पूर्तता करू शकू ......’
‘ सन्निधानांनी या अगोदरही वचन पूर्तीकरिता आपला धर्म सोडला. एक विनम्र विनंती आहे, सन्निधानांनी वाटेल तितके विवाह करावेत, परंतु त्या विवाहांसोबत धर्माची अट नको. आपले होयसळ राज्य सर्वधर्मसहिष्णुता ठेवते, त्यात ही धर्मांधता आली तर राष्ट्रहिताला बाधक होईल!’
‘ मग काय करावे ?’

'पाणिग्रहण करून घ्या, परंतु धर्माची मुद्रा लावून त्याचा प्रचार करू नका, करू देऊ नका!'

प्रधानमंडळासमोरही हा विषय चर्चिला गेला. महाराजांच्या वैयक्तिक निर्णयात नाराजी नको म्हणून थोड्या नाखुशीनेच संमती झाली.

विवाह निर्णयावर शिक्कामोर्तब झाले, परंतु मुलगी कोण?... याबद्दल महादेवींनी साधी विचारपूस देखील केली नाही किंवा तिला बघण्याची उत्सुकता दाखविली नाही....एवढी स्थितप्रज्ञता त्यांच्यात महाराजांच्या धर्मबदलानंतर आली होती.

यादवपुरीच्या राजमहालात सन्निधान आणि लक्ष्मीदेवी यांचा पाणिग्रहण समारंभ साधेपणाने पार पडला. धाकट्या दोन्ही राण्या काही बोलल्या नाहीत तरी त्यांच्या मनात भावना होतीच की, जिच्या कुल –वंश कशाचाच पत्ता नाही, अशी अनाथ कन्या लाडकी राणी कशी बनली ?

विवाह समारंभानंतर एका आठवड्यात पट्टमहादेवींनी राजधानीला परतण्याचा विचार सांगितला. जातांना श्रवणबेळगोळाला गोमटेश्वराचे दर्शन करून जाण्याची इच्छा सांगितली. तेव्हा महाराज म्हणाले, 'आम्ही सुद्धा येतो... आपण सर्वच जाऊ!'

' कसे शक्य आहे?'

' का? का शक्य नाही ?'

' नवीन राणी जन्माने शंभर टक्के वैष्णव आहेत ना ? त्यांना गोमटेश्वराच्या दर्शनात काय रूची ? अज्ञानतावश भगवंतांचा अपमान होऊ शकतो....'

' म्हणजे त्या उदार नाहीत, असे म्हणायचे आहे कां?'

' मी असे कां म्हणेन ? त्यांचे पालनपोषण कर्ते सहिष्णू नाहीत, त्यामुळे त्यांच्या मनात बाल्यकाळापासून कोणत्या भावना आहेत हे आपण कसे ठरवणार?'

' त्या व्यक्तीबद्दल आपले मत असे आहे, हे आपण आधी का नाही सांगितले ?'

' सांगून काय फायदा?... आपल्या डोळ्यांवरच्या, बुद्धीवरच्या मोहिनीला आपण स्वतः बाजूला केल्याशिवाय स्वच्छ स्थिर नजरेने आपण बघणार नाही आणि विचारही करणार नाही तेव्हा तुम्हाला हवे ते करा... माझा अडसर कशाला? याशिवाय दुसरा पर्यायच नाही ना ठेवलात...आता ते वेलापुरीमध्ये निर्मित होणाऱ्या चेन्नकेशव मंदिराचे धर्मदर्शी होण्याची इच्छा व्यक्त करीत आहेत.'

सन्निधान दिङ्मूढ होऊन विचारात पडले.

' ते तुम्हाला काही बोलले... ?'

' नाही, जेथे आपल्या बोलण्याने कामे होतात, तेथेच ते हातपाय पसरतात.'

' त्यांच्याबद्दल आपले मत चांगले नाही तर!'

' अर्थातच ! म्हणूनच माझ्या मनातली गोष्ट स्पष्ट सांगितली.'

' आता काय करावे ?'

' जेथे आहेत तेथेच राहू द्यावे! इच्छा नसेल तर तिरुमलैला वापस पाठवावे.'

' तात्पर्य हा संबंध सुरुवातीपासूनच जटिल ठरणार आहे तर ! राणींनी त्यांच्या पिताजींना सोबत घेऊन चलण्याचे विचारले तेव्हा आम्ही 'हो' म्हटले होते.'

' विजयोन्माद वीरांना कसा भरकटवतो याचे याहून चांगले कोणते उदाहरण असेल? सन्निधानांनी क्षमा करावी, पण ही घाई पुढे जाऊन असंख्य अडचणी निर्माण करणारी ठरू शकते; हे सांगितल्याशिवाय माझे मन राहत नाही. आता आम्हास निघण्याची अनुज्ञा व्हावी.'

' आम्ही छोट्या राणींना समजावतो.आपण सर्व गोमटेश्वरांच्या दर्शनाला जाऊ!'

' समजावण्याने समजण्यासारखा विषय नाही हा! तुमचे संस्कार जैन असूनही तुम्ही धर्मपरिवर्तन करू शकता तर व्यवहारज्ञानाने शून्य असणाऱ्या छोट्या राणींना कसे शक्य होईल ?'

' म्हणजे आमचे धर्मपरिवर्तन महाराणींसाठी स्थायी असंतोषाचे कारण ठरले आहे, असेच ना ?'

' सोडा आता तो विषय ! छोट्या राणींना घेऊन येथेच राहा काही दिवस ! त्यांचे नवे दिवस आनंदात जाऊ द्या... तोपर्यंत मंदिराचे कार्य पूर्णत्वाला येते. मग नव्या राणीचे स्वागत, विजयोत्सव,

विजयनारायणाची स्थापना सर्व एकत्रितच राजधानीत करू.'

'कोण कोण तुमच्या सोबत जाणार?'

'आम्ही तिघी, मुले, बिट्टीगा - सुव्वला, उदयादित्यजी, रेविमय्या....'

'सगळेच जाणार तर आमच्यासोबत कोण ?'

'नव्या राणींशिवाय तुम्हाला सध्या कोणाची गरज आहे?'

'रेविमय्याला तरी राहू द्या!'

'त्यांच्यामुळे धर्मदर्शींच्या स्वतंत्रतेत अडथळा येईल. कोणी नसतानाच सन्निधान त्यांना खऱ्याखुऱ्या रूपात ओळखू शकतील.'

'सगळे आधीच ठरवले होते...नंतर आम्हाला सांगितले तर.....!'

'सन्निधानांनीच हा मार्ग आरंभ केला आहे...आम्ही त्याचेच अनुसरण करतो आहोत.'

नंतर दोघेही काही वेळ मौन होते. हीच मूक संमती समजून पट्टमहादेवी तेथून निघाल्या. दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे सर्वजण श्रवणबेळगोळच्या दिशेने निघाले.

बालपणी पट्टमहादेवींनी भगवंतांचे प्रथम दर्शन घेतले, तेच पुजारी आजही तेथे होते. महाराणींनी तेच सूर आज पुन्हा आळविले होते, पण आज त्या सुरात करुण संवेदना प्रगट होत होत्या....! पूजा-अर्चा सम्पन्न करून सगळे वेलापुरीत दाखल झाले.

मंदिराचे निर्माण कार्य वेगाने पुढे गेलेले बघून त्यांनी संतोष व्यक्त केला, तर उदयादित्यजी आश्चर्यचकित झाले. आपल्या डोळ्यांवर विश्वास न बसून ते 'अद्भुत ! कल्पनातीत !!'

पट्टमहादेवींच्या निर्देशाप्रमाणे चावुणने निर्मिलेली नाट्य सरस्वती समोर होती. त्याने विशिष्ट ठिकाणी छिन्नीच्या प्रहाराने टंकार केले. सप्तस्वरांचा निनाद ऐकून सगळ्यांची मने आल्हादित झाली. उदयादित्यजी नाट्यसरस्वतीचा चेहरा एकाग्र चित्ताने निरखित होते... ते सहजच म्हणाले,

'नाट्य सरस्वतीचा चेहरा पट्टमहादेवींशी मिळता-जुळता आहे.'

'हो, आमच्या बाल्यकालाची छबी डोकावतेय् खरी !'

'ही मूर्ती आपण उत्तर द्वारावर विराजू या !' मुख्य स्थपती सोबत होतेच. त्यांच्याशी चर्चा सुरूच होती. आणखी किती मूर्तींची आवश्यकता आहे, किती तयार झाल्यात..... वगैरे गोष्टींचा ऊहापोह घेत असतांना स्थपतीने महादेवींसोबत एकांतात विचारविमर्श करण्याची मागणी केली. विचार करू म्हणून पट्टमहादेवी निघून गेल्या.

काय बरे सांगायचे असेल स्थपतीला ? मंदिर निर्माणाच्या कार्यातीलच काही विशेष की आणखी काही.....? नवीन राणींचे आगमन पट्टमहादेवींच्या जीवनात कोणते नवीन प्रश्न निर्माण करते... बघू या पुढील लेखांकात !

(क्रमशः)

---



ब्र. जितेंद्रजी चंकेश्वरा, अकलूज

**आदरणीय बा. ब्र. जितेंद्रभाई चंकेश्वरा, अकलूज व पंडित श्री. विक्रांतजी शाह, सोलापूर यांचे अमेरिकेतील सीएटल व कैलिफोर्निया** येथे होणाऱ्या ज्ञान संस्कार शिबीर व आध्यात्म न्यायादीपिका, धर्मध्यान, धर्मप्रसारासाठी प्रयाण झाले. त्यांनी तेथे दि. १८ जून २०२५ ते ६ जुलै २०२५ अखेर प्रवचने केली. 'आपल्याकडून सदैव जिनवाणीच्या तत्त्वज्ञानाची प्रसारात्मक सेवा होत रहावी, प्रवचनाच्या माध्यमातून सगळ्या संसारी जीवांना जिनधर्माची माहिती देऊन मोक्षमार्गामध्ये सम्यग्दर्शन प्रगट करण्याची भावना जागृत करावी, हीच मंगल भावना.



पं. श्री. विक्रांतजी शाह, सोलापूर

# ‘सोलहकारण भावना भाय....!’

(लेखांक ११)

**हर्षा वेखंडे, नागपूर,९८२२६९०८६०**

**वैयावृत्त्य भावना**

वैयावृत्त्य हा शब्द जैनदर्शनाच्या शब्दावलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्द आहे. हा शब्द इतर कुठे वाचलेला किंवा ऐकलेला असा फारसा आठवत नाही, पण जैन तत्त्वज्ञानामध्ये मात्र या शब्दाची मोठी मक्तेदारी आहे.

‘वैयावृत्त्य’ शब्दाचा अर्थ होतो सेवा, सहायता किंवा परिचर्या! आणि हा शब्द अशा कार्यांसंबंधी वापरला जातो, जे कार्य सेवेसंबंधी असतात.... त्यातही विशेष रूपाने धार्मिक कार्य.

कोणी म्हणेल आम्ही पण करतो हं सेवा... आई-वडिलांची करतो... समाजसेवाही करतो.. बघा, उन्हाळ्यात पाणपोई सुरू केली...मुलाच्या वाढदिवसानिमित्त अनाथ विद्यार्थ्यांना सामुग्री वाटली, तर वृद्धाश्रमात फळवाटप केलं.....कुठे कुठे तर केरसुणीने मंदिर झाडण्यापासून तर दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला वाटीत पाणी देण्यालाही ‘सेवा देणं’ म्हणण्यात येतं.

परंतु हे वैयावृत्त्य नव्हे! ही साधारण कार्ये आहेत. हे तर कुटुंबाप्रति-समाजाप्रति प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सेवा हा शब्द यापेक्षा अधिक विशाल आहे.....या शब्दाच्या परीघात ते सारे येतात जे गरजू आहेत.... ज्यांना आवश्यकता आहे, जे का रंजले गांजले...ते ते सारे!!

पण हो...येथे दिल्या जाणाऱ्या सेवेत थोडा धोका आहे बरं! गरजू जर नैतिकदृष्ट्या पतित असतील तर, अशा सेवेने पुष्ट होऊन ते कुमार्गाकडे वळतील. कारच्या खिडकीत भीक मागायला आलेल्या, पोट खपाटीला गेलेल्या भिकाऱ्याच्या हातावर दहा रुपये ठेवले तर होऊ शकतं की, तो दारूच्या दुकानाच्या रांगेत उभा राहील....!

**अहिंसा परमो धर्म:** या मौलिक तत्त्वाच्या खांबावर तोलला गेलेला जैन धर्म सर्व प्राणिमात्रांप्रति करुणेचा-सेवेचा संदेश जरूर देतो, पण विवेकपूर्वक!!

वैयावृत्त्य हा शब्द मात्र विशिष्ट अर्थ घेऊन येतो, उत्तम सेवा.... वैयावृत्त्य म्हणजे उत्तम सेवा. वैयावृत्त्य म्हणजे अशी सेवा, ज्यात ज्यांची सेवा केली जाते ती व्यक्ती फार महत्त्वपूर्ण असेल आणि त्यापेक्षाही ती सेवा, वैयावृत्त्य करणाऱ्यासाठी अधिक हितकारी ठरेल. वैयावृत्त्य ही कडी पारसमणी आहे. ती जीवाला अत्युच्च स्थानापर्यंत नेऊन पोहोचवते....ते सोनपद म्हणजे तीर्थंकर पद होय! षोडशकारण भावनांमधील वैयावृत्त्य भावना ही तीर्थंकर नामकर्माच्या बंधाला कारणीभूत ठरते. याचा अर्थ वैयावृत्त्य करणाऱ्या व्यक्तीचे आत्मकल्याण आपसूक घडते.

त्यामुळे वैय्यावृत्त्य कोणाचे करावे, कोणी करावे, कशी करावी, कधी करावे हे सारे पैलू वैयावृत्त्य समजण्यासाठी फार महत्त्वाचे ठरतात.

श्री प्रवचनसार या ग्रंथातील चरणानुयोग चूलिकेतील २५२व्या गाथेत कुंदकुंदाचार्य म्हणतात,

**रोगेण वा छुधाए,तण्हाए वा समणे वा रुढ।**
**दिट्ठा समणं साहू पडिवज्जदु आदसत्तीए।।२५२।।**

रोगाने, क्षुधेने, तृषेने अथवा श्रमाने आक्रांत श्रमणाला बघून हे साधू! आपल्या शक्तीअनुसार वैयावृत्त्यादी करा.

अरेच्चा!! वैयावृत्त्य तर त्यांचे..... जे सुख शोधायला निघाले आहेत.....मोक्षमार्गाचे पथिक आहेत.. ते आहेत श्रमण, मुनी!!

प्रवचनसारची ही गाथा सांगते, उत्कृष्ट सेवा म्हणजे साधूंचे वैयावृत्त्य, साधूंची सेवा.

त्यांच्या अवस्थांनुसार साधूंचे दहा भेद केले गेले आहेत.

आचार्य, उपाध्याय, तपस्वी, शैक्ष्य, ग्लान, गण, कुल, संघ, साधू आणि मनोज्ञ.

वैयावृत्त्य हा धर्म कोणाचा? मुनींचा.

मुनींमध्ये परस्पर वैयावृत्त्य होतं. ते परस्परांची सेवा करतात. वैयावृत्त्य हे बारा तपांपैकी तिसरं अंतरंग तप आहे. तपाला निर्जरेचं कारण म्हटलं जातं, एवढी श्रेष्ठ वैयावृत्त्य भावना आहे.

दहा प्रकारच्या मुनिराजांची ओळख करून घेऊ या.

**आचार्य :–** जे स्वर्ग– मोक्षाचं कारणभूत व्रताचरण करतात आणि संघाचे नायक असतात, ते आचार्य होत.

**उपाध्याय :–** ज्यांच्या समीप आगमाचं अध्ययन करण्यात येतं, ते श्रुताचे आधार उपाध्याय होय.

**तपस्वी :–** महान अनशन आदी तपांमध्ये लीन असतात, ते तपस्वी.

**शैक्ष्य :–** जे निरंतर श्रुत अभ्यासात आणि व्रतांच्या भावनांमध्ये तत्पर असतात, ते शैक्ष्य होय.

**ग्लान :–** रोग आदींमुळे ज्यांचं शरीर दुबळ झालं आहे, ते ग्लान होत.

**गण :–** वृद्ध मुनींच्या परिपाठीचे गण म्हणवले जातात.

**कुल :–** स्वतःला दीक्षा देणाऱ्या आचार्यांचे शिष्य ते कुल म्हणावे.

**संघ :–** चार प्रकारच्या मुनींच्या समूहाला संघ म्हणतात.

**साधू :–** बऱ्याच काळचे दीक्षित असतील तर त्यांना साधू म्हणतात.

**मनोज्ञ :–** जे विद्वत्तेने, वक्तृत्वाने किंवा प्रसिद्ध गुरूंचा शिष्य असल्याने धर्माचा तसेच गुरुकुळाचा गौरव वाढवत असतील तर, ते मनोज्ञ होत.

वैयावृत्ती ही अशा दहा प्रकारच्या साधूंची..... मुख्यरूपाने साधूंद्वारे केली जाणारी...

कोणीही असू देत, श्रेष्ठ ध्येय असावं नजरेसमोर.. ज्यांनी आपल्या नजरेसमोर सर्वश्रेष्ठ म्हणजे मोक्षाचं ध्येय ठेवलंय त्यांचे वैयावृत्त्य.

मुख्यरूपाने करणारे कोण? तर साधू. तोलामोलाचे, त्या मार्गावर मार्गक्रमण करणारे! वैयावृत्त्य म्हणजे खरं तर सांभाळ आहे. जिथे कुठे कुठे डगमगू लागला जीव मोक्षमार्गावर, त्याला दुसऱ्याने आधार देत सांभाळणं आहे. तेही इतक्या मृदूतेने की जणू स्वतःच स्वतःला सांभाळतो आहे.....मोक्षमार्गावर जपून पाऊल उचलतो आहे..! ज्याला मुनिधर्माची जाण आहे किंवा जो स्वतः त्या मोक्षमार्गावर मार्गक्रमण करतो आहे तोच उत्कृष्ट वैयावृत्त्य करू शकतो.

आचार्य आपल्या शिष्यांना व्रत–संयमाचा उपदेश देतात, ती आचार्यांद्वारे केली गेलेली शिष्याची वैयावृत्ती तर शिष्य गुरूंच्या आज्ञेनुसार वागून गुरुचरणांची सेवा करतो, ही शिष्याची वैयावृत्ती ठरते आचार्यांप्रति. कधी कधी आचार्य सुद्धा ग्लान मुनींना आधार देत आहारासाठी उभं करतात. गण मुनिराजांची समाधी निर्दोष व्हावी, अशा पद्धतीने उपदेश देतात....ही त्यांची केली जाणारी वैयावृत्ती होय.

हे उत्कृष्ट चित्र बघणाऱ्या गृहस्थ श्रावकाने अशा वैयावृत्तीची भावना भावावी... या देणाऱ्या आणि घेणाऱ्या जागेवर स्वतःला कल्पावे...

**देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे ।**
**बघता बघता एक दिवस हे स्थान स्वतः घ्यावे..!!**

कारणही एकदम स्पष्ट! कारण याच वाटेचा वाटसरू होण्याचं स्वप्न गृहस्थाच्या नजरेसमोरही झुलतंय्! मुनींचे वैयावृत्त्य कुठल्या परिस्थितीत करावे हेही महत्त्वाचं आहे.

का? कारण मुनिमहाराज आत्मसाधनेत लीन राहणारे....आत्म्याचे आराधक!! निर्विघ्न साधना सुरू असते तोपर्यंत त्यांना वैयावृत्तीची आवश्यकताच नाही, उलट निष्कारण सेवा उपटसुंभ बनून त्यांच्या साधनेत व्यत्यय ठरू शकते.

पण जर शारीरिक व्याधी आल्या आहेत....शारीरिक दुर्बलता आली आहे.... मनाने खचले आहेत.... थंडी–वारा–उष्णता–डास आदी परिषहांच्या कारणाने मन शिथिल झालं आहे, श्रद्धानात, सम्यग्दर्शनामध्ये ढिलाई आली

आहे....कर्मोदयाने अशी परिस्थिती आली आणि त्यांच्या सहज स्वाधीन शुद्धात्म साधनेत व्यवधान आलं, तर मात्र त्यांना परत आत्मसाधनेत स्थिर करण्यासाठी साधू परस्परांची सेवा-वैयावृत्त्य करतात, तेही स्वतःच्या शुद्धात्म साधनेला सांभाळून क्षीण साधूंना आधार देता देता जणू स्वतःच्या निर्विघ्न साधनेची व्यवस्था करतात. किळस-ग्लानी या कषायांना जिंकलेले हे जीव सहजतेने परस्परांना सांभाळत, हळूहळू मोक्षाला जवळ करतात. या वैयावृत्त्य संबंधात षट्कायिक जीवांची हिंसा होणार नाही, अशा पद्धतीने मुनी परस्परांची वैयावृत्ती करतात.

पण हो, शुद्धात्मपरिणतीला प्राप्त झालेल्या मुनिवरांना रोगी गुरु, बाल आणि वृद्ध श्रमणांच्या सेवेच्या निमित्ताने श्रावकांचीही गरज भासते.

हे म्हणावं आम्हा श्रावकांचं परम भाग्य! अशी शुभचर्या गृहस्थांना मुख्य आहे आणि गृहस्थांसाठी परम सुखाचं कारण आहे. असे शुभ परिणाम संसारातील सुख तर देतातच देतात, जीवाचा मोक्षमार्गही प्रशस्त करतात.

महाराजांच्या आहारासंबंधी, विहारासंबंधी औषधांसंबंधात गृहस्थांचा संपर्क राहतो. त्यामुळे साधूंच्या वैयावृत्तीसाठी गृहस्थांनी सजग असणं आवश्यक आहे.

सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र या रत्नांचं वेष्टन म्हणजे साधूंचं शरीर. त्यामुळे जर कुठली शारीरिक व्याधी असेल तर प्रासुक औषधी, योग्य आहाराची उचित व्यवस्था, तृणाचा बिछाना यांची व्यवस्था लक्ष घालून करणे, हे श्रावकांचे मुनींप्रति असणारे वैयावृत्त्य.

समजा हे शक्य नसेल तर, किळस न येऊ देता अत्यंत भक्तीभावाने त्यांचा कफ, नाकातील मळ, मूत्र दूर करण्यास सहायता करणे, शरीरात ताकद नसेल तर आधार देऊन उभे करणे, झोपताना कडावर करवून देणे, त्यांचं आसन-शयन-कमंडलू व्यवस्थित बघून शोधन करून देणे, समजा वाचण्यास कठीण जात असेल तर ग्रंथ वाचून दाखवणे, रस्त्यावर कोणी उपसर्ग करू लागल्यास सहाय्यता करणे हेही श्रावकांनी अवश्य करण्यायोग्य वैयावृत्त्य होय.

साधूंच्या शारीरिक स्वास्थ्यासोबतच त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासंबंधित वैयावृत्त्यही महत्त्वाचे! ते सहजतेने आत्म आराधना करू शकतील असं वातावरण निर्माण करणे, म्हणजे खरं तर वैयावृत्त्य. जन्म-मृत्यूची शृंखला नष्ट करायला निघालेले हे साधक.....त्यांचा योग्य तो विनय करणे, आदर करणे... श्रद्धान डळमळीत होत असल्यास मधुर शब्दांद्वारे विवेकपूर्वक त्यांना परत मोक्षमार्गात स्थापित करणे, हेही सुजाण श्रावकांद्वारे केलं जाणार वैयावृत्त्यच!

तेलाची बाटली हातात पकडून, मी महाराजांच्या वैयावृत्त्यासाठी चाललो आहे असे अभिमानाने अहंकाराने मिरवत सेवेसाठी जाणे म्हणजे वैयावृत्त्य नव्हे! वास्तवात वैयावृत्त्याच्या निमित्ताने श्रावक स्वतःच्या मोक्षमार्गाकडे पाऊल पुढे जात असतो. मुनींच्या रूपात त्याचं स्वतःचं उज्वल भविष्य त्याच्या नजरेसमोर उभं होतं.

खरं तर वैयावृत्त्य आपल्या आत्मस्वरुपाचं व्हावं...राग-द्वेषाच्या जखमांवर थोडी मलमपट्टी करणारं.... नवे व्रण नकोत....राग-द्वेषाचे विकार कमी व्हावेत..... नकोतच उत्पन्न व्हायला.. हे निश्चयाने आत्म्याचं वैयावृत्त्य, निमित्त मुनिराजांचं! नसेल साधुसंघ नगरात म्हणजे उत्तम पात्र उपलब्ध नसेल, तर प्रतिमाधारींना मध्यम पात्र म्हटलं जातं, सम्यग्दृष्टी देखील जघन्य पात्र म्हणवले जातात. त्यांना आवश्यकता असल्यास त्यांची सहायता, मदत ही वैयावृत्त्याची प्रारंभिक भूमिका.

एखादं लाकूड जंगलात पडलेलं असतं... स्फटिकाच्या म्हणजेच चकमकीच्या संपर्कात येतं... त्याला अग्नीचं स्फुल्लिंग कळतं.. तो किती भाग्याचा क्षण म्हणावा! सूर्याच्या तेजाचा अनुभव होतो ओंडक्याला.. हळूहळू क्रमाने ते प्रज्वलित होतं... तेजोमय होतं.. तसंच घडतं गृहस्थाच्या बाबतीतही वैयावृत्त्याने!

( क्रमशः )

# रामायण आणि महाभारतातील व्यक्तिरेखांचे तौलनिक विवेचन

(लेखांक-४)

**डॉ. सौ. लीना चवरे,** कारंजा-लाड
(९४२२५८८३३५)

वानर कोण ?

( जैनेतर विद्वानांची मते )

'सार्थश्रीवाल्मिकिरामायण' (रामायण समालोचन- खंड ५) मधील पाचव्या लेखात डॉ. प्रल्हाद नरहर जोशी म्हणतात. 'वानर या नावाचे पण नर व पशु या दोहोंमध्ये मोडले जाणारे दोन जातींचे प्राणी महाभारतामध्ये ही उल्लेखिलेले आहेत. वनपर्वातील तीर्थयात्रेच्या वर्णनाच्या निमित्ताने हे उल्लेख आलेले आहेत. एके ठिकाणी गंधर्व, विद्याधर, किन्नर याबरोबर वानरांचा उल्लेख आलेला आहे. व गंधर्वादिकांची गणना मनुष्याच्या बरोबरीने कुणालाही करावी लागणार आहे, हे निश्चित होय.दुसऱ्या ठिकाणी वानरांचा उल्लेख मोर, मृग, वराह व महिष इत्यादिकांच्या बरोबर आलेला आहे. यापैकी एकटा मोर हा पक्षी असून इतर सर्व पशू आहेत, म्हणजे येथे वानराचा उल्लेख पशू म्हणून आला आहे. तर गंधर्वादींबरोबर आलेला उल्लेख हा मनुष्य सदृश एक वेगळी जात म्हणून आला आहे.

मनुष्यातील व पशूतील वानरांचे हे दोन भेद लक्षात आले म्हणजे रामायणातील वानरांचे कोडे लवकर उकलता येण्यासारखे आहे. रामाला ज्या वानरांनी सहाय्य केले व ज्यांच्या व्यवहारादिकां-विषयीची रामायणातील वर्णने पाहून आपणास मनुष्याशी त्यांचे सादृश्य दिसू लागते, ते वानर पशूंपैकी नसून मनुष्यांपैकी होते, हे उघड आहे.' ( संदर्भः डॉ. प्र.न. जोशी - सार्थ श्रीवाल्मिकीरामायण - खंड ५ - पृ. २२७ )

यावरून रामायणात जे हनुमानादी वानरांचे वर्णन आहे. ते नरवानर आहेत असे श्री. प्र.न. जोशी यांना वाटते.

*** वानरांचे भाषिक सामर्थ्य**

वरील मताला पुष्टी मिळण्याचे आणखी एक कारण म्हणजे वानरांजवळ वाचेने भाषेव्दारा आपले विचार व्यक्त करण्याचे सामर्थ्य होते. पशूंची अशी एकही जात नाही की जी बोलून आपले विचार व्यक्त करू शकते. परंतु वानरांजवळ अशी संभाषण शक्ती होती ह्याचे अनेक दाखले वाल्मिकी रामायणातही आहेत. तेव्हा हे वानर म्हणजे नरवानरच आहेत असे डॉ. प्र. न. जोशी यांना वाटते. ते म्हणतात, 'रामायणवर्णित वानरांचे इतर व्यवहार बाजूला ठेवले तरी वाचेने आपले विचार व्यक्त करण्याचा जो मनुष्याचा विशेष तो त्यामध्ये उघडपणे दिसून येतो.' ( सार्थ श्रीवाल्मिकी रामायण खंड ५ - डॉ. प्र.न. जोशी पृ .२२३ )

वानर हे बुध्दिमान होते. संस्कृतसुध्दा ते बोलू शकत होते. पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर हे बालकाण्डाच्या संपादनाच्या शेवटी 'श्री वाल्मिकिरामायणाचे निरीक्षण' या विवेचनामध्ये हनुमानाचे उदाहरण देतात. - 'मारुती तर वेदशास्त्र-संपन्न असून तासन् तास, चुका न करता संस्कृतमध्ये उत्तम, अस्खलित भाषण करण्यात पटाईत होता. हे सर्व अग्नीची उपासना करीत व कराराचदार करावयाचे असता अग्नीमध्ये हवन करून त्याच्या साक्षीने सर्व करार करीत. या सर्व वृत्तांतावरून वानर या नावाच्या मानवजातीचे हे लोक होते. हे उघड होत आहे.' (संदर्भः रामायण खंड १- पं. सातवळेकर, पृ. ४८१)

*** वानरांचे पुच्छ**

वानराचा भाषिक विशेष लक्षात घेतला तरी मग त्यांच्या पुच्छाबद्दल प्रश्न शिल्लक राहतोच. हनुमानादी

जर पशुवानर नाहीत तर मग त्यांना पुच्छ कसे? परंतु याचीही संगती लावण्याचा प्रयत्न पं. सातवळेकर श्री वाल्मिकिरामायणाचे निरीक्षण या शीर्षकाखालील विवेचनात करतात. ते म्हणतात, 'वर्णन केलेली वानरांची तोंडे ही त्याची खरी तोंडे नसून त्यावर बसविलेली शिरस्त्राणे आहेत. वानरांचे पुच्छ हे वास्तविक पुच्छ नसून, ते पाश नामाचे आयुध आहे. हा पाश एक प्रकारच्या विशिष्ट विणीचा ३०/४० हात लांबीचा, दोरखंडासारखा असतो. शत्रू पुढे पळत असला म्हणजे त्याच्यावर हा फेकून त्याला फास घालून मागे ओढण्याच्या व बांधण्याच्या इत्यादी कामामध्ये त्याचा उपयोग होतो. हा नेहमी कंबरेभोवती गुंडाळलेला असतो व तो चटकन सोडता यावा, म्हणून त्याचे एक टोक मोकळे सोडलेले असते. ते टोक पुच्छासारखे खाली लोंबकळत रहात असल्याकारणाने त्याला पुच्छ अशी संज्ञा प्राप्त झाली........

वर्तमानकाळीही हिमालयामध्ये राहणाऱ्या पहाडी लोकांपाशी हा अशाच प्रकारचा पाश असतो व तो त्यांच्या कमरेभोवती गुंडाळलेला असतो. तात्पर्य, वानरांचे पुच्छ हा त्यांच्या शरीराचा अवयव नसून, ते त्यांच्या शरीराहून भिन्न असे त्यांचे पाश नावाचे आयुध आहे. तो पाश वानर आपल्या कंबरेभोवती गुंडाळीत असत व सहज सोडता यावे म्हणून त्याचे एक टोक मोकळे लोंबत ठेवीत असत. म्हणून त्याला पुच्छ असे म्हटले आहे.' ( संदर्भःरामायण - खंड१ - पं.सातवळेकर - पृ.४७६-४७७ ) ते पुढे म्हणतात, 'या वानरांस अंगचे पुच्छ नाही. पुढे ग्रंथात पुच्छ असल्याची जी वर्णने आली आहेत, ती लाक्षणिक आहेत. त्यांच्या शरीराची आकृतीही सामान्य वानरांच्या शरीराच्या आकृतीसारखी नाही. तात्पर्य, वाल्मिकीने वर्णन केलेले वानर हे समजले जातात तसे पशुवानर नसून, अगदी आपल्या सारखे मनुष्य आहेत. वानर ही त्याची लाक्षणिक संज्ञा (टोपणनाव) आहे.

यावरून हे स्पष्ट होण्यास मदत होते की रामायणातील वानर हा एक तत्कालीन मनुष्यसमाजच आहे व मुळात त्यांना पुच्छ नाहीच.'

**❋ वानरांची प्रगती**

रामायणात वानरांसंबंधी आलेले वर्णन वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती अशी की बाकी मनुष्यसमाजांच्या तुलनेत वानर हे मुळीच मागासलेले नसून त्यांनी अनेक क्षेत्रात प्रगती केलेली होती. प्रा. भालबा केळकर 'श्रीवाल्मिकिरामायण - भाग २' च्या प्रस्तावनेत म्हणतात, 'वानरराज्याची राजधानी किष्किंधा ही एक भौतिक आणि सांस्कृतिकरित्या सुधारलेल्या माणसांच्या राज्याची राजधानी आहे, हे तिच्या वर्णनावरून वाटते. मृतावरचा अग्निसंस्कार, वालीच्या शवासाठी जी शिबिका वापरली आहे तिचे वर्णन इत्यादींवरून वानर हे सुधारलेले मानव होते असेच वाटते. सुधारलेल्या वानर जातीतील नल, नील इंजिनिअर्सनी सेतुबंधनाचे काम केले. यावरून त्यांच्या भौतिक सुधारणेची कल्पना येते.' असेच विचार पं.सातवळेकरांनीही व्यक्त केलेले आहेत. ते म्हणतात, 'वानरांमध्ये मारूतीसारखे वीर हे उत्तम विद्वान, मुत्सदी, राजकारणपटू व लढवय्ये होते.याशिवाय इंजिनियर, वास्तुशास्त्रज्ञ, शस्त्रास्त्र निर्माण करणारे कारागीर व इतर आवश्यक विद्यात निपुण वानर पुष्कळच होते.' ( रामायण खंड १ पं. सातवळेकर पृ. ४८१ )

यावरून रामायणातील वानर म्हणजे एक संपन्न, समृध्द, पुढारलेला मनुष्यसमाज होता असेच वाटते. या मताला पुष्टी मिळेल असा आणखी एक उल्लेख डॉ. प्र. न जोशी 'सार्थ श्रीवाल्मिकिरामायण' (खंड-५)मधील रामायण - समालोचन करत असताना ते रामायणातील एक घटना उद्‌धृत करतात.- 'सीतेला घेऊन रावण लंकेकडे जात असता मार्गात एका पर्वत शिखरावर पाच वानर बसलेले तिने अवलोकन केले. तेव्हा तिने आपले रेशमी वस्त्र व अलंकार रावणाची दृष्टी चुकवून या वानरांकडे फेकून दिले. आपल्या अपहाराची वार्ता त्याजकडून तरी या निमित्ताने रामाला कळू शकेल, अशा कल्पनेने तिने हा यत्न केला व तिच्या

कल्पनेप्रमाणे पुढे घडूनही आले.हे वानर पशूंपैकी असते तर त्यांच्याकडे वस्त्रे व भूषणे टाकली तरी त्यांच्या ठायी संग्रहबुध्दी व बोलण्याची शक्ती नसल्यामुळे त्यांच्याकडून स्वतःचे वृत्त रामाला कळण्याचा संभव नाही, हे सीतेच्या सहज लक्षात येण्यासारखे होते. रामाला वृत्तांत कळिवण्याची पात्रता या वानरांकडे पाहताच सीतेला पटली व हाच त्या वानरांचा विशेष होय. पशुवानरांहून या वानरांमध्ये असलेला हा गुणविशेष सीतेच्या लक्षात त्यांच्याकडे पाहताच आला व यावरून हा विशेष त्यांच्या नित्य परिचयातील असावा असे दिसते.'

एकंदरीत जैनेतर विद्वानांची ही आणि अजूनही काही मते (विस्तारभयास्तव सर्वच उद्धृत केली नाहीत.) रामायणातील वानर हा प्रगत मनुष्यसमाज होता याची पुष्टी करणारी आहेत.

राक्षसांविषयीची जैनेतर विद्वानांची मते पुढील भागात ......

**( क्रमशः )**

---

**भद्र-कथासार - ०२**

# वानर बनले गणधर

**– पं. श्री. प्रदीप धोतरे (शास्त्री),** बाहुबली

एक माकड होते, ते पूर्वभवामध्ये मनुष्य होते; परंतु त्यावेळी मायाचारी, छळकपट केल्याने माकडाच्या पर्यायात जन्मास आले.

ते माकड एका जंगलात राहत होते, जंगलातील फळे-फुले खात होते. स्वतःलाच त्या जंगलाचा राजा सुद्धा समजत होते. या झाडावरून त्या झाडावर उड्या मारत सर्वांना घाबरवत होते.

एके दिवशी त्या जंगलात एक मुनिराज येतात आणि झाडाखाली ध्यान करण्यासाठी बसतात. तेव्हा त्या मुनिराजांना पाहून ते माकड उड्या न मारता शांत बसून राहिले. त्याचं जंगलात काही महिन्यानंतर एक राजा आणि राणी आले. राजाचे नाव वज्रजंघ होते आणि राणीचे नाव श्रीमती होते. त्यावेळी त्या राजाचे दोन पुत्र जे मुनी झाले होते, ते मुनी सुद्धा त्या जंगलात आले. तेव्हा त्या राजा-राणीने त्या दोन्ही मुनिराजांना भक्ती-भावपूर्वक आहार दिला.

हे सर्व दृश्य माकड झाडावर बसून पाहत होते. हे पाहून त्याच्या मनात अशी भावना जागृत झाली की जर मी मनुष्य असतो तर मी सुद्धा या राजाप्रमाणे मुनिराजांची सेवा करू शकलो असतो, परंतु मी पापी आहे, मी पशू आहे.... माझे असे भाग्य कोठे?.... की मी मुनिराजांना आहार देऊ शकेन.

आहार झाल्यानंतर ते मुनी उपदेश देऊ लागले. तेव्हा राजा-राणीसोबत ते माकड सुद्धा उपदेश ऐकण्यास बसले. आणि हात जोडून दोन्ही मुनिराजांची वंदना करू लागले. तेव्हा त्या माकडाला असे पाहून राजा खूपच प्रसन्न झाला. त्याचे त्या माकडावर विशेष प्रेम जाडले.

तेव्हा राजाने मुनिराजांना विनयपूर्वक विचारले की – हे माकड कोण आहे? त्याचे असे भाव कसे काय? त्यावेळी मुनिराजांनी त्यांना सांगितले की – 'हे राजन्! हे माकड पूर्वजन्मी नागदत्त नावाच्या व्यापाऱ्याचा जीव होता. त्यावेळी लोभापोटी मायाचारी, छळकपट केल्याने तो जीव माकड झाला आहे. परंतु आता त्याला उत्कृष्ट भाव झाले आहेत. धर्माप्रति त्याचे प्रेम उत्पन्न झाले आहे. धर्म उपदेश ऐकून ते माकड खूपच प्रसन्न झाले, त्याला आपल्या पूर्वभवाचे जातिस्मरण झाले आहे, आता ते संसारापासून विरक्त झाले आहे.' मुनिराजांच्या मुखातून माकडाचा संपूर्ण वृत्तांत ऐकून राजा खूपच प्रसन्न झाला.

पुन्हा मुनिराज म्हणाले – 'हे राजन्! जसे या भवात आम्ही तुमचे पुत्र होतो, तसे हा माकडाचा जीव भविष्यात तुमचा पुत्र होईल. जेव्हा तुम्ही वृषभदेव तीर्थंकर व्हाल, तेव्हा हा जीव तुमचा गणधर होईल आणि मोक्ष प्राप्त करेल.' मुनिराजांच्या

मुखातून ही गोष्ट ऐकून माकड खूपच आनंदी झाले आणि भावूक होऊन मुनिराजांच्या चरणांवर नतमस्तक होऊन आनंदाने नाचू लागले.

आपण मोक्ष प्राप्त करणार आहोत, हे ऐकून कोणाला आनंद होणार नाही? माकडाला आनंदाचा परावार राहिला नाही, ते दररोज उत्कृष्ट भाव करू लागले. जसे कोणी मनुष्य असल्याप्रमाणेच.... आणि त्याच भवात मोक्ष प्राप्त होणार आहे अशी भक्ती करू लागले. शेवटी ते माकड आपले आयुष्य पूर्ण करून मनुष्य झाले आणि भोग-भूमीमध्ये जन्माला आले. राजा वज्रजंघ आणि राणी श्रीमती यांचा जीव सुद्धा त्याच ठिकाणी जन्मले.

एके दिवशी ते सर्व एकत्र बसून धर्मचर्चा करीत होते. तेव्हा आकाशातून दोन मुनिराज त्या ठिकाणी आले, आणि त्या सर्वांना अनेकविध धर्माचा उपदेश देऊन आत्मतत्त्वाचे स्वरूप समजावले. मुनिराजांचा उपदेश ऐकून त्या सर्व जीवांनी सम्यग्दर्शन प्राप्त केले... म्हणजेच मोक्षमार्गावर ते आरुढ झाले.


त्यानंतर ते सर्व जीव आपले आयुष्य पूर्ण करून स्वर्गात गेले आणि चार भवानंतर राजाचा जीव वृषभदेव तीर्थंकर झाला. त्या माकडाचा जीव त्यांचा पुत्र झाला. त्याचे नाव गुणसेन होते. ते दीक्षा घेऊन वृषभदेवांचे गणधर झाले. शेवटी केवलज्ञान प्रकट करून मोक्ष प्राप्त केले. तो जीव खरंच धन्य आहे.

साधर्मीजण हो! खऱ्या वीतरागी मुनींची भक्ती केल्याने आणि आत्मस्वरूप समजून घेतल्याने एका वानराचा जीव गणधर होऊन शेवटी भगवान झाला. आपणही खऱ्या देव-शास्त्र-गुरूंना आदर्श मानून त्यांची सेवा-भक्ती करीत मोक्षमार्गावर स्वार होऊन आपल्या आत्मकल्याणामध्ये संलग्न झाले पाहिजे.

---

**वियोग वार्ता –**

## श्री. सुधाकर देवाप्पा मणेरे, कबनूर



श्री. सुधाकर मणेरे यांचे अल्पशः आजाराने रविवार दि. १३ जुलै २०२५ रोजी वयाच्या ८५व्या वर्षी पहाटे ५:३० वाजता निधन झाले. ते बाहुबली विद्यापीठ या संस्थेचे १९९५ ते आज अखेर असे एकूण ३० वर्षे कार्यकारणीचे सदस्य होते. परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांचे ते परम शिष्य होते. त्यांनी बाहुबली येथील यात्री निवास मधील विशेष खोली बांधून दिली आहे. त्याशिवाय महामस्तकाभिषेक व विधान प्रसंगी बृहद् दानराशी दिली आहे. त्यांचे वडील श्री. देवाप्पा मणेरे हे संस्थेच्या प्रारंभिक अवस्थेत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. ते सुद्धा १९४६ ते १९६० या कालावधीत संयुक्त महामंत्री म्हणून कार्य करीत होते. मणेरे परिवारामार्फत बाहुबली संस्थेस मोठे योगदान लाभले आहे. तसेच श्री. सुधाकर मामा यांचा मणेरे चारिटेबल ट्रस्ट मार्फत संचालित प्राथमिक, माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजच्या उभारणीमध्ये सिंहाचा वाटा आहे. त्यांनी कबनूर येथे विशाल शैक्षणिक संस्था निर्माण केली आहे. नवमहाराष्ट्र सूतगिरणीचे माजी चेअरमन, रत्नाकर बँकेचे माजी संचालक, तसेच शांतिनाथ नागरी पतसंस्था व इंदिरा महिला सहकारे पतसंस्था यांचे ते संस्थापक होते. या मार्फत त्यांनी सहकार क्षेत्रात ही कार्य केले आहे. बाहुबली येथील वृद्धाश्रमामध्ये श्री. सुधाकर मामा यांनी आपले सुपुत्र श्री. यश याच्या स्मरणार्थ उत्तम वागबगीचा निर्माण करून दिला आहे. कबनूर एज्युकेशन सोसायटीचे संचालक होते. धार्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करण्यात ते नेहमी अग्रेसर होते. विविध संस्कार व आरोग्यविषयक शिबिरांचे त्यांनी आयोजन केले होते आणि त्यातून अनेक हुशार व होतकरू लोकांना सढळ हाताने मदत केली आहे. विविध सूतगिरणीच्या मार्फत त्यांनी वस्त्रोद्योग क्षेत्रात चांगली कामगिरी केली होती. तसेच अनेक कामगारांना काम उपलब्ध करून दिले होते.

श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे दादा यांचे ते भाचे व श्री. प्रकाशराव आवाडे यांचे ते आतेभाऊ होते. त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा शीतलकुमार, अनिलकुमार, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, हीच भावना..!

# आत्मा का स्वरूप– जैन दर्शन के परिप्रेक्ष्य में

**डॉ. मोनीदीपा घोष**
अकादमिक काउंसलर, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय (इग्नू)
ईमेल – monidiaghosh07@gmail.com, 8447312055

जैन दर्शन में आत्मा और जीव तत्त्व पर गहन चिंतन किया गया है, जिसके फलस्वरूप हमें इन विषयों का अत्यंत विस्तृत वर्णन प्राप्त होता है । जैन धर्म मानता है कि जीव तत्त्व या आत्मा चेतन है तथा इस दर्शन में चेतना ही आत्मा का मूल माना गया है । चैतन्य–युक्त होना ही जैन दर्शन में जीव का लक्षण माना है (चैतन्यलक्षणो जीवः)। जीव और आत्मा दोनों वास्तव में पर्यायवाची ही हैं। जीव शब्द का प्रयोग सैद्धांतिक चर्चाओं में किया जाता है जबकि आत्मा शब्द का प्रयोग आध्यात्मिक अर्थों तथा चर्चाओं में किया जाता है। हम यह भी कह सकते हैं कि जीव ज्ञान और अध्ययन की वस्तु है जबकि आत्मा ध्यान और अनुभव की वस्तु है (जैन, वि. सा., २०१८, ६१)। आत्मा के संदर्भ में, श्वेतांबर और दिगंबर जैन दोनों ही उमास्वामी को प्राथमिक प्राधिकारी के रूप में देखते हैं । उमास्वामी ने एक संक्षिप्त ग्रन्थ तत्त्वार्थसूत्र की रचना की, जो मूल जैन शिक्षाओं को समाहित करता है। यद्यपि श्वेतांबर और दिगंबर परंपराओं का विकास अलग–अलग टिप्पणीओं द्वारा हुआ, फिर भी वे मूल बुनियादी सिद्धांतों पर सहमत हैं, अर्थात, असंख्य आत्माएं (जीव) मौजूद हैं। वे सदैव अस्तित्व में हैं और सदैव बने रहेंगे। इन्हें किसी ने नहीं बनाया है। इन आत्माओं पर किसी का नियंत्रण नहीं है और प्रत्येक आत्मा स्वयं लेखक है अपनी नियति का । वीरसागर जी कहते हैं कि हम आत्मा और जीव को व्यापक और व्याप्त के रूप में अलग कर सकते हैं। आत्मा व्याप्त है और जीव व्यापक है। इस प्रकार हम आत्मा को जीव कह सकते हैं लेकिन इसके विपरीत नहीं। जैन धर्म में आत्माओं कि चेतना के विकास के अनुसार निरंतर श्रृंखला में रखा जाता है। आत्मा सभी जीवित प्राणियों में होती है, लेकिन मनुष्य की आत्मा ही सबसे विकसित है, क्योंकि इसमें सबसे अधिक चेतना अभिव्यक्त है। मानव में वह सामर्थ्य माना गया है कि वह आत्मा के पूर्ण स्वरूप को प्राप्त कर मोक्ष प्राप्त कर सके ।

कुंदकुंदाचार्य अपनी महान कृति समयसार में कहते हैं कि जो आत्मा के वास्तविक स्वरूप को नहीं जानते, वे आत्मा और अनात्मा को एक ही मानते हैं। वे कामना, राग–द्वेष आदि मानसिक और शारीरिक अवस्थाओं को आत्मा समझते हैं और अज्ञानवश आत्मा को किसी अन्य वस्तु से जोड़कर देखते हैं। कुछ लोग मन की तीव्र या मृदु स्थितियों को आत्मा मानते हैं, तो कुछ शरीर से जुड़ी क्रियाओं को आत्मा का स्वरूप समझते हैं। कुछ के अनुसार आत्मा और कर्मों का संबंध आत्मा के जन्म का कारण है, जबकि कुछ मानते हैं कि आत्मा विभिन्न कर्मों के संयोग से उत्पन्न होती है। इस प्रकार अनेक मिथ्या दृष्टिकोण आत्मा की अवास्तविक व्याख्या करते हैं, जिनका कारण केवल मोह और कर्मों की परिणति है । शुद्ध आत्मा से इनका कोई संबंध नहीं होता। जिनों ने आठ प्रकार के कर्मों को द्रव्यात्मक बताया है, वही कर्म दुःखों का कारण हैं। व्यवहार दृष्टि से मानसिक अवस्थाओं को आत्मा माना गया है, जैसे सेना के चलने पर कहा जाता है कि 'राजा चल रहा है,' वैसे ही व्यवहार से इन्हें आत्मा की संज्ञा दी गई है, जबकि वास्तव में आत्मा उनसे भिन्न है (जैन, ज. एल., २०१८, २७, २८) । कुंदकुंदाचार्य के अनुसार आत्मा चेतन तत्त्व है, जो स्वाद, रूप, गंध, स्पर्श, ध्वनि आदि से रहित है।

उसमें न शरीर, न हड्डियाँ, न राग-द्वेष, मोह, कर्मबंध या कोई भी भौतिक विशेषता होती है। आत्मा का अनुभव केवल आत्मा से होता है, न कि अन्य किसी तत्त्व से मिश्रित होकर। न उसमें मन-वचन-काय की क्रियाएँ हैं, न कर्मों की परिपक्वता। आत्मा को गुणस्थान, संयम आदि से नहीं पहचाना जा सकता। मोक्ष में आत्मा इन सब गुणों से रहित होती है, अतः उनसे आत्मा का वास्तविक संबंध नहीं हो सकता। वास्तव में आत्मा को केवल ज्ञान और दर्शन से पहचाना जा सकता है। अतः व्यवहार से आत्मा से जोड़े जाने पर भी, वास्तविक दृष्टि से आत्मा उनसे भिन्न है। गुणस्थान भी मोहनीय कर्मों से उत्पन्न होते हैं और जड़ हैं, इसलिए आत्मा का अंग नहीं माने जा सकते (जैन, ज. एल., २०१८, २९, ३०)।

समयसार में आत्मा के गुणों का विस्तार से वर्णन किया गया है। अगर सरल और संक्षेप में आत्मा के गुण बताने हों तो वह अग्रलिखित पूर्णताओं से युक्त होती है- अनंत शक्ति अथवा वीर्य, अनंत ज्ञान, अनंत दर्शन तथा अनंत आनंद। हालाँकि एक सांसारिक आत्मा को उस पदार्थ से संक्रमित माना जाता है जो इन चार अनन्तताओं को वश में कर लेता है। जीवात्मा के बंधन-ग्रस्त होने का कारण उसके पूर्व जन्म के कर्मफल होते हैं, उन कर्मों के अनुकूल ही पुद्गल कण उसकी तरफ आकृष्ट होते हुए उसके कर्मों के अनुरूप ही उसका शरीर निर्माण करते हैं। जो पदार्थ आत्मा को संक्रमित करता है उसे कर्म कहते हैं और वह सूक्ष्म कणों से युक्त होते हैं जिन्हें कार्मण वर्गणा अथवा कर्माणु भी कहते हैं (पोखरना, एस. एट. अल., २०१६, ३)। यहाँ कर्म का अर्थ गतिविधि नहीं बल्कि कर्म है सूक्ष्म पदार्थ की श्रेणी जो आत्मा की पवित्रता में बाधा डालती है और सत्य की अभिव्यक्ति को रोकती है। इसलिए जैनियों का मानना है कि सभी जीवित प्राणियों में एक ही आत्म-पदार्थ विद्यमान है। एक छोटे से छोटे प्राणी की अशुद्ध आत्मा विकसित होकर शुद्ध आत्मा बन सकती है। इस समता के कारण जैन पंथी विश्व के सभी प्राणियों हेतु अहिंसा के सिद्धांत में विश्वास करते हैं। (पोखरना, एस. एट. अल., २०१६, ३)। समयसार में आत्मा के मुख्य चार गुणों के अतिरिक्त और गुणों का भी वर्णन है। आत्मा अनादि है, अनंत है, अमूर्त अथवा निराकार है, अविनाशी है, अनंतप्रदेश अथवा विस्तार में अनंत या अपरिमेय रूप से बड़ा है, अखंड अथवा अविभाज्य है, निरपेक्ष है, स्वाश्रित तथा स्वतंत्र है, अचल तथा कंपन मुक्त है, निःसंग है, तथा स्वयं प्रकाशित है। इस पर समय का कोई प्रभाव नहीं पड़ता यानी उम्र बढ़ने की प्रक्रिया से नहीं गुजरता, कालातीत है। इसकी अविभाज्यता की शक्ति के आधार पर यह अतिसूक्ष्म है। (पोखरना, एस. एट. अल., २०१६, ३)। जीवात्मा का स्वरूप जैन दर्शन के अनुसार इस प्रकार देखा जा सकता है -आत्मा सत्-रूप है, आत्मा अनेक है यद्यपि आत्मा स्वभाव में एक जैसी कही जा सकती है परंतु पूर्णतः एक-आत्म नहीं कही जा सकती। आत्मा एक परिपूर्ण सत्ता है, जो पूर्णतः स्वतंत्र है किसी ईश्वर का अंश नहीं (जैन, वि. सा., २०१८, ६४)। आत्मा कर्ता व भोक्ता दोनों है। 'आत्मा उपयोगमय है, चैतन्यमय है, ज्ञानदर्शनमय है; वह स्वभाव से निरन्तर जानने-देखने का ही कार्य करता है (जैन, वि. सा., २०१८, ६४)। आत्मा में संकोच तथा विस्तार कि शक्ति विद्यमान है, जिसके कारण जैन दर्शन देहपरिमाणवाद स्वीकार करता है जिसके कारण वह कहते हैं कि एक चींटी में आत्मा चींटी के शरीर के अनुकूल होती है तथा एक हाथी में आत्मा उसके शरीर के अनुकूल होती है, एक कि छोटी तो दूसरे कि परिमाण में बड़ी। तत्त्वार्थसूत्र के अनुसार, जब आत्मा को मोक्ष कि प्राप्ति होती है और वह शरीर से मुक्ति पा लेता है, तब आत्मा का परिमाण उसके अंतिम शरीर जितना होता है (जैन, वि. सा., २०१८, ६७)।

आचार्य नेमिचन्द्र सिद्धांतिदेव द्रव्यसंग्रह में आत्मा के नौ अधिकार बताते हैं, वह अग्रलिखित हैं- प्रथम विशेष गुण है- जीवत्व, अर्थात, आत्मा सदैव ही जीवित रहती है, फिर वह संसार प्राण, इत्यादी से हो अथवा चैतन्य प्राण से हो, मुक्तावस्था

में भी वह सत्-जीवत्व अवस्था में होती है । द्वितीय विशेष गुण है- उपयोगमयत्व, जिसे कुछ इस प्रकार से समझा जा सकता है - 'उपयोग' का अर्थ यहाँ पारिभाषिकरूप से 'चेतना' ही ग्राह्य है। चेतना या उपयोग दो प्रकार का है- दर्शनोपयोग और ज्ञानोपयोग । जैनाचार्यों ने इस उपयोग या चेतना को ही जीव या आत्मा का वास्तविक लक्षण कहा है (जैन, वि. सा., २०१८, ६८) । तृतीय विशेष गुण है- अमूर्तिकत्व, अर्थात, इसमें गंध, रस, स्पर्श, आदि विद्यमान नहीं होते हैं, परंतु सांसारिक अवस्था में यही आत्मा मूर्त रूप में हमारे समक्ष होती है तथा इसमें चतुर्थ और पंचम विशेष गुण है- कर्तृत्व तथा भोक्तृत्व दिखाई पड़ता है । स्वदेहपरिमाणत्व छठवाँ विशेष गुण है जिसकी चर्चा हम पहले ही कर चुके हैं। सातवाँ विशेष गुण है संसारित्व, अर्थात वह अवस्था जिसमे 'अनादिकाल से अशुद्धावस्था में यह आत्मा संसार में रहता है और निरन्तर परिभ्रमण ता रहता है' (जैन, वि. सा., २०१८, ६९) । सिद्धत्व आठवाँ विशेष गुण है जो 'मुक्तावस्था प्राप्त होने पर यह आत्मा सिद्ध हो जाता है। सर्वज्ञ, वीतराग और परमसुखी अवस्था में अनन्त काल तक रहता है, पुनः संसार में नहीं आता'(जैन, वि. सा., २०१८, ७०)। ऊर्ध्वगमनस्वभावत्व अंतिम विशेष गुण है जो आत्मा का सत्य स्वरूप है, परंतु संसार अवस्था में कर्म के आधीन जीवात्मा का अधोगमन होता है । इन सभी गुणों को पूर्णतः समझ लेने पर ही जीवात्मा अपने सत्य स्वरूप को समझ कर आत्मा संबंधी सभी आज्ञानों को दूर कर सकता है ।

**संदर्भ सूची**

Jain, Jayanti Lal, ed. Essence of Samayasar: A Text on Pure Soul by Acharya Kundakunda. Edited by Priyadarshana Jain. Ja{iur: Prakrit Bharati Academy, 2018.

Jain, Veer Sagar. Conce{t of Soul / Self (Ātmā) in Jain Philosohy. HereNow4U Next Level Consciousness, Setember 2008. htts://www.herenow4u.net/index.hid 65933.

Pokharna, Surendra Singh, Narendra Bhandari, Narayan Lal Kachhara, and Chaitanya Prajna. Conce{t of Living Beings, Consciousness and Soul-Matter Interactions in Jain Philosohy. Pa{er {resented at the International Conference on Consciousness, November 2016. htts://s{iritualsciencesg.com /book-article/nl35.df.

जैन, वीरसागर. भारतीय दर्शन आत्मा एवं परमात्मा. नई दिल्ली: भारतीय ज्ञानपीठ, २०१८.

---

**जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर, जयसिंगपूर** या प्रशाळेच्या १५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती उज्वल यशाची अखंडीत परंपरा फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या **प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये** घवघवीत यश संपादन केले.

**इयत्ता पाचवी शिष्यवृती राज्य गुणवत्ता यादीसह १० विद्यार्थी-** १) अविष्कार अमोल देसाई (राज्यात ११वा), २) आरोही संतोष माने (राज्यात १६वी), ३) स्वरूप पाटील (जिल्ह्यात २३वा), ४) आयुष अकिवाटे (जिल्ह्यात ७१वा), ५) श्रेयस माणगावे (जिल्ह्यात ११६वा), ६) कृष्णाली गवळी (जिल्ह्यात १४८वी), ७) प्रतिक पाटील (जिल्ह्यात १७६वा), ८) आरव मोगलाडे (जिल्ह्यात २०३वा), ९) आराध्या राहुल किनिंगे (जिल्ह्यात २०५वी), १०) पद्मावती कत्ते (जिल्ह्यात २३० वी)

**इयत्ता आठवी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत ५ विद्यार्थी -** १) प्रज्ञेश पाटील (जिल्ह्यात ३२वा), २) सेजल पाटील (जिल्ह्यात ४४वी), ३) नेहा मद्वान्ना (जिल्ह्यात ९४वी), ४) स्नेहा रुकडे (जिल्ह्यात १०७वी), ५) पृथ्वीराज माने (जिल्ह्यात १२१वा)

**एम. जी. शहा वि.मं. व ज्युनि. कॉलेज, बाहुबली** या प्रशाळेचे तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक बनले. राजवर्धन सागर पाटील हा तालुक्यात दुसरा व जिल्ह्यात १४वा क्रमांक, कु. पिया दिलीप धाडवे ही तालुक्यात चौथी व जिल्ह्यात १०२वा क्रमांक आणि अनिरुद्ध प्रवीण कोळी हा तालुक्यात चौथा व जिल्ह्यात ३८वा क्रमांक आला.

# रिटर्न गिफ्ट

लेखन :- स्पंदन (दादासो सरडे )
७३९११९३९९५५/९४२११८०७५८
Email ID :- dasarade@gmail.com

पृथ्वी या ग्रहावर आजच्या मानव या स्वतःला बुद्धिमान समजणाऱ्या प्राण्याने सर्वाधिक विनाश केलेला पाहायला मिळतो. हिरवाईने नटलेली पृथ्वी माणसाच्या हव्यासाने, लोभाने हतबल झालेली असून ती आर्त किंकाळी फोडून सर्वांना विनवते आहे की ...

**हा नाश थांबवा, भूमातेचे तन मन जळते आहे !!**

वाढती लोकसंख्या एक निसर्गातील फार मोठा अडथळा ठरत आहे. वाढलेल्या लोकसंख्येच्या अमर्याद बिनहिशोबी वाढत्या गरजा भागवण्यासाठी प्रचंड प्रमाणात फोफावलेली कारखानदारी, वाढलेली वाहने, अपरिमित जंगलतोड यामुळे अतिशय सुंदर असणारी पृथ्वी दिवसेंदिवस प्रदूषणाच्या विळख्यामुळे बकाल होत आहे.

पृथ्वीवर असणारी हिरवीगार झाडे माणसाने निर्दयीपणाने तोडून त्या ठिकाणी कारखानदारी वाढवली आहे. मागील वर्षी सर्वात मोठ्या असणाऱ्या जंगलात तापमान वाढीने वणवा पेटला आणि अमेझोन जंगल सहा महिने जळत होते. आगीच्या भक्ष्यस्थानी सापडलेले कोट्यवधी प्राणी होरपळून मेले. ऑस्ट्रेलिया, कॅलिफोर्नियातही प्रचंड वणवे पेटले. या सर्व विपरीत अनिष्ट घटकांचा दिवसेंदिवस परिणाम होऊन निसर्गचक्रच कोलमडून पडले आहे. कुठे ढगफुटी ? कुठे वाळवंटात महापूर ? तर कुठे सुनामी ? हे सगळे नित्याचेच झाले आहे.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे,**
**पक्षी सुस्वरे आळिवती !!**

असे संत तुकाराम महाराज कीर्तनातून सांगत. आजही या पृथ्वीवरील ३३% जंगल निसर्गाचे संतुलन राखण्याकरिता अत्यंत आवश्यक असते. परंतु अमाप जंगलतोडीमुळे हे प्रमाण दिवसेंदिवस कमी कमी होत चालले आहे. माणसाच्या हव्यासापोटी निसर्गाचे संतुलन दिवसेंदिवस बिघडत आहे. ऋतूंचे सोहळे ही पूर्णत बिघडून गेले आहे. त्यामुळेच केव्हाही पावसाळा, केव्हाही हिवाळा किंवा कोणताही ऋतू नाईलाज म्हणून अनुभवास मिळत आहे.

आजकाल शेतकरी म्हणून काम करणाऱ्या लोकांनीही पूर्वजांनी विचारपूर्वक लावलेली, मनापासून जोपासलेली, जीवापाड प्रेम केलेली बांधावरची झाडे उत्पनाच्या हव्यासापोटी निर्दयपणे तोडून टाकली आहेत. आपण झाड तोडताना फक्त जमिनीवरील झाडच नष्ट करत नाही, तर त्या झाडावर राहणाऱ्या पक्ष्यांचा सुंदर निवारा आसराही जमीनदोस्त करतो. झाडावरील पक्षी निवारा आणि चारा यांच्या शोधात दाही दिशांना वणवण फिरत राहतात, यांची तसूभरही कल्पना विद्ध्वंस करणाऱ्या माणसांना नसते.

अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याला शेती म्हणजे त्याची काळी आईच वाटत असते. आपलं पालन पोषण, उदरभरण करणाऱ्या शेतीला तो प्राणाहून जपत असतो. शेतकरी वर्षातून भूमिपूजन करण्याच्या निमित्ताने एक दिवस तरी तो शेतात जातो, शेतजमीन पूजतो आणि त्यादिवशी घरातून आणलेली भाजी, भाकरी, गोडधोड आनंदाने निसर्गाच्या कुशीत बसून खातो.

पूर्वी सगळ घरदार शेतात जायचं आणि पूर्वजांनी लावलेल्या झाडाखाली गप्पा मारत, विचारपूस करत जेवायचे, पण आजच्या पिढीने अविचाराने तोडलेल्या झाडामुळे, आज भूमिपूजन करून जेवायला बसताना झाडाची सावलीसुद्धा

मिळेनाशी झाली आहे. पक्ष्यांची आश्रयस्थान असणारी झाडे चारा आणि निवारा नसल्याने हळूहळू पक्षी नाहीसे होऊ लागले. पक्षी फक्त झाडावर बसून ज्वारी, बाजरी न खाता, शेताची राखण करत. शेतातील किडे, रोग पसरविणारे कीटक यांना खात त्यामुळेच रोगराईचे जैविक नियंत्रण आपोआप होत असे.

पृथ्वीवर माणूस नावाची जात जिवंत राहायची असेल तर आपल्याला वाढत्या तापमानाच्या नियत्रणासाठी व त्याच्या अनिष्ट परिणामांना अटकाव घालण्याकरिता प्रत्येकाने किमान एक झाड लावणे आवश्यक आहे. १४ वर्षे वयाची चिमुरडी पोर ग्रेटा थुनबर्ग हिने स्वीडन या देशांमध्ये संसदेसमोर आंदोलन करून, जगातील सर्व नेत्यांच्याकडे हात जोडून दाद मागितली आहे. ग्रेटाचे वडील प्रसिद्ध सिनेस्टार आहेत, आई ओपेरा गायिका आहे. प्रदूषणाच्या समस्येवर मात करण्याकरता, कार्बन उत्सर्जन कमी करणेकरिता तिने आपल्या आई-वडिलांचा विमान प्रवास सुद्धा बंद केला, त्याचबरोबर कार्बन उत्सर्जनाचा अभ्यास करून आई-वडिलांना पूर्णतः शाकाहारी बनविले.

ग्रेटा सांगते, येत्या वीस वर्षानंतर पृथ्वीच असणार नाही, मानव जात संपणार असेल. भाविष्यतील येणाऱ्या पिढ्यांना ही पृथ्वी जर जपून ठेवायची असेल तर आत्ताच आपण जागे व्हायला हवं !

याकरिता ग्रेटा थुनबर्गने युनोमध्ये दहा मिनिटांचे जगाला विचार करायला लावणारं भाषण केलं आणि दहा मिनिटाच्या भाषणात जगातील सर्व दिग्गज नेत्यांना वसुंधरा परिषद घ्यायला भाग पाडल आणि चिमुरड्या मुलीने जगाला मार्गदर्शन केलं.

तिने लाखो मुलांना एकत्र घेऊन फ्रायडे फॉर एन्व्हायरमेंट ही चळवळ सुरू केली. आज ही ४० लाख मुल आपणा सर्वांना आवाहन करत आहेत कि तुम्ही सर्वांनी हिरवीगार असणारी, आपल्या पूर्वजांनी जपलेली पृथ्वी आमच्याकरिता जिवंत आणि स्वच्छ ठेवा. निसर्ग वाचला तरच आपण वाचू, निसर्ग कोपला तर माणसालाच जगणं मुश्किल होईल. पृथ्वीच वाचली नाही तर....

कोणता आला धर्म ? आणि कोणती आली पूजा ?

म्हणून आज सर्वश्रेष्ठ प्राधान्यक्रम हा निसर्गाला आणि त्याच्या रक्षण आणि संवर्धनाला द्यायलाच हवा.

काही दिवसातच मे महिना संपेल. पावसाची चाहूल सुरू होईल, मृग नक्षत्र सुरु होईल. आपण सर्वांनी या साजऱ्या केलेल्या पूजेची, वाढदिवसाची, वास्तुशांती, लग्न यासारख्या समारंभाची आठवण म्हणून प्रत्येक माणसी दरवर्षी एक झाड आपल्या शिवारात लावूया. प्रत्येक श्रावकांनी, नागरिकांनी आपल्या कुवतीनुसार प्रत्येक सण समारंभ याकरिता यथाशक्ती वर्गणी, देणगी दिलेली असते. ही वर्गणी / देणगी म्हणजे त्यांनी केलेले दान अर्थात् आहेरच असतो.

**अतिथी देवो भव।** सांगणारी आपली संस्कृती आपण नेहमी जपतो. त्याचप्रमाणे केलेल्या उपकाराची परतफेड म्हणून सुसंस्कृतपणे काही ना काही आपण परत देतो त्यालाच आपण आधुनिक भाषेमध्ये रिटर्न गिफ्ट म्हणतो. सर्व श्रावकांनी, ग्रामस्थांनी केलेल्या आहेराला / देणगीला सर्व यजमानपद भूषविणाऱ्या लोकांनी रिटर्न गिफ्ट म्हणून एक अथवा दोन झाडे रिटर्न गिफ्ट म्हणून भेट द्यावीत. पूजेची, वाढदिवसाची, वास्तुशांती, लग्न यासारख्या समारंभाची आठवण म्हणून प्रत्येकाने ही भेट मिळालेली झाडे जिवापाड जपावीत. पर्यावरणाचे संरक्षण करावे आणि आणखी दहा-बारा वर्षानंतर जेव्हा ही झाडे मोठी होतील. तेव्हा आपण निसर्गपूरक कार्य केल्याचे एक फार मोठे समाधान सर्वांना लाभेल. निसर्गपूरक जगण्याची ही एक मोठी आदर्श परंपरा सुरू होईल. प्रत्येक गावात देशी वाण असणारी पिंपळ, चिंच, आंबा इत्यादी दोन हजार झाडे शिवारात लावली, तर पाच वर्षानंतर या गावातील लोकांना स्वच्छ सुंदर निसर्ग निर्माण केल्याचे समाधान अनुभवता येईल.

( पुढे पा. नं. २२ वर)

# विदुषीरत्न पंडिता विजयाताई भीसीकर, कारंजा (लाड) यांचे करकमली सादर समर्पित !



## जीवन गौरव पुरस्कार
## सन्मानपत्र

आदरणीय ताई ,

जैनांची काशी कारंजा नगरीत इ.स. १९३० मध्ये सुसंस्कार संपन्न अशा भोरे घराण्यात आपला जन्म झाला. हिऱ्याचे तेज झाकले कसे जाणार ? आपल्या असाधारण बुद्धिमत्तेच्या तेजाने बालपणीच आपण सर्वांना प्रभावित केले. आजोबा स्व. श्री. प्रद्युम्नसावजी डोणगावकर, वडील श्रीमान गंगासावजी आणि आई सुंदराबाई यांनी अत्यंत लाडात परंतु तेवढ्याच कडक शिस्तीत धार्मिक संस्कारांचे बाळकडू पाजून आपले जीवन उन्नत बनविले. ज्येष्ठ बंधू प्रखर विद्वान पं. धन्यकुमारजींचा आपणास लाभलेला सहवास आपणासाठी नित्यच प्रेरणादायी होता.

बालपणीचे ते अवखळ – सुरम्य दिवस मागे पडले आणि आपला विवाह कारंजा येथील श्री. अजितकुमारजी भीसीकर यांच्यासोबत होऊन अत्यंत धार्मिक अशा भीसीकर घराण्यात आपला प्रवेश झाला. एकीकडे दान, पूजा, गुरुभक्ती, स्वाध्याय, व्रतवैकल्ये यात रंगतानाच दुसरीकडे एकत्र कुटुंबपद्धती, आला गेला, पै-पाहुणा, सणवार, सोवळेओवळे, मुलांचे पालनपोषण अशी तारेवरची कसरत व सुगरण-सुगृहीणी बनून सहजतेने सुरू असताना या पसाऱ्यातही आपल्या मनातील ज्ञानार्जनाची आस सदैव जागृत होती आणि म्हणूनच घरचे सर्व निरेपुरे आटपून आपली पावले धार्मिक अध्ययनासाठी श्री कंकुबाई श्राविकाश्रमकडे वळत होती.

प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज, पं. देवकीनंदनजी शास्त्री, श्रद्धेय तात्याजी, पं. माणिकचंदजी भीसीकर गुरुजी, पंडिता गजाबेन शहा – अशा परमभाग्याने लाभलेल्या छत्रछायांमध्ये विसावतानाच त्या क्षणांचे आपण सोने केले आणि त्यांच्या मार्गदर्शनात चारही अनुयोगांचे गहन अध्ययन करून त्यात प्रावीण्य प्राप्त केले. रत्नपारखी गुरुदेवांची आज्ञा प्रमाण मानून आपण अध्यापनाच्या क्षेत्रात पाऊल ठेवले. सुमारे साठ वर्षांपूर्वी सुरू झालेला समीचीन अध्यापनाचा तो निरपेक्ष प्रवास वयाच्या ९५व्या वर्षी सुद्धा **'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।'** अशा स्थितप्रज्ञ वृत्तीने, कोणत्याही मानसन्मानाची अपेक्षा न करता निरंतर सुरू आहे. या दीर्घ कालामध्ये असंख्य आबालवृद्धांनी आणि अनेक त्यागीगणांनी आपल्या सखोल अध्यापनाचा लाभ घेतला.

जैन तत्त्वज्ञानामध्ये प्रवेश करण्यासाठी अत्यंत उपयुक्त अशा 'जैन सिद्धांत प्रवेशिका' ग्रंथाचे संपादन करताना, आपण सर्व अनुयोगांचा त्यामध्ये साधलेला मर्मग्राही सुमेळ आपल्या विचक्षण दृष्टीची आणि असामान्य बुद्धिमत्तेची साक्ष देणारा अनमोल ठेवा आहे. आमच्यासारख्या स्वाध्यायींवर हे आपले परम उपकार असून त्यासाठी आम्ही कृतज्ञ आहोत.

विषयाचे सखोल विवेचन, शांत – स्निग्ध शब्दकळा, आबाल- वृद्धांना खिळवून ठेवणारी सहज सुलभ अध्यापनशैली, श्रोत्यांना जागृत ठेवणारी प्रश्न विचारण्याची हातोटी, चेहऱ्यावर अविरत विलसणारे आश्वासक स्मितहास्य आणि या सर्वांना हळुवारपणे व्यापून असणारे विलक्षण ज्ञानतेज ! ऊन, थंडी, वारा,

पाऊस, प्रकृतीच्या कुरबुरी या कशाचीच पर्वा न करता या वयातही दररोज प्रवचनासाठी मंदिराकडे वळणारी आपली पावले – आम्हाला वंदनीय असणारी ! एक आसनी बसून प्रवचन करण्याची आपली क्षमता – तरुणांनाही लाजविणारी ! आपण कळकळीने केलेली स्वाध्यायाची प्रेरणा – मनाचा ठाव घेणारी ! आपली हितमितप्रिय वाणी – अनेक माणसे जोडणारी ! आपल्या व्यक्तिमत्त्वाचे हे विशेष वर्षानुवर्षे श्रोत्यांना संमोहित करणारे आणि जिंकून जाणारे ! मध्यंतरी अनेक वर्षे भाद्रपदानंतर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी तसेच कारंजा आणि इतर गावी आपल्या मार्गदर्शनात पार पडलेली सुमारे साठ धर्मशिक्षण शिबिरे म्हणजे विविध गावातील स्वाध्याय प्रेमींसाठी जणू एक आध्यात्मिक मेजवानीच होती. आधुनिक तंत्रज्ञानाचा आपण सहजतेने केलेला स्वीकार म्हणजे आपला ऑनलाइन स्वाध्याय वर्ग आणि धर्माकडे आकृष्ट होणारा युवावर्ग हे या स्वाध्याय वर्गाचे यश ! आपणास सुखावणारे, तोषविणारे !

**'आदहिदं च कादव्वं जई सक्कई ,परहिदं च कादव्वं।'** या उक्तीला सार्थ करणारा आपला जीवन प्रवास आमच्यासाठी आदर्शभूत आणि प्रेरणादायी असा ! आमच्या भवाभवांना सुधारणारे आपले आमच्यावरील ऋण न फिटण्यासारखेच ! त्या ऋणात राहण्यातच आम्हाला समाधान आहे. या कृतार्थ जीवन प्रवासात आपणास आपले सर्व कुटुंबीय आणि आप्तेष्टांकडून मोलाचा सहयोग प्राप्त झाला. आज आपणास 'जीवन गौरव' पुरस्कार प्रदान करताना उलट त्या पुरस्काराचाच हा गौरव आहे असे प्रकर्षाने वाटून जात आहे. आपणास निरामय आयुष्य लाभो, आपल्या जिनवाणी सेवेचा दीप असाच निरंतर तेवत राहो आणि त्या प्रकाशात मार्गक्रमण करण्याची संधी आम्हाला निरंतर लाभत राहो, ही मंगलमय भावना याप्रसंगी व्यक्त करीत आहोत .

। मंगलं भूयात् ।

– शुभेच्छुक –

अखिल भारतवर्षीय दिगंबर जैन बघेरवाल संघ, दक्षिण प्रांत

दिनांक : २२ जून २०२५

–(शब्दांकन : डॉ. लीना उदय चवरे)

---

**झीजता झीजता सुगंध देयी**

**नाव तयाचे चंदन !**

आपणसुद्धा निसर्गासाठी चंदनाप्रमाणे झिजून सुगंध द्यायला हवा. आपणा सर्वांची प्रत्येक कृती निसर्गपूरक, प्रत्येक प्राणिमात्राला अनुकूल अशीच करूया. येथून पुढे प्रत्येक गावात होणारी पूजा ही निसर्गाची जपणूक करणारी व्हावी. याकरिता येथून पुढे होणाऱ्या सर्व पूजेमधून वृक्षारोपणाची अशी एक आगळीवेगळी मोहीम घेऊन पूजेची आठवण सार्थ ठरवावी हीच विनंती.

**धरती मा कि एक पुकार !**

**प्रदूषण कम हो पेड हजार !!**

---

**सौ. मालुताई गुंडाप्पा रोजे,** इचलकरंजी



इचलकरंजी येथील दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष श्री. गुंडाप्पा रोजे यांच्या धर्मपत्नी सौ. मालुताई यांचे वृद्धापकाळाने बुधवार दि. २३ एप्रिल २०२५ रोजी निधन झाले. त्यांनी सम्मेदशिखरजी, श्रवणबेलगोळ अशा क्षेत्रांची अनेक वेळा यात्रा केली आहे. त्यांच्या पश्चात् तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती व सुख शांती लाभो, हीच सद्भावना करीत आहोत.

# मैं मात्र परमपारिणामिक भाव स्वरूप हूँ

**शिरीष रायबागकर, अहिल्यानगर**

हालही में सर्वोदय अहिंसा ट्रस्ट, जयपुर से प्रकाशित पुस्तक 'मैं मात्र परमपारिणामिक भाव स्वरुप हूँ' इसका परिचय देते हैं। पुस्तक के शीर्षक में जो 'मात्र' शब्द है उससे कुछ लोगों को निश्चयाभास या एकांत प्रतीत हो सकता हैं। इसके निराकरण हेतु मैं आपसे पूछता हूँ की अगर कोई कहे की निश्चय से वीतरागता में सुख है और व्यवहार से राग में सुख है, तो क्या आप इसे अनेकांत की दृष्टि से स्वीकार करेंगे? हरगिज़ नहीं । सिधिसी बात है – वीतरागता निराकुल है और राग आकुलतामय हैं । इसलिए नियम से वीतरागता में ही सुख मानते है । जिस तरह वीतराग और राग ये दो भाव परस्पर विरुद्ध है, उसी तरह परमपारिणामिक और औदयिकादि भाव परस्पर विरुद्ध है । परमपारिणामिक भाव निरपेक्ष, सामान्य, एक, अभेद, अखंड, नित्य, अनादि-अनंत है, जबकि औदयिकादि भाव सापेक्ष, विशेष, अनेक, भेद, अनित्य, अनादि-सांत या सादी-अनंत है । इन दो परस्पर विरुद्ध भावों में एकत्व नहीं हो सकता । कोई कहेंगे निश्चय से परमपारिणामिक भाव मानो और व्यवहार से औदयिकादि भाव मानों, लेकिन प्रायः देखा गया है की ऐसे कहनेवाले एक ही अपेक्षा को लेकर दोनों नयों को सत्यार्थ मानते है, जिसे उभयाभास कहते हैं

पुस्तक मात्र ३० पृष्ठों का है, लेकिन पुस्तक की लम्बाई उसकी गुणवत्ता का नाप नहीं होती । आपको जानकार आश्चर्य होगा की प्रसिद्ध scientist Albert Einstein इनका पीएच. डी. थेसिस मात्र २४ पृष्ठों का था । 'मैं मात्र परमपारिणामिक भाव स्वरुप हूँ' की शैली संक्षिप्त, अध्यात्म और निश्चय प्रधान है । प्रश्नोत्तर स्वरुप इसका पाठन और सरल बनाता है । पुस्तक पांच प्रकरणों में विभाजित है, प्रथम प्रकरण में पारिणामिक भाव और परमपारिणामिक भाव के स्वरूप को स्पष्ट करनेवाले अनेक प्रश्नोत्तर है । पारिणामिक भाव का शब्दार्थ, भावार्थ, उसके भेद, इत्यादि कई मुद्दों को लेकर आद्योपांत अध्ययन किया गया है । द्वितीय प्रकरण इस बात का खुलासा करता है कि मात्र परमपारिणामिक भाव में ही क्यों अहम् करना योग्य है। तीसरे प्रकरण में पारिणामिक भाव और परमपारिणामिक भाव सम्बन्धी कुछ भ्रांत कल्पनाओं का निराकरण किया है । चौथे प्रकरण में परमपारिणामिक भाव और पुरुषार्थ जैसे संवेदनशील बिंदु पर प्रकाश डाला है । अंतिम प्रकरण परमपारिणामिक भाव के चिंतवन के बारे में उपयुक्त मार्गदर्शन करता है ।

हर एक प्रकरण की शुरुवात में प्रकरण क्यों लिखा गया है इसका संक्षेप में खुलासा है । साथ ही अंत में प्रकरण का सार भी संक्षेप में लिखा गया है । पुस्तक निश्चय प्रधान होते हुए भी व्यवहार का यथा योग्य प्रयोग करके दोनों नयों में संधि बनाये रखता है। लेकिन एक ही अपेक्षासे निश्चय भी सत्य और व्यवहार भी सत्य ऐसा परस्पर विरुद्ध कथन नहीं करता । पुस्तक में सही भाव भासित होने हेतु जगह जगह पर लौकिक जीवन के उदाहरणों का इस्तेमाल किया है । तथ्यों को प्रमाणित करने हेतु अनेक आगम और विद्वतजनों के साहित्य के सन्दर्भ दिए है । जगत के सभी पदार्थों में परमपारिणामिक भाव ही सर्वोत्कृष्ट पदार्थ है। यह कोई काल्पनिक पदार्थ नहीं है बल्कि एक अत्यन्त महत्त्वपूर्ण हमारी अपनी वास्तविकता है। वाचकगण इस पुस्तक को अवश्य पढ़ेंगे ऐसी आशा करता हूँ। इस पुस्तक में आपके ही वास्तविक स्वरुप की बात है। अगर किसीको पुस्तक प्राप्त करनी हो तो वह इस पुस्तक परिचय लेख के लेखक से ९९६०३७९०४७ What's aap पर संपर्क करें

## बाहुबली गुरुकुलाचा ९१वा वर्धापनदिन समारंभ कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न

शुक्रवार २७ जून २०२५ रोजी श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ, बाहुबली या संस्थेचा ९१ वा वर्धापनदिन समारंभ अतिशय उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम, स्तवनिधीचे उपाध्यक्ष रामगोंडा रायगोंडा पाटील, प्रमुख अतिथी म्हणून श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम, स्तवनिधीचे सदस्य पंकज वीरकुमार पाटील, श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम स्तवननिधीचे सेक्रेटरी सुनील नरसाप्पा बळोल, श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम स्तवनिधीचे संचालक महावीर देवगोंडा पाटील हे होते. गोव्याचे उद्योगपती दत्तप्रसाद तिरोडकर हे देखील उपस्थित होते.

बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर, बाहुबली या प्रशालेमध्ये क्रीडो लॅबचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले. बालविकासचे चेअरमन तात्यासो अथणे हे उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत जनतारा संकुलाचे मुख्याध्यापक दीपक वाडकर यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय पर्यवेक्षक डॉ. नेमिनाथ बाळीकाई यांनी करून दिला. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते भद्रदास दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. जनतारा शैक्षणिक संकुल, जयसिंगपूर (दहावी व बारावी) व दादा नाना भोकरे हायस्कूल, कवठेसार यांचा दहावी शाखांतर्गत मध्ये प्रथम क्रमांक आल्याबद्दल, द्वितीय क्रमांक सन्मती विद्यालय तारदाळ व तृतीय क्रमांक एम.जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली यांचा प्रमुख मान्यवरांचे हस्ते सन्मान करण्यात आला. बाहुबली येथील इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेमध्ये प्रथम तीन विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच इयत्ता आठवी एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच आयआयटी (दिल्ली) प्रवेश मिळाल्याबद्दल सिद्धांत ऐनापूरे या विद्यार्थ्याचा सन्मान करण्यात आला.

श्री. पंकज वीरकुमार पाटील यांनी आपल्या मनोगतामध्ये ९१ वर्षांची ही यात्रा खरंच प्रेरणादायी आहे. या आश्रमाने जवळपास शतकाकडे वाटचाल करीत आहे. या काळात कितीतरी पिढ्या इथे ज्ञानार्जन करून आत्मिक शांती अनुभवून आणि समाजसेवेचे व्रत घेऊन बाहेर पडले आहेत, असे सांगितले. स्तवनिधीचे संचालक महावीर देवगोंडा पाटील यांनी गुरुकुलाचे महत्त्व व एकट्या-दुकट्या व्यक्तीने सुरू केलेला प्रवास आज एका विशाल वटवृक्षात रूपांतरित झाला आहे, जो अनेकांना आश्रय देत आहे, ज्ञान देत आहे आणि योग्य दिशा दाखवत आहे. महामंत्री दादासाहेब पाटील यांनी १९३४ ते २०२५ संस्थेने कशा पद्धतीने प्रगती केलेली आहे तसेच यश मिळवण्यासाठी कठोर मेहनत करणे व आपले ध्येय गाठण्यासाठी जिद्द व चिकाटी आवश्यक आहे असे विद्यार्थ्यांना सांगितले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये स्तवनिधीचे उपाध्यक्ष रामगोंडा रायगोंडा पाटील (राजू पाटील, अक्कोळ) यांनी ९१ वर्षांची ही आध्यात्मिक आणि सामाजिक सेवायात्रा आपल्या सर्वांच्या अखंड पाठिंब्यामुळे, सहकार्यामुळे आणि आशीर्वादांमुळेच शक्य झाली आहे, असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, शाखेतील सर्व मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक, माजी स्नातक, श्रावक, श्राविका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. आभार तारदाळचे मुख्याध्यापक चंद्रकांत तेरदाळे यांनी केले. सूत्रसंचालन वैशाली पाटील व स्मिता निटवे यांनी केले. मेरी भावनेने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## ज्ञानवृद्धीसाठी : शाखांतर्गत अध्यापक-अध्यापिका मार्गदर्शन शिबिर संपन्न

दि. १३ व १४ जून २०२५ रोजी बाहुबली येथे श्री बाहुबली विद्यापीठ शाखांतर्गत अध्यापक-अध्यापिका मार्गदर्शन शिबिर शांतिसागर प्रवचन हॉलमध्ये सानंद संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात परमपूज्य समंतभद्र महाराजांच्या प्रतिमेचे पूजन

मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले त्यानंतर मंगलाचरण संपन्न झाले. संचालक गोमटेश बेडगे यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना प्रतिज्ञा दिली. स्वागत व प्रास्ताविक शालेय समितीचे सचिव ऋषभनाथ मलिकवाडे यांनी या कार्यशाळेचा उद्देश समजावून सांगितला.

पहिले सत्र राधानगरीचे गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाने यांनी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण व आपण' यामध्ये त्यांनी नवीन शैक्षणिक धोरण, मूल्यमापन व्यवस्था कशी असावी याबद्दलचे विचार त्यांनी मांडले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. कृष्णा पाटील यांनी 'शिक्षकांसाठी डिजिटल संसाधने व प्रभावी वापर' यामध्ये त्यांनी पारंपारिक व अत्याधुनिक शिक्षण, डिजिटल संसाधन म्हणजे काय? इत्यादी बद्दल सविस्तर माहिती दिली. देवदत्त कुंभार यांनी 'शिक्षणातील नवोपक्रम व सृजनशील अध्यापन' यामध्ये त्यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी 'समाजातील शिक्षकांचे नैतिक अधिष्ठान' कशा पद्धतीने असावे हे त्यांनी कवितेच्या माध्यमातून शिक्षकांना समजावून सांगितले.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात इंद्रजीत देशमुख, निवृत्त सनदी अधिकारी यांनी 'समर्पण : संस्था, शाळा व विद्यार्थ्यांप्रती' या विषयावरती बोलताना 'समर्पण' या शब्दाला अनुसरून शिक्षण, संस्था आणि शिक्षकांनी शाळा व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी पूर्णपणे समर्पित असावे यावर भर दिला. त्यानंतर डॉ. विश्वास सुतार यांनी 'शिक्षणातून मानवी मूल्ये व नीतिमत्तेची रुजवणूक' या विषयावरती बोलताना शिक्षकांनी स्वतः समृद्ध व्हावे, समृद्ध व्यक्तींच्या सहवासामध्ये रहावे, उत्कृष्ट ग्रंथ वाचन असणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.

किरण पाटील, राज्य तज्ज्ञ मार्गदर्शक यांनी 'बदललेल्या समाज व्यवस्थेची शाळा व शिक्षकांकडून अपेक्षा' या विचारांमध्ये त्यांनी संस्काराचे महत्त्व, सामाजिक मूल्य जपणे, सहिष्णुता, समंजसपणा या गोष्टींच्याबद्दल विचार त्यांनी व्यक्त केला. साहित्य व शिक्षण क्षेत्रातील प्रयोगशील व सेवानिवृत्त अधिकारी नामदेव माळी यांनी 'तणावमुक्त अध्ययन अध्यापन' कसे असावे यावर आपले विचार मुद्देसूदपणे मांडले.

समारोपाच्या कार्यक्रमांमध्ये संस्थेचे कोषाध्यक्ष बाबासाहेब पाटील व महामंत्री दादासाहेब पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. शालेय समितीचे सहसचिव सुरेश चौगुले यांनी दोन दिवसीय कार्यशाळेचा थोडक्यात आढावा घेतला. अध्यापक मनोगतामध्ये महावीर चौगुले व ज्योती यलगुद्रे यांनी दोन दिवसीय कार्यशाळेचा अनुभव सांगितला. संस्थेचे संचालक गोमटेश बेडगे यांनी मनोगतामध्ये डिजिटल साधने, सक्रिय अध्यापन पद्धती, मूल्यमापन तंत्रे, विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र इत्यादी विषयावर त्यांनी विचार मांडले.

तसेच शालेय समितीचे सचिव ऋषभनाथ मलिकवाडे यांचे देखील बहुमोल सहकार्य लाभले. एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली येथील विद्यार्थ्यांच्या चित्रांची परदेशात निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्वच पदाधिकारी, शाखेतील सर्व मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, अध्यापक, अध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

–वार्तांकन – श्री. सुदर्शन चौगुले, बाहुबली


पश्चिम महाराष्ट्रातील जैन सत्साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण......

**भरतेश ग्रंथ भांडार**

मु. पो. बाहुबली, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर ४१६ ११०
**संपर्क :** श्री बाबगोंडा पाटील
८७६७५४१७१०

## बाहुबली येथे गुरुदेव समंतभद्र महाराज यांचा ३७वा समाधीदिवस विविध कार्यक्रमाने संपन्न

बाहुबली येथे प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांचा ३७वा समाधीदिवस विविध कार्यक्रमाने उत्साहात संपन्न झाला. यावेळी सकाळी गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या प्रतिमेची ऐरावत हत्तीवरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या समाधीस्थळी चरणाभिषेक तसेच गुरुदेवश्री समंतभद्र पूजन व समाधिशतक ग्रंथाचे पठण करण्यात आले.

यावेळी गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या ३७व्या समाधीदिवसानिमित्त विनयांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डायरेक्टर ऑफ मेटाफोर्ज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,नाशिकचे कौस्तुभ मेहता हे होते. प्रमुख अतिथी म्हणून नांदेडचे डॉ. पंकज दशरथ खंडारे व सौ. श्रद्धा पंकज खंडारे हे होते. सुरुवातीस मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. विद्यार्थिनींनी मंगलाचरण व स्वागतगीत गायिले. स्वागत व प्रास्ताविक समन्वय समितीचे सहसचिव सुरेश चौगुले यांनी केले.

अतिथींचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाला. शाखांतर्गत(महाराष्ट्र व कर्नाटक) वक्तृत्व व निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांची व अध्यापकांची मनोगते संपन्न झाली. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. नेमिनाथ बाळीकाई लिखित 'श्रीभद्र-संस्कार' या पुस्तकाचे विमोचन संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सहाय्यक शिक्षिका,पीपल्स हायस्कूल, नांदेडच्या श्रद्धा पंकज खंडारे यांनी आपल्या मनोगतामध्ये पती पंकज दशरथ खंडारे यांनी 'प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज यांची शिक्षण पद्धती-ऐतिहासिक अभ्यास' यावर शोधप्रबंध लेखन केलेले आहे. त्यावर त्यांनी गुरुकुल शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये सांगितली.

संस्था प्रतिनिधी मनोगतामध्ये महामंत्री श्री. दादासाहेब पाटील यांनी गुरुदेवांच्याबद्दल त्यांचे त्याग, ज्ञान आणि समाज प्रबोधनाचे कार्य आम्हा सर्वांसाठी आजही प्रेरणादायी आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डायरेक्टर ऑफ मेटाफोर्ज इंडिया प्रा. लि.चे कौस्तुभ मेहता यांनी आपल्या मनोगतामध्ये गुरुदेवांच्या जीवनातून सामाजिक सलोखा, नैतिक मूल्ये आणि आत्मिक उन्नती साधण्याची प्रेरणा मिळते. त्यांचा संदेश आजही आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी आणि एक उत्तम समाज घडविण्यासाठी महत्त्वाचा आहे.

यानंतर महाराष्ट्र व कर्नाटकातील संपन्न वक्तृत्व व निबंध स्पर्धेतील लहान, मोठा व अध्यापक गटातील प्रथम क्रमांकास रु. ३०००/-, द्वितीय क्रमांकास रु. १५००/- आणि तृतीय क्रमांकास रु. १०००/- असे एकूण रु. ८५,०००/- संस्थेतर्फे देऊन गौरविण्यात आले. इ.१० वी व १२ वीच्या महाराष्ट्र व कर्नाटकातील प्रथम क्रमांकास रु. ३०००/-, द्वितीय क्रमांकास रु. २०००/- आणि तृतीय क्रमांकास रु. १०००/- असे एकूण ५५ विद्यार्थ्यांना सरिता ॲण्ड सुरेश भूपाल बहिरशेठ ट्रस्ट मुंबई यांच्याकडून १,०८,०००/- इतकी पुरस्कार राशी देण्यात आली. तसेच ८वी शिष्यवृत्ती व १२वी सीईटी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास अशोक पाटील, शरद साखर कारखान्याचे संचालक आप्पासाहेब चौगुले, शालेय समितीचे सचिव ऋषभनाथ मलिकवाडे, संचालक गोमटेश बेडगे, रवींद्र खोत, बी. ए. शिखरे, राजेंद्र नांद्रेकर, तात्यासो अथणे, सर्व शाखांचे मुख्याध्यापक, अध्यापक, अध्यापिका, माजी स्नातक, श्रावक-श्राविका, गुरुकुल विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निमशिरगावचे मुख्याध्यापक संजय पाटील यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन स्मिता निटवे व आशुतोष व्हनवाडे यांनी केले. मेरी भावनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या समाधी महोत्सवानिमित्त आयोजित संस्थास्तर स्पर्धेबाबतचा निकाल

**महाराष्ट्र राज्य शालेय वक्तृत्व व निबंध स्पर्धा**

**वक्तृत्व स्पर्धा**

**अध्यापक गट-**

१) डॉ. नेमिनाथ रामा बाळीकाई, एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली,

२) सौ. रोहिणी कीर्तीकुमार पाटील, जनतारा कल्पवृक्ष वि.मं. व नांद्रेकर ज्यु. कॉलेज, जयसिंगपूर

३) श्री. जिनेंद्र रमेश चावरे, श्री विद्यासागर हायस्कूल, अकिवाट

**मोठा गट (९वी ते १२वी)**

१) अन्विक्षा अनमोल पाटील, जनतारा कल्पवृक्ष वि.मं. व आ. न. नांद्रेकर ज्यु. कॉलेज, जयसिंगपूर

२) दिपाली अजित निर्मळे, सरस्वती हायस्कूल, टाकळीवाडी

३) वेदिका रामसिंग रजपूत, श्री विद्यासागर हायस्कूल, अकिवाट

**लहान गट (५वी ते ८वी)**

१) निधी बाहुबली संभूशेटे, जनतारा कल्पवृक्ष वि.मं. व आ. न. नांद्रेकर ज्यु. कॉलेज, जयसिंगपूर

२) तनिष्का प्रवीण पाटील, एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली

३) मनोरमा मेघदूत कांबळे, सन्मती विद्यालय, तारदाळ

**निबंध स्पर्धा**

**अध्यापक गट-**

१) सौ. सविता बाबासाहेब सिदनाळे, जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर, जयसिंगपूर

२) सौ. स्वाती अमोल इंगळे, एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली

३) सौ. स्नेहलता वैभव शेट्टी, दादा नाना भोकरे हायस्कूल कवठेसार

**मोठा गट (९वी ते १२वी)**

१) निदा रमजान शेख, सन्मति विद्यालय, तारदाळ

२) प्राजक्ता राजाराम बावचे, एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली

३) रिया पंकज काडगे, जनतारा कल्पवृक्ष वि.मं. व आ. न. नांद्रेकर ज्यु. कॉलेज, जयसिंगपूर

**लहान गट - (५वी ते ८वी)**

१) वृषभ राजाराम खोत, सन्मति विद्यालय, तारदाळ

२) तन्वी प्रवीण धुळासावंत, जनतारा कल्पवृक्ष वि.मं. व आ. न. नांद्रेकर ज्यु. कॉलेज, जयसिंगपूर

३) आराध्या रमेश कारदगे, श्री विद्यासागर हायस्कूल, अकिवाट

**कर्नाटक राज्य शालेय वक्तृत्व व निबंधस्पर्धा**

**वक्तृत्व स्पर्धा – कन्नड माध्यम**

**लहान गट-** आरती महांतेश मठपती, पी. जी. विद्यामंदिर, स्तवनिधी

**मोठा गट-**

१) अनुष्का सुकुमार माने, ए. एस. पाटील हायस्कूल, स्तवनिधी,

२) संजना भरतेश हलकर्णी, भरतेश पी. यु. कॉलेज बे.बागेवाडी,

३) समिक्षा महावीर सौंदत्ती, जे. एस. गर्ल्स हायस्कूल, तेरदाळ

**अध्यापक गट-** श्रीमती कविता सावंतन्नवर, जे. एस. गर्ल्स हायस्कूल, तेरदाळ

**मराठी माध्यम**

**लहान गट-** मैथिली संभाजी वाडकर, पी. जी. विद्यामंदिर, स्तवनिधी,

**मोठा गट -** श्रावणी जम्बूकुमार रांगोळी, पार्श्वमती कन्या विद्यामंदिर, अकोळ

**अध्यापक गट-**

१)माणिक बाबुराव कोल्हापुरे, सन्मती वि. सिदनाळ

२) सतीश प्रकाश मोरे, ए. एस. पाटील हायस्कूल, स्तवनिधी,

३) वैजयंती दत्तू इंदुलकर, पार्श्वमती कन्या विद्यामंदिर, अकोळ

**निबंध स्पर्धा**

**कन्नड माध्यम**

**लहान गट-** अनिल संतोष पाटील, पी. जी. विद्यामंदिर स्तवननिधी

**मोठा गट -**

१) समीक्षा चिन्नाप्पा मगदूम, भरतेश पी. यु. कॉलेज बे.बागेवाडी,

२) विवेक अरुण पाटील, भरतेश विद्यालय बे. बागेवाडी,

३) प्रियांका हनुमंत पाटील, एस. जे. गर्ल्स हायस्कूल तेरदाळ

**अध्यापक गट-**

१) लक्ष्मण पराप्पा नंदगाव, भरतेश पी. यु. कॉलेज बे. बागेवाडी,

२) पूजा महावीर पाटील, ए. एस. पाटील हायस्कूल स्तननिधी,

३) हनुमंत भिमगोंडा पाटील, जिनसेनाचार्य गुरुकुल तेरदाळ

**मराठी माध्यम**

**लहान गट-** युगंधरा सचिन पाटील, पी. जी. विद्यामंदिर स्तवनिधी

**मोठा गट -** आदिती सुधाकर एवाळे, सन्मती विद्यामंदिर सिदनाळ

**अध्यापक गट-** तानाजी आत्माराम घोसरवाडे, ए. एस. पाटील हायस्कूल, स्तवनिधी

**वक्तृत्व आणि निबंध स्पर्धेचे विषय**

लहान गट – **गुरुकुल पंचसूत्री - शैक्षणिक संजीवनी**

मोठा गट – **परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या गुरुकुल संस्था आणि समाज**

अध्यापक गट – **परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज द्वारा संस्थापित गुरुकुलामुळे समाजास लाभलेली दिशा**

वक्तृत्व आणि निबंध या दोन्ही स्पर्धेसाठी एकच विषय निश्चित करण्यात आला होता. सर्वप्रथम बाहुबली विद्यापीठातर्फे संचालित महाराष्ट्र व कर्नाटकातील शाळा शाळामधून या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानंतर प्रत्येक शाळेतील प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धकास संस्था स्तरावर पाठवण्यात आले. तेथे वक्तृत्व स्पर्धा पुन्हा घेण्यात आली आणि त्यामधून प्रथम तीन क्रमांक काढले गेले. तसेच निबंध स्पर्धेचेही सर्व निबंध तपासले गेले आणि त्यामधून प्रथम तीन क्रमांक तीन गटांमध्ये काढण्यात आले. अशाप्रकारे ही स्पर्धा संपन्न झाली. तसेच श्रावण शुद्ध पंचमी, मंगळवार दि. २९ जुलै २०२५ रोजी प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचा ३७वा समाधी महोत्सव बाहुबली येथे संपन्न झाला. यावेळी विनयांजली सभेत प्रत्येक गटातील वक्तृत्व स्पर्धेतून प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धाकांची मनोगते ठेवण्यात आली होती. सर्वच स्पर्धकांनी अभ्यासपूर्ण आणि उत्साहपूर्वक ही भाषणे सादर केली. त्यामुळे या वेळेचा हा कार्यक्रम विशेष उठावदार आणि मनाला आकर्षित करणारा होता. सर्व अध्यापक-अध्यापिका, गुरुकुल स्नातक आणि गुरुकुलमधील सर्व विद्यमान विद्यार्थी कान टवकारून सर्वांची भाषणे ऐकत होते. सर्व मान्यवर अतिथी महोदय देखील खूपच प्रभावित झाले. विशेष म्हणजे या संस्थास्तर आणि शालेय स्तरांमध्ये सर्व जाती धर्माचे, वेगवेगळे गावचे आणि वेगवेगळ्या वयोगटातील अनेक मुला-मुलींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. महाराष्ट्र व कर्नातकातील सर्व शाखांमधून शालेयस्तरावरील वक्तृत्व स्पर्धेत अध्यापक गटात १०२ अध्यापक, लहान गटात ७८ व मोठ्या गटात ६५ विद्यार्थी सहाभागी झाले होते आणि निबंध स्पर्धेत अध्यापक गटात २००, लहानगटात १५२ व मोठ्या गटात २५२ विद्यार्थी सहभागी झाले होते. अशाप्रकारे **एकूण ८४९ स्पर्धाकांनी सहभाग नोंदविला.** विशेष करून मुलींचा सहभाग लक्षणीय होता. पण एकंदरीत सर्वत्र नवचैतन्य व उत्साह दिसत होते. एक आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आल्याने सर्वांच्या मनात धर्म जागृती विशेष घडली. तसेच या शंभर वर्षाच्या इतिहासात गुरुकुलांच्यामुळे समाजामध्ये कोणकोणत्या प्रकारची परिवर्तने घडली आहेत, याचे सांगोपांग विवेचन करण्यात आले आणि हा एक विस्तृत शोध प्रबंधाचा विषय आहे, हे निश्चितच जाणवले. पूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांची अतुलनीय कार्यशैलीचा विशेष गौरव झाला.

# नांदणी येथील माधुरी उर्फ महादेवी या हत्तीणच्या संदर्भात घडलेल्या दुष्कृत्याचा निषेध नोंदविण्यात येत आहे...

श्री जिनसेन भट्टारक धर्मपीठ नांदणी मठ येथे माधुरी उर्फ महादेवी ही हत्तीण गेल्या ३३ वर्षापासून खूप चांगल्याप्रकारे पाळली जात होती. हत्ती पाळण्याची ही परंपरा या धर्मपीठाने गेल्या ७०० वर्षापासून अखंड रूपाने जपली आहे. परंतु शासनाला पेटा या संघटनेने २०२३ साली चुकीची माहिती पुरवली आणि त्यामुळे न्यायालयाने वनतारा जामनगर येथील प्राणी संग्रहालयात तिला हस्तांतरित करण्याचा निर्णय दिला. पण खऱ्या अर्थाने जैन धर्म हा अहिंसाप्रेमी, सर्व जीवाविषयी दयाभाव ठेवणारा म्हणून जगप्रसिद्ध आहे. संपूर्ण जगाला जीवदया शिकविणारा हा एकमेव जैन धर्म आहे. आज या समाजाकडून संपूर्ण देशात सुमारे चौदा हजारहून अधिक गोशाळा चालविल्या जात आहेत. यामधून लाखो गाईंचे संगोपन केले जाते, अशा ह्या जैन समाजाला एका हत्तीकडे विशेष लक्ष देता येत नाही, असे म्हणणे हे खूप मोठे दु:साहस आहे. त्यामुळे संपूर्ण न्यायव्यवस्था, शासन व प्राणी संघटनेने पुनर्विचार करावा आणि माधुरी उर्फ महादेवी या हत्तीणीस मठाकडे पुन्हा सोपवावे, अशी आम्ही विनंती करीत आहोत.

नांदणी मठातून या हत्तीणीस घेऊन जाणे म्हणजे जैन समाज, जैन संस्कृती, परंपरा व लोक पद्धती याला उद्ध्वस्त करण्यासारखे आहे, म्हणून जैन व जैनेतर समाजाच्या आस्था केंद्रावर आघात पोहोचविण्यासारखे आहे. यामुळे संपूर्ण भारतीय समाज व्यवस्था उद्ध्वस्त करण्याची ही कूटनीतीच मानावी लागेल. प्रशिक्षित असणारी ही हत्तीण निसर्गाच्या सान्निध्यात राहत असून ती कोणत्याही प्रकारे मानवी वस्तीस त्रास पोहोचवत नाही किंवा यापूर्वी देखील तिने मानवी वस्तीत भीती निर्माण केली नाही. त्यामुळे आज अखेर कोणत्याही प्राणी मित्र संघटनेने यावर आक्षेप घेतला नाही. याचाही गांभीर्याने विचार व्हावा, ही विनंती.

ही हत्तीण सुदृढ व निरोगी आहे. तसेच तिला शारीरिक, मानसिक या दृष्टीने चांगले उपचार केले जात असतात. प्रशिक्षित असणारी ही हत्तीण नांदणी मठाकडून चांगल्या प्रकारे पाळली जात आहे. तिच्यावर योग्य उपचार करणारे डॉक्टर, सांभाळणारे माहूत, मार्गदर्शन करणारी समिती आणि अनेक प्राणीमित्र संघटनांचे कार्यकर्ते या सर्वांच्या देखरेखीनुसार तिची निगा राखली जात असते, म्हणून न्यालयाने ही माणसाळलेली हत्तीण परत करावी, अशा प्रकारे विनंती केली जात आहे.

यावर सहानुभूतीपूर्वक विचार विनिमय करून न्यायालयीन प्रक्रियानुसार तिला परत करणे, हे सर्वथा योग्य आहे, असे आम्हा सर्वांना वाटते.

शनिवार, दि. ०२ ऑगस्ट २०२५ रोजी बाहुबली संस्थेचे सर्व पदाधिकारी नांदणी मठात जाऊन भट्टारकश्रींना भेटून त्यांची विशेष सांत्वना केली आणि आम्ही सर्व बाहुबलीवासीय आपल्या निर्णयाशी एकनिष्ठ आहोत, असे आश्वासन दिले.

रविवार, दि. ०३/०८/२०२५ रोजी अभूतपूर्व पद्धतीने शांततापूर्ण मोर्चा काढून जैन व जैनेतर समाजाने निषेध नोंदविला. हा मोर्चा नांदणी येथून सकाळी ५ वा. सुरु झाला. यामध्ये किमान पाच-सहा लाखाहून अधिक लोक होते. नांदणी, कोल्हापूर व श्रवणबोळगोळ येथील भट्टारकांनी याचे नेतृत्व केले. तसेच कोल्हापूर, सांगली, बेळगाव या परिसरातील अन्य ही अनेक समाजाच्या प्रतिनीधींनी सहभाग नोंदविला. राजकीय, सामाजिक, सहकार, शैक्षणिक, धार्मिक संघटना व त्यांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. एक नावीन्यपूर्ण असे सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले आणि सर्व समाजाची सहानुभूती लाभली.

## एक ऐतिहासिक संगोष्ठी संपन्न–

# ‘जैन दृश्य वारसा : चित्रे, पुरातत्त्व व मूर्तिशास्त्र’

शनिवार, दि. २६ व रविवार, दि. २७ जुलै २०२५ रोजी इतिहास विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर आणि श्री म. ब्र. आश्रम द्वारा संचालित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम, कारंजा (लाड) यांच्या संयुक्त विद्यमाने ‘जैन दृश्य वारसा : चित्रे, पुरातत्त्व व मूर्तिशास्त्र’ या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी मा. विभागीय आयुक्त श्री. जितेंद्र पापळकर व प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. कैलाश चांदीवाल उपस्थित होते. श्री म. ब्र. आश्रम गुरुकुल, कारंजा (लाड)चे अध्यक्ष श्री. सतीश संगई हे स्वागताध्यक्ष होते. तर शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. नवल सुबोध थोरात हे अध्यक्षस्थानी होते.

प्रथम सत्रात सर जे. जे. कला महाविद्यालय, मुंबई येथील भूतपूर्व प्राध्यापक डॉ. मनीषा पाटील यांनी कारंजा लाड येथील जैन सचित्र पुराणांतील चित्रकला यावर विस्तृत प्रकाश टाकला. सत्राचे अध्यक्ष डॉ. महावीर शास्त्री, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर यांनी आपले अध्यक्षीय मत मांडले व चित्रमय ग्रंथांचे डिजीटल स्वरुपात करण्याच्या प्रयत्नाचे कौतुक केले. यावेळी इतिहास विभाग प्रमुख श्री. रूपेश मडकर यांनी परिषदेच्या आयोजनाची भूमिका मांडली. सूत्रसंचालन श्री. चिंतामणी भूस यांनी केले तर इतिहास विभागाचे श्री. रवींद्र पाटील यांनी आभार मानले.

दुसऱ्या दिवशी प्रथम सत्रात पहिल्या वक्त्या प्रज्ञाताई डोणगावकर यांनी कारंजा येथील सचित्र पट व त्यासोबत त्यावर केलेल्या अभ्यासपूर्ण विवेचनाद्वारे उलगडून दाखवला. अतिशय बारकाव्यांनिशी हा चित्र पट लोकांच्या डोळ्यासमोर साक्षात उलगडत होता. सोळाव्या शतकातील हा सचित्रपट राजस्थानी व उत्तरेकडील चित्रकलेचे एक उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. विस्तृत असलेल्या कापडावर रंगवलेला हा पट एकमेव असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. द्वितीय वक्त्या डॉ. प्रणोती लाड यांनी महाराष्ट्रातील विविध जैन मंदिरांचा वास्तुकलेच्या दृष्टिकोनातून अभ्यास सादर केला. विविध क्षेत्रातील, प्रदेशातील मंदिरात बांधण्याची पद्धत कशी बदलत गेली हे त्यांनी आपल्या सादरीकरणातून उत्तमरीत्या दाखवून दिले. यावेळी सत्राचे अध्यक्ष डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी प्राचीन काळापासून चित्रकला, साहित्यात कसे बदल होत गेले, उत्तरेकडील स्थलांतरित जैनांचे त्यामधील योगदान व दक्षिण महाराष्ट्रातील जैन समाजात विदर्भातील चित्रांप्रमाणे किंवा कलेप्रमाणे कलेचे प्रक्षेपण दक्षिण महाराष्ट्रातील जैन लोकांनी का केले नसावे याचा उलगडा केला.

द्वितीय सत्रात श्री. ओशिन बंब यांनी महाराष्ट्रातील जैन पुरातत्त्वाचा विस्तृत आढावा घेतला. यावेळी उपस्थित अभ्यासकांना त्यांनी विविध प्रदेशातील पुरातत्वीय पुरावे, मूर्त्या भग्नावशेष दाखवून याबद्दल व आपल्या विस्तृत, प्रचंड वारशाबद्दल अवगत केले. तसेच या वारशाची जपणूक करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन यावेळी डेक्कन महाविद्यालय, पुणे येथील श्री. ओशिन बंब यांनी आपल्या सादरीकरणाद्वारे केले.

समारोपाचे सत्र दिनेश गंगवाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी छ. संभाजीनगर मधील जैन समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. महावीरजी ठोले, देवेंद्र काला, गुलाबचंद बोराळकर, राहुल मिश्रीकोटकर, अतुल यावलेकर, सचिन कळमकर हे मान्यवर उपस्थित होते. शेवटी इतिहास विभागाचे श्री. रवींद्र पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

## जैन दृश्य वारसा - चित्रे, पुरातत्त्व आणि मूर्तिशास्त्र ..... छायाचित्रे...

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ५०वर)



चर्चासत्राचे उद्घाटन करताना श्री जितेंद्र पापळकर (विभागीय आयुक्त, छ.संभाजीनगर), श्री. कैलाश चांदीवाल, (माजी न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय), प्राचार्य डॉ. नवल थोरात, अध्यक्ष श्री. सतीश संगई, श्री. कीर्तीकुमार भोरे



प्रा. ओशीन बंब (सहा. प्राध्यापक, भ.शीतलनाथ जैन चेअर, डेक्कन कॉलेज, पुणे)



सत्राध्यक्ष डॉ. महावीर शास्त्री, संपादक-जैनबोधक, सोलापूर



डॉ.प्रणोती लाड (विभाग प्रमुख, स्थापत्य संवर्धन, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे)



प्रज्ञा डोणगावकर (कारंजा लाड)



डॉ. मनीषा पाटील (सेवानिवृत्त प्राध्यापक, सर जे.जे.कला महाविद्यालय, मुंबई)



श्री. अमलप्रभ चवरे (जैन अभ्यासक, कारंजा लाड)



सत्र अध्यक्ष डॉ. गोमटेश्वर पाटील, महावीर कॉलेज,कोल्हापूर

## बाहुबली गुरुकुलाचा ९१वा वर्धापन दिन..... छायाचित्रे...

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४४वर)



प्राथमिक विद्यामंदिरच्या भद्रदास या दिनदर्शिकेचे विमोचन



एन.एम.एम.एस. व शिष्यवृत्तीमधील धवल यशाबद्दल पालकाकडून शिक्षकांचा सन्मान

.....अतिथी सन्मान....



स्तवनिधीचे उपाध्यक्ष श्री. रामगोंडा पाटील



स्तवनिधीचे सेक्रेटरी श्री. सुनिल बळोल



स्तवनिधीचे सदस्य श्री. पंकज पाटील



स्तवनिधीचे संचालक श्री. महावीर पाटील



विशेष अतिथी सौ. व श्री. दत्तप्रसाद तिरोडकर

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 09-08-2025

# गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचा ३७वा समाधी महोत्सव..... छायाचित्रे...





कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कौस्तुभ मेहता व सौ. सारिका मेहता, नाशिक यांचा सन्मान



कार्यक्रमाचे अतिथी डॉ. पंकज खंडारे सौ. श्रद्धा खंडारे, नांदेड यांचा सन्मान



उपस्थित मान्यवरांच्या शुभ हस्ते श्रीभद्र-संस्कार या पुस्तकाचे विमोचन

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४६वर)

सन्मतीचे संस्थापक–संपादक, बाहुबली गुरुकुलाचे संचालक

## बा. ब्र. माणिकचंदजी भीसीकर, (गुरुजी)



१०९व्या जयंतिदिनानिमित्त

विनम्र अभिवादन...!

जन्म : दि. ०१ ऑगस्ट १९१६ स्वर्गवास : दि. २० एप्रिल २००३

**पंचमपट्टाधीश आचार्य १०८ श्री वर्धमानसागरजी महाराज यांचे परम भक्त ध. श्री. अंशुमन पाटणी, इचलकरंजी यांनी अंकाच्या मुखपृष्ठावर आचार्यश्री शांतिसागरजी यांच्या चातुर्मासाचा फोटो प्रकाशित केल्याबद्दल रु. १५,०००/- इतकी दानराशी दिली आहे. त्यांना धन्यवाद..!**

Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH

UPI ID : schoolbahubali@sbi

BHIM UPI

**बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी वरील क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते.**

प्रेषक,
www.sanmatimasik.com
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर–४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

______________________

______________________

______________________

प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली